




# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


'कर्जमाफीची आस, पण मृत्यूचाच प्रवास! अडीच लाखांचे कर्ज पोहोचले ७ लाखांवर

# कर्जमाफीच्या प्रतिक्षेतील शेतक-याची आत्महत्या

## सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची विवंचना वाढली



**अमरावती,तिवसा/प्रतिनिधीः-** निसर्गाची लहरीपणा, सततची नापिकी आणि शासनाच्या घोषणांच्या गर्तेत अडकलेला बळीराजा अखेर आर्थिक विवंचनेसमोर हरला आहे. अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील शेंदोळा बुद्रुक येथील शेतकरी अशोक खरूले यांनी कर्जाच्या ओझ्याखाली दबून आपली जीवनयात्रा संपवली. २०१६ मध्ये घेतलेले अडीच लाखांचे कर्ज व्याजासह तब्बल ७ लाख ६९ हजार रुपयांवर पोहोचले होते. कागदावरच्या योजना आणि कर्जमाफीच्या केवळ प्रतिक्षेत असलेल्या एका हतबल शेतकऱ्याचे आयुष्य कशा पद्धतीने उद्ध्वस्त झाले, याचे हे एक ज्वलंत आणि सुन्न करणारे वास्तव आहे. या घटनेने पुन्हा एकदा सरकारी यंत्रणेच्या अनास्थेवर आणि शेतकरी आत्महत्यांच्या दाहक वास्तवावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.



अशोक खरूले

शेंदोळा बुद्रुक येथील रहिवासी असलेले अशोक खरूले नेहमीप्रमाणे सकाळी उठून गावाच्या चौकातील त्यांचे छोटे दुकान उघडायला गेले. काहीवेळानंतर जेव्हा पहाट झाली तेव्हा खरूले यांच्या मुलाला लोकांनी फोन केला. त्यावेळी ते दिसत नसल्याची चर्चा गावभरात पसरली. त्यांचा शोधाशोध घेण्यात आला. दरम्यान त्यांच्या घराच्या लगत असलेल्या सामाजिक वणीकरनाच्या झुडपात झाडाला दोरीबांधून त्यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनात आले. त्यामुळे संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अशोक खरूले यांनी वर्ष २०१६ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया शेंदोळा खुर्द येथील २.२३ लाखांचे शेतीवर कृषी कर्ज घेतले होते. दरम्यानचा काळात त्यांचे पुनर्गठन करण्यात आले. त्यानंतरही खरूले आपल्या कर्जाचे पैसे भरू शकले नाही. त्यामुळे त्यांचे बँक अकाऊंड एनपीए करण्यात आले. यादरम्यान झालेल्या कर्जमाफीमध्ये त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही. परिणामी त्यांच्यावर ७ लाख ६९ हजार ४५० रुपयांची बँकेची थकबाकी होती. शिवाय बँकेचा कर्जवसुलीचा तगादा सुद्धा होता. यातून आज ना उद्या कर्जमाफी मिळेलच अशा आशेत असलेल्या खरूले यांनी अखेर नापिकी आणि शासनाच्या चुकीच्या धोरणांना कंटाळून आर्थिक विवंचनेत सोमवारी पहाटेच्या सुमारास आपली जीवनयात्रा संपवली.

सततच्या नापिकी याशिवाय आर्थिक विवंचनेमुळे अशोक खरुले यांच्या पत्नी लता खरूले यांनाही खासगी बेसिक किंवा गटाचे पैसे उचलून आपला उदरनिर्वाह करावा लागत होता. खरूले यांच्याकडे ३ एकर शेती होती. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये सततच्या निसर्गाच्या लहरीपणामुळे कोणतेही उत्पन्न झाले नाही. गेल्यावर्षी ओला दुष्काळ आणि यंदा कोरडा दुष्काळामुळे खरूले पूर्णतः खचून गेले होते. बँकेच्या सततच्या तगादामुळे सुद्धा ते चिंतेमध्ये राहत असल्याने वडिलांनी आत्महत्या केल्याचे मुलगा अमोल अशोक खरूले यांनी सांगितले.

> कर्जमाफीच्या नावावर सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेत पाडले आहे. आज ना उद्या कर्जमाफी मिळेल या विचारात शेतकरी राहतो आणि आत्महत्या करतो. हजारो शेतकऱ्यांचे नाव कर्जमाफीच्या यादीत आहे. मात्र कुणाच्या केवायसी होत नाही. काहींची केवायसी झाली तर कर्जाचे पैसे शासनाकडून जमा झाले नाही. परिणामी नवीन कृषी कर्ज मिळत नाही. सरकारने तातडीने असे चुकीचे धोरण बदलून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय नाही.
>
> ■ **प्रशांत कांबळे,** सामाजिक कार्यकर्ता

## 'फॉर्म ६ मध्ये कोणतेही बदल नाही, SIR चे सर्व निर्णय एकमतानेच'

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था** गेल्या काही महिन्यांपासून देशात 'विशेष सखोल पुनरीक्षण' म्हणजे एसआयआर मोहीम सुरू आहे. पण या एसआयआर मोहिमेवरून मोठा गोंधळ सुरू आहे. यावरून



सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातच केंद्रीय निवडणूक आयोगाच्या तिन्ही आयुक्तांमध्ये फूट पडल्याचं एक वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. त्यानंतर देशभरात एकच खळबळ उडाली होती.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी विरोध डावलून निर्णय घेतल्याची तक्रार दोन निवडणूक आयुक्तांनी कॅबिनेट सचिवांकडे केल्याचं त्या वृत्तात म्हटलं होतं. या वृत्तानंतर ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी करत विरोधकांनी देशभरात आंदोलने सुरू केलेले आहेत. या घडामोडीनंतर आता केंद्रीय निवडणूक आयोगाने ➪(पान २ वर)

## तीन कोटी नावे कापली, फॉर्म-६ बाबत शंका

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** महाराष्ट्रातील मतदारयादीतील एसआयआर प्रक्रियेबाबत आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण



### महाराष्ट्रातील SIR वरून सरन्यायाधीशांचे मोठे विधान

सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील अरविंद दातार यांनी महाराष्ट्रातील मतदार यादीच्या मसुद्यामधून तब्बल तीन कोटी मतदारांची नावं हटवण्यात आल्याचा खळबळजनक दावा केला. महाराष्ट्रातील मतदारयादीतील एसआयआर प्रक्रियेबाबत आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील अरविंद दातार यांनी महाराष्ट्रातील मतदार यादीच्या मसुद्यामधून तब्बल तीन कोटी मतदारांची नावं हटवण्यात आल्याचा खळबळजनक दावा केला. तसेच ज्या मतदारांची नावं हटवली गेली आहेत. त्यांना मतदारयादीत आपलं नाव जोडून घेण्यासाठी फॉर्म-६ ➪(पान २ वर)

## वृक्षतोड तात्काळ थांबायला हवी, एक झाड मोठे व्हायला १५० वर्षे लागतात



**धाराशिव :** रायगडच्या कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरात सुरू असलेल्या वृक्षतोडीवर आज ठाकरेंच्या सेनेकडून मोर्चा काढत निषेध व्यक्त करण्यात आला. आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वात शेकडो शिवसैनिक या जंगलात दाखल झाले आहेत. यावेळी शिवसेनेचे नेते अनिल परब यांनी सरकारवर हल्लाबोल करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. तर, आमदार आदित्य ठाकरेंनीही या ठिकाणी भेट देऊन आंदोलकांना आपला पाठिंबा दर्शवत मुख्यमंत्री फडणवीसांना लक्ष्य केलं. तर, आता शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही वृक्षतोडीला आपला विरोध दर्शवला आहे. आमदार आदित्य ठाकरे आणि रोहित पवार यांच्यानंतर आता शिवसेना शिंदे गटाचे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही भीमाशंकरमधील ➪(पान २ वर)

### ओमराजेंचा सरकारला घरचा अहेर

## निसर्गाची राखरांगोळी करणारे प्रकल्प महाराष्ट्रात का?

### वृक्षतोडींवरून तापले राजकारण



**कोल्हापूर/ प्रतिनिधा-** रायगड जिल्ह्यातील कर्जत-भीमाशंकर परिसरातील समृद्ध जंगलावर कु-हाड चालवून उभारल्या जाणा-या गुजरातच्या 'टॉरेंटो पॉवर' कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण (पंप स्टोरेज) प्रकल्पावरून महाराष्ट्रातील ➪(पान २ वर)

## राहुल गांधींची मानहानीच्या खटल्यातून निर्दोष मुक्तता

### अमित शाहांविरोधात अपमानजनक वक्तव्य केल्याचा आरोप

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** प्रामाणिकपणाबद्दल बोलणाऱ्या पक्षाच्या अध्यक्षांवर खुनाचा आरोप आहे' या राहुल गांधी यांच्या विधानावर साडेसात वर्षांपूर्वी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. तथापि, उत्तर प्रदेशातील सुलतानपूर येथील खासदार-आमदार न्यायालयाने ते मानहानीकारक मानले नाही आणि २६ ऑक्टोबर रोजी त्यांची निर्दोष मुक्तता केली. राहुल न्यायालयात हजर झाले आणि अवघ्या १६ मिनिटांत निकाल लागला. पहिले, राहुल यांनी न्यायालयात सादर केलेली त्यांच्या संपूर्ण विधानाची सीडी हा एक सबळ पुरावा मानला गेला. कोणाचीही बदनामी करण्याचा आपला हेतू नव्हता, असे राहुल यांनी म्हटले होते. दुसरे, मानहानीचा खटला दाखल करणारे विजय मिश्रा यांना न्यायालयाने पीडित मानले नाही. याचा अर्थ असा की, शाह यांच्याविरोधातील राहुल यांच्या



विधानाशी विजय मिश्रा यांचा थेट संबंध नव्हता. तिसरे, न्यायालयाने विजय मिश्रा यांचे आरोप मानहानीकारक ठरवले नाहीत. याचा अर्थ असा की, राहुल यांचा कोणाचीही बदनामी करण्याचा हेतू नव्हता.राहुल गांधी यांनी ८ मे २०१८ रोजी बंगळूरु येथे एका पत्रकार परिषदेत हे विधान केले. भाजप नेते विजय मिश्रा यांनी ऑगस्ट २०१८ मध्ये हा खटला दाखल केला होता.न्यायाधीश म्हणाले, 'खोट्या प्रसिद्धीसाठी असे खटले दाखल करू नयेत. अशा खटल्यांमुळे न्यायालयाचा ➪(पान २ वर)

## आंदोलन ३० सेकंदात थांबेल

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** इंडिया आघाडीने १ नोव्हेंबर रोजी रामलीला मैदानावर रॅलीचे आयोजन केले आहे. या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांच्या 'चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री'चे अध्यक्ष बृजेश गोयल यांनी राहुल गांधी यांना एक पत्र लिहून रॅली पुढे ढकलण्याची विनंती केली होती. त्यांच्या या पत्रावर आता राहुल गांधी यांनी उत्तर दिले आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवल्यास विरोधकांचे आंदोलन ३० सेकंदात थांबेल,' असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर एक पोस्ट करत दिल्लीच्या व्यापाऱ्यांना उत्तर दिले आहे. राहुल म्हणाले, 'दिल्लीतील प्रत्येक व्यापाऱ्याला आम्ही सांगू इच्छितो की, ➪(पान २ वर)




## मालवाहू ट्रकमध्ये ४ कोटींची रोकड,

### चोर कप्प्यात लपवून ठेवल्या नोटा

**नागपूर/ प्रतिनिधी-** नागपूर मार्गे होणारा कोट्यवधींचा बेहिशेबी हवाला व्यवहार यापूर्वीही चर्चेत होता. त्याला बळ देणारी असाच एक प्रकार रविवारी रात्री उघडकीस आला. छत्तीसगडमधील खुर्सीपार येथे नागपूरकडे निघालेली बेहिशेबी कोट्यवधींची रोख रक्कम पोलिसांनी हस्तगत केली. रायपूरहून नागपूरकडे जाणाऱ्या 'बोलेरो मॅक्स' पिकअप मालवाहू ट्रकमधून ही रोकड जप्त करत दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. मालवाहू पिकअप ट्रकमधून सुमारे ४ कोटी रुपयांची रोकड पोलिसंना सापडली आहे.



ही रक्कम वाहनाच्या मागील भागात बनवलेल्या एका चोर कप्प्यात लपवून ठेवण्यात आली होती. वाहनात असलेल्या दोन व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायपूरहून नागपूरकडे एका पांढऱ्या रंगाच्या 'बोलेरो मॅक्स' पिकअप ट्रकमधून मोठी रोकड नेली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, मध्यरात्रीच्या सुमारास छत्तीसगडमधील खुर्सीपार पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या डाबरापारा ➪(पान २ वर)

## 'राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ'; एकनाथ शिंदेंनी कुंभमेळ्यासाठी साधला संत-महंतांशी संवाद

**मुंबई/ प्रतिनिधी-** राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ आहे. संतांच्या पायाशी नतमस्तक होऊन राज्यकारभार चालवणे हाच आमचा संस्कार आहे. भगवान त्र्यंबकेश्वर आणि गोदामाईच्या चरणी वंदन करून देशभरातून आलेल्या संत-महंतांची सेवा करण्याची संधी आम्हाला मिळणे हे आमचे परमभाग्य असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संत संमेलनाला उपस्थित राहून कुंभमेळ्यासाठी देशभरातून आलेल्या संत-महंतांशी संवाद साधला. साधू-संत येती घरा तोची दिवाळी दसरा. संतांच्या माध्यमातून खरी दिवाळी साजरी होत आहे. हे केवळ राजकीय किंवा सामाजिक संमेलन नसून आध्यात्मिक ऊर्जेचा उत्सव आहे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांनी राजकारण हे समाजकारण, राष्ट्रसेवा आणि राष्ट्ररक्षणासाठी करण्याचा संस्कार दिला. राजसत्ता हातात असली तरी आध्यात्मिक व धर्मसत्ता मोठी आहे. कुंभाच्या कामांमुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांना पक्की घरे देऊन ➪(पान २ वर)



## आता पेट्रोलशिवाय धावणार वाहने!

### *E100 इंधनाला केंद्राची मंजुरी*

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** सामान्य वाहनधारकांनी घाबरण्याची अजिबात आवश्यकता नाही, असे केंद्र सरकारनेच स्पष्ट केले आहे. E20 इंधन यशस्वी ठरल्यानंतर आता केंद्र सरकारने देशभरात E100 अर्थात १००% इथेनॉलवर चालणाऱ्या 'फ्लेक्स-फ्यूल' वाहनांच्या निर्मिती आणि विक्रीचा मार्ग मोकळा केला आहे. केंद्रीय मोटार वाहन नियमांमध्ये सुधारणा करून यासंदर्भात अधिकृत अधिसूचनाही प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, सरकारच्या या निर्णयानंतर, आता सध्याच्या कार मालकांच्या मनात आपल्या वाहनांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रश्न निर्माण होऊ शकतात. मात्र, सामान्य वाहनधारकांनी घाबरण्याची अजिबात आवश्यकता नाही, असे केंद्र सरकारनेच स्पष्ट केले आहे. E100 इंधन म्हणजे नेमकं काय? - इथेनॉल हे प्रामुख्याने ऊस, मका आणि धान्यापासून तयार केले जाणारे जैवइंधन म्हणजेच ॅर्दलित आहे. सध्या पेट्रोलमध्ये २०% इथेनॉल (E20) मिसळले ➪(पान २ वर)



## अर्नब चक्रीवादळ आंध्रच्या दिशेने सरकले

### ४ राज्यांना अलर्टः६ लाख लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात येणार

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** अर्नब चक्रीवादळ बंगालच्या उपसागरातून आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या दिशेने सरकत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २७ ऑक्टोबरपर्यंत त्याचे चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ २८ ऑक्टोबरच्या सकाळी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी १४० किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो.आंध्र प्रदेशातील सुमारे ६ लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याची तयारी सुरू आहे. किनारपट्टीच्या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मच्छिमारांना २९ ऑक्टोबरपर्यंत समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हा इशारा आंध्र प्रदेश, ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड आणि पुदुचेरीमध्ये लागू आहे.ओडिशामध्ये साठ बचाव पथके तैनात केली जातील. सहा जिल्ह्यांमध्ये २८ आणि २९ ऑक्टोबर रोजी ➪(पान २ वर)









जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# मरण आलं तरी चालेल पण हा लढा थांबता कामा नये; वृक्षतोडीवरुन आदित्य ठाकरेंचा संताप

**रायगड :** राज्यात महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठी वृक्षतोड करण्यात आली होती, या वृक्षतोडीवरुन नाशिकमध्ये नागरिकांनी, पर्यावरणप्रेमींना तीव्र संताप व्यक्त केला. आता, भिमाशंकरच्या डोंगररांगात, कर्जतच्या साय डोंगररांगातील असलेल्या वृक्षांची तोड केलीजत आहे. त्यावरुन, पर्यावरणप्रेमी आणि पुणेकर संतप्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची राख करून कर्जत भीमाशंकरमधील ३२ हजार झाडे तोडल्याचा आरोप होत आहे. आतापर्यंत हजारोंच्या भल्यामोठ्या झाडांची कत्तल करण्यात आल्याने नागरिकांचा उद्रेक झाला आहे. त्याच पार्श्वभूमीवर शिवसेना उबाठाचे आमदार आदित्य ठाकरेंनी साय डोंगरातील वृक्षतोडीच्या ठिकाणी भेट दिली. येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केलं.

गुजराती टॉरेंट पॉवर कंपनीच्या प्रस्तावित जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पाला पक्षपातीपणा दाखवल्याचा आरोप महायुती सरकारवर होत आहे. या प्रकल्पासाठी कर्जत-भीमाशंकरच्या जंगलातील अंदाजे ३ लाख झाडे तोडली जातील, असा दावा स्थानिकांकडून होत आहे. भीमाशंकरच्या जंगलातील या वृक्षतोडीवरुन राजकीय वातावरणही तापले असून शिवसेना युबीटी पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी कर्जत येथे जंगलतोड होत असलेल्या ठिकाणी भेट दिली. तसेच, मरण आलं तरी चालेल पण हा लढा आता थांबणार नाही, अशा शब्दात आदित्य ठाकरेंनी सरकारला इशारा दिला. तुम्ही मेगाईट मेगाईट म्हणताय पण तुम्ही, येथे मेगा वाट लावताय. कंपनी कुठली, तर गुजरातची. दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता येथे वृक्षतोड करून येथे सुद्धा फडणवीस दुष्काळ जाहीर करतील, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी कर्जतमधील साय डोंगर प्रदेशातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केलं. भाजपच्या मालक असलेल्या कंपन्यांनाना हे काम दिलं जातय, तुम्हाला चेक सुद्धा दिले जातील. ते आमदार, खासदारांना खरेदी करतात तर तुमचं काय? भकास करून विकास होणार नाही. मुख्यमंत्री पारदर्शक तुमचा आवडता शब्द, आता पारदर्शकपणे सांगा सुनावणी घेतली होती की नाही? आणि पर्याय कुठले नेमले होते? सुनावणीमध्ये हरकती घेतल्या त्याचं काय? असे अनेक सवाल आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना विचारले आहेत.आमच्या महाराष्ट्राची जमीन विकू देणार नाही, मरण आला तरी चालेल पण हा लढा थांबता




कामा नये, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी पर्यावरण रक्षणासाठी आणि जंगलतोडीसाठी आपला तीव्र विरोध असल्याचं दाखवून दिलं. तुमचा अभिनंदन तुम्ही वृक्षतोड थांबवली, तुम्ही सुद्धा इथे चिपको आंदोलन करा. जे कट्टर येतील ते तोडा, फेका. आपल्या जंगलाला हात लावू द्यायचा नाही, असे म्हणत स्थानिकांचं कौतुक करत त्यांना हे आंदोलन तीव्र करण्याचंही आदित्य यांनी सूचवलं आहे.

पान १ व १० वरून

## निसर्गाची राखरांगोळी

राजकीय आणि पर्यावरणीय वातावरण चांगलेच तापले आहे.दरम्यान, या प्रकल्पावर विरोधक आणि पर्यावरणप्रेमींकडून होणा-या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्यत्तर दिले आहे. हा प्रकल्प संपूर्णपणे पर्यावरणाला पूरक असून विरोधकांकडून याविरोधात जाणीवपूर्वक 'फेक नॅरेटिव्ह' तयार केले जात आहे आणि खोटा नॅरेटिव्ह पसरवणे म्हणजे थेट महाराष्ट्रविरोधी कृत्य आहे, असा पलटवार मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

शासनाच्या दुटप्पी धोरणावर टीका करताना काँग्रेस नेते सतेज पाटील म्हणाले, राज्यात आधीच दुष्काळसदृश परिस्थिती आणि पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. सरकार सांगते की 'एल निनो'मुळे पाऊस कमी झाला. मग अशा वेळी कर्जत-भीमाशंकरसारख्या सह्याद्रीच्या अत्यंत संवेदनशील पट्ट्यात तब्बल ३ लाख झाडे तोडण्याची परवानगी कशी दिली जाते? निसर्गाचा सत्यानाश करणारे असे विनाशकारी प्रकल्प दुर्दैवाने महाराष्ट्रात आणले जात आहेत.

विकासाला विरोध नाही, पण योग्य नियोजन हवे

आम्ही प्रश्न उपस्थित केला की सत्ताधारी लगेच म्हणतील विरोधक विकासाला विरोध करत आहेत. आमचा प्रकल्पाला किंवा विकासाला अजिबात विरोध नाही; मात्र जिथे निसर्गाची हानी होणार नाही, अशी जागा निवडून प्रकल्प राबवले पाहिजेत. सध्या डेटा सेंटरबद्दलही माहिती पुढे येत असून त्यात पाण्याचा अवाढव्य वापर होणार असल्याचे दिसते. त्यामुळे निसर्गाचा विध्वंस न करता स्थानिक तरुणांना शाश्वत रोजगार देणारे उद्योग आणले पाहिजेत.

प्रकल्प पूर्णपणे कायद्याच्या चौकटीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वाढत्या संतापाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची ठाम भूमिका मांडली. कर्जत पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प हा पर्यावरणपूरक असून या माध्यमातून राज्याला आवश्यक असणारी स्वच्छ ऊर्जा उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पात कायद्याचे कोणतेही उल्लंघन झालेले नाही आणि सर्व काम नियमांच्या चौकटीत राहूनच केले जात आहे. या प्रकल्पामुळे कोणत्याही नागरिकाची उपजीविका हिरावली जाणार नाही. वरोधक केवळ राजकीय स्वार्थापोटी दिशाभूल करणारे खोटे नॅरेटिव्ह पसरवत असून अशा खोट्या प्रचाराला महाराष्ट्र थारा देणार नाही.

## वृक्षतोड तात्काळ थांबायला

वृक्षतोडीला विरोध दर्शवला आहे. ही वृक्षतोड दुर्दैवी असून ती तातडीने थांबवली पाहिजे, अशी मागणी ओमराजे निंबाळकर यांनी केली. एक झाड मोठं होण्यासाठी १५० ते २५० वर्षांचा कालावधी लागतो. निसर्गाची हानी केल्यानंतर त्याचे परिणाम काय होतात, याचा अनुभव आज आपण घेत आहोत, असं म्हणत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. एखाद्या प्रकल्पासाठी झाड तोडणं अपरिहार्य असेल, तर एका झाडाच्या बदल्यात १०० झाडं लावून ती काही वर्षं जगवण्याची जबाबदारीही निश्चित केली पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी केली. आज निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसत असताना वृक्षतोड थांबवण्यासाठी सरकारने ठोस पावलं उचलावीत, असेही ओमराजे निंबाळकर यांनी म्हटले.

फडणवीस मित्रांसाठी झाडीची कत्तल करतायंत

देवेंद्र फडणवीस हे सह्याद्रीतील झाडे तोडून हा प्रकल्प पर्यावरणवादी प्रकल्प असल्याचं म्हणत आहेत. मात्र, फडणवीस हे केवळ मित्रांसाठी झाडांची कत्तल करत असल्याचा आरोप शिवसेना नेते अनिल परब यांनी केला. या प्रकल्पासाठी एकूण ३२ हजार हून अधिक वृक्षांची कत्तल होणार आहे. मात्र, प्रत्यक्षात ७ ते ८ लाख झाडे तुटणार असल्याची गंभीर बाब विरोधकांनी समोर आणल्याचं परब यांनी म्हटलं. वनविभागाचे आकडे हे कधीच खरे नसतात. महाराष्ट्राच्या वनसंपतीला मुघलांनी देखील असा हात लावला नव्हता. मात्र, या सरकारने हे काम केलं आहे. लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे काम सरकार करत आहे. वीजनिर्मिती करताना पाऊस महत्वाचा आहे, आणि पाऊस पडायला झाडं महत्वाची आहेत. मात्र, यामुळे कोकणावरच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रावर अन्याय होत असल्याचेही परब यांनी म्हटले.

## राहुल गांधींची मानहानीच्या

मौल्यवान वेळ वाया जातो. खटला दाखल करण्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे. ठोस कारणांशिवाय खटला दाखल करू नये.' ज्येष्ठ वकील आर. एस. चीमा आणि काशी शुक्ला यांनी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (ॅण्व्श) शुभम वर्मा यांच्या न्यायालयात राहुल गांधी यांच्या वतीने युक्तिवाद केला. संतोष कुमार पांडे यांनी भाजप नेत्याचे प्रतिनिधित्व केले.२०१९ मध्ये, कर्नाटकातील कोलार येथील एका निवडणूक सभेत राहुल गांधी म्हणाले होते, 'सर्व चोरांचे आडनाव मोदीच का असते?' या वक्तव्याबद्दल त्यांच्यावर दाखल झालेल्या मानहानीच्या खटल्यात, गुजरात न्यायालयाने २०२३ मध्ये त्यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. त्यावेळी राहुल गांधी वायनाडचे खासदार होते. या शिक्षेनंतर त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले. तथापि, नंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली, ज्यामुळे त्यांना त्यांचे संसदीय सदस्यत्व पुन्हा बहाल करण्याची परवानगी मिळाली.

## मालवाहू ट्रकमध्ये ४ कोटींची

परिसरात पोलिसांनी हे वाहन अडवून त्याची तपासणी केली. यात रोख रक्कम पाहून पोलिसांना धक्का बसला. सुरुवातीच्या तपासणीत पोलिसांना संशय आल्याने त्यांनी वाहनाची कसून झडती घेतली. यावेळी पिकअप ट्रकच्या मागील भागात एक गुप्त कप्पा आढळून आला, ज्यामध्ये भारतीय चलनाच्या नोटांचा मोठा साठा होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोजणी केल्यानंतर एकूण ४ कोटी रुपयांची रोकड असल्याचे निष्पन्न झाले. वाहनात इतक्या मोठ्या प्रमाणात रोकड लपवून ठेवल्याच्या घटनेने तपास यंत्रणांचे लक्ष वेधून घेतले आहे. पोलिसांनी वाहन जप्त केले असून, त्यात असलेल्या दोन व्यक्तींना ताब्यात घेतले आहे. ही रोकड कुठून आली, ती कोणाची आहे आणि ती नागपूरला का नेली जात होती, याबद्दल त्यांची चौकशी केली जात आहे. या बाबत अद्याप अधिकृतरित्या पोलिसांनी कुठलीही माहिती दिली नाही. पोलिसांनी कायद्यानुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच, या रकमेच्या आर्थिक स्त्रोताचा तपास करण्यासाठी आयकर विभागालाही माहिती दिली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच हे स्पष्ट होईल की, जप्त केलेली रक्कम कोणाची आहे आणि ती कोणत्या उद्देशाने नेली जात होती. नागपूरशी असलेला संबंध पाहता, हे प्रकरण महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र, या रोख रकमेचा मालक कोण आहे, तिचा स्त्रोत काय आहे आणि त्यामागे काही बेकायदेशीर कृत्य आहे का, हे सर्व तपास पूर्ण झाल्यावरच निश्चित होऊ शकेल.

## राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ

पुनर्वसन केले जाईल; कुणावरही अन्याय होणार नाही. व्यापारी, दुकानदार आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास सरकार मोबदला देईल. साधुग्रामच्या भूसंपादनासंदर्भातील तक्रारीही सोडवल्या जातील. त्र्यंबकेश्वर स्टेडियमसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू असून निधीचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासकीय भवनासाठी आवश्यक निधी दिला जाईल असे यावेळी स्पष्ट केले.

दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नासाठी शिवसेना मदत करणार असल्याची घोषणा यावेळी केली. यासोबतच सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या १३ आखाड्यांतील संत-महंत आणि साधूंच्या भोजनाची व्यवस्था शिवसेनेच्या वतीने केली जाईल असेही याप्रसंगी जाहीर केले.

## अर्नब चक्रीवादळ आंध्रच्या

शाळा आणि महाविद्यालये बंद राहतील. वादळामुळे मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशसह १० राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.दरम्यान, तामिळनाडूमध्ये गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस पडत आहे. आरणीमधील भास्कर नगरमध्ये पाणी साचल्याने लोक घरात अडकून पडले आहेत. कोडाईकनालमध्ये पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे.

पुढील २ दिवसांच्या हवामानाचा आढावा- आंध्र प्रदेशमध्ये मुसळधार पावसाचा रेड अलर्ट आहे. ओडिशामध्ये ऑरेंज अलर्ट आहे. छत्तीसगड, तेलंगणा, तामिळनाडू, पुदुचेरी, केरळ, कर्नाटक आणि रायसीमामध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे.

**२८ ऑक्टोबर-** आंध्र प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि ओडिशामध्ये मुसळधार पावसाचा रेड अलर्ट आहे. झारखंडमध्ये पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे.पश्चिम बंगाल, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, पूर्व मध्य प्रदेश, विदर्भ आणि कर्नाटकमध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे.

## फॉर्म ६ मध्ये कोणतेही बदल नाही,

सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र सादर करत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीला आव्हान देणाऱ्या याचिकेच्या उत्तरात हे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलं आहे. यामध्ये आयोगाने म्हटलं आहे की, आयोगावर करण्यात आलेले सर्व आरोप तथ्यहीन आहेत. आयोगाच्या म्हणण्यानुसार, मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांनी एकमताने मंजुरी दिली होती. ज्ञानेश कुमार यांनी एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप निवडणूक आयोगाने फेटाळून लावला. तसेच एसआयआर संबंधीचे निर्णय सर्वसंमतीने घेतल्याचं निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सांगितलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

**ज्ञानेश कुमार यांनी आरोप फेटाळले**

ज्ञानेश कुमार यांनी एकतर्फी निर्णय घेतल्याचे आरोप निवडणूक आयोगाने फेटाळून लावले आहेत. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या माहिती निवडणूक आयोगाने सांगितलं की, मतदार याद्यांच्या एसआयआर प्रक्रियेशी संबंधित तिन्ही आदेश तीन सदस्यांच्या निवडणूक आयोगाद्वारे सर्वसंमतीनेच घेण्यात आले होते आणि मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांनी सर्वसंमतीने मंजुरी दिली होती.निवडणूक आयोगाच्या म्हणण्यांनुसार, एसआयआर संदर्भातील तिन्ही आदेश सर्वसंमतीने देण्यात आले होते. जून २०२५, ऑक्टोबर २०२५ आणि मे २०२६ मध्ये जारी केलेले हे तिन्ही आदेश आयोगाने सर्वसंमतीने घेतलेले निर्णय होते, असं निवडणूक आयोगाने न्यायालयाला सांगितलं आहे.

**'फॉर्म ६'बाबत आयोगाने काय म्हटलं?**

मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म ६ मध्ये केलेल्या बदलांबाबत निर्माण झालेल्या वादावर निवडणूक आयोगाने न्यायालयाला सांगितलं की, मूळ फॉर्ममध्ये कोणतीही दुरुस्ती केलेली नाही. तसेच विहित फॉर्ममध्ये बदल करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारला आहे. तसेच एसआयआर प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले घोषणापत्र हा एक स्वतंत्र दस्तऐवज आहे. मात्र, ऑनलाइन अर्जाच्या सादरीकरणावरून असा अर्थ निघू शकतो की त्यात बदल करण्यात आला आहे. पण २१ ऑक्टोबरपासून ऑनलाइन अर्ज दोन भागांत विभागला असून एक 'फॉर्म ६' आणि दुसरे स्वतंत्र घोषणापत्र, जे प्रत्यक्ष अर्जाच्या स्वरूपाशी सुसंगत असेल.

## तीन कोटी नावे कापली,

भरण्यास सांगण्यात येत आहे. मात्र फॉर्म -६ हा नव्या मतदारांच्या नोंदणीसाठी असतो, असे सांगितले. त्यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने निवडणूक आयोगाची बाजू ऐकल्याशिवाय एकतर्फी आदेश दिला जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले.महाराष्ट्रात सुरू असलेल्या एसआयआरला आव्हान देणारी याचिका अरुण आनंदगिरी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. मतदार यादीच्या मसुद्यामधून मोठ्या प्रमाणावर नावं कापण्यात आली आहेत. तसेच ज्यांची नावं यादीतून हटवण्यात आली आहेत त्यांना आपली नावे मतदारयादीत पुन्हा समाविष्ट करण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत, असा आरोप त्यांनी या याचिकेतून केला आहे. त्यावर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने याबाबत निवडणूक आयोग, केंद्र सरकार, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि महाराष्ट्र सरकारला नोटिस बजावली आहे. आता याप्रकरणी पुढील सुनावणी ही ५ नोव्हेंबर रोजी होणार आहे.यावेळी याचिकार्त्यांचे वकील अरविंद दातार यांनी न्यायालयाला सांगितले की, महाराष्ट्रामध्ये सुमारे ९ कोटी मतदार आहेत. ड्राफ्ट मतदार यादीमधून यापैकी सुमारे ३३ टक्के म्हणजे ३ कोटी मतदारांची नावं हटवण्यात आली आहेत. यापैकी सुमारे १.२२ कोटी मतदारांची नावं ही तार्किक विसंगीच्या आधारावर हटवण्यात आली आहेत. ज्या मतदारांनी आधीही मतदानाचा हक्क बजावला आहे. त्यांना मतदारयादीत त्यांचं नाव पुन्हा जोडून घेण्यासाठी नव्या मतदारांच्या नोंदणीसाठी वापरला जाणारा फॉर्म-६ का भरावा लागत आहे, असा प्रश्नही दातार यांनी उपस्थित केला. तसेच फॉर्म-६ मध्ये अर्जदाराला आपलं नाव याआधी कुठल्याही मतदार यादीत नोंदवलेलं नव्हतं, असं घोषित करावं लागतं. ही बाब आधीपासून मतदार यादीत नोंद असलेल्या लोकांसाठी कायदेशीरदृष्ट्या अडचणीत आणणारी आहे, असा दावाही दातार यांनी केला. यावेळी याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी मतदार यादीत नावं नोंदवण्यासाठीचे दावे आणि आक्षेप घेण्यासाठीची कालमर्यादा वाढवण्याचीही मागणी केली. तसेच जोपर्यंत याबाबतच्या प्रश्नांचं निराकरण होत नाही तोपर्यंत अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्याची प्रक्रिया थांबवण्यात यावी, अशी मागणीही केली. मात्र सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने निवडणूक आयोगाचा पक्ष ऐकून घेतल्याशिवाय याबाबत कुठलाही अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. याबाबत कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यापूर्वी संबंधित पक्षाची बाजू ऐकणे आवश्यक आहे. याबाबत सर्व मुद्दे आणि परिस्थितीची पडताळणी केल्यानंतर योग्य आदेशांबाबत विचार केला जाऊ शकतो, असेही संकेत सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने दिले.

## आंदोलन ३० सेकंदात

आम्ही तुमच्यासोबत आहोत आणि तुमचे म्हणणे ऐकत आहोत. रस्त्यांवर ताळे सरकारने ठोकले, मेट्रो सरकारने बंद केली आणि राजधानीला कुलूपही सरकारनेच लावले. जेव्हा मत चोरी होते, तेव्हा कोणाचेही दुकान, बचत अथवा मुलांचे भविष्य सुरक्षित राहू शकत नाही.' एवढेच नाही तर, 'मोदीजींना सांगा, आरोपी नंबर ४, ज्ञानेश कुमार यांना हटवावे; विरोधकांचे आंदोलन ३० सेकंदात थांबेल,' असेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे. '६ नोव्हेंबरला धन त्रयोदशी, ८ नोव्हेंबरला दिवाळी आणि भाऊबीज १० नोव्हेंबरला आहे. या सणांमुळे दिल्लीच्या घाऊक व किरकोळ बाजारात खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी होत असते. या काळात दिल्लीत सोनं-चांदी, कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि वाहनांच्या विक्रीतून सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा व्यापार होत असतो. आपल्या आंदोलनामुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण होऊन व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होईल, अशी भीती चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने राहुल गाधी यांना लिहिलेल्या पत्रात वर्तवण्यात आली आहे.

## आता पेट्रोलशिवाय धावणार

जाते. तर E100 म्हणजे पूर्णपणे 100% शुद्ध इथेनॉल. तुमच्या कारवर काय परिणाम परिणाम? महत्वाचे म्हणजे, १५ वर्षे अथवा त्याहून जुन्या पेट्रोल कार केवळ शुद्ध पेट्रोलसाठीच डिझाइन करण्यात आल्या होत्या. यामुळे या वाहनांमध्ये E100 वापरल्यास, फ्युएल पाइप गळणे आणि इंजिनच्या भागांचे गंभीर नुकसान होण्याचा धोका आहे. सध्या बाजारात येणाऱ्या गाड्या E20 सुसंगत आहेत, मात्र त्या थेट E100 वर चालू शकत नाहीत. यामुळे २०२६ मध्ये घेतलेल्या सामान्य गाड्यांमध्ये नियमित पेट्रोलच वापरावे लागेल.

मग ं१०० कुणासाठी? - E100 चा वापर, केवळ वाहन कंपन्यांकडून (OEMs) खास ं१०० फ्लेक्स-फ्यूल प्रमाणपत्रासह बनवल्या जाणाऱ्या विशेषत: नव्या वाहनांमध्येच केला जाऊ शतो. केव्हापासून होणार लागू आणि काय परिणाम होणार? - अधिसूचनेनुसार, हे नियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील. या बदलाचा मसुदा २७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता आणि त्यावर जनतेची मते मागवण्यात आली होती. भारत आपल्या गरजेच्या बहुतांश कच्च्या तेलाची आयात करतो. इथेनॉलचे उत्पादन देशांतर्गत होते. देशाने २०२५ पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे आपले लक्ष्य गाठले आहे आणि आता सरकारला महागडी तेल आयात आणखी कमी करायची आहे.

## आज अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या

जिल्ह्यांतील मतदारांनी उत्साहाने मतदानात सहभाग घेतला आहे. अमरावतीमधील १० हजार ९७ आणि बुलढाण्यातील ९ हजार १२४ मतदारांचे संख्याबळ मोठे असले, तरी यवतमाळ, अकोला आणि वाशिममधील मतेही निर्णायक ठरणार आहेत. पसंतीक्रमावर आधारित मतदान असल्याने पहिल्या पसंतीसोबतच पुढील पसंतीची गणिते महत्त्वाची ठरणार असून, प्रत्यक्ष मतमोजणीतूनच विजयाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

**१४ टेबलवर मतमोजणी -** अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुक मतमोजणी प्रक्रियेसाठी नियुक्त सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी काळजीपूर्वक,अचूक व शांततेत यशस्वी करावी,असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिले. अमरावती शिक्षक मतदारसंघांची मतमोजणी मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अमरावती येथील लोकशाही भवनात होणार आहे. या अनुषंगाने लोकशाही भवन येथील मतमोजणी कक्षात मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास निवडणूक निरीक्षक अभय महाजन, विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह निवडणूक प्रक्रियेशी संबंधित नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी विभागीय आयुक्त गुंडे म्हणाल्या, मतमोजणीसाठी मतमोजणी केंद्र सज्ज करण्यात आले आहे. मतमोजणी अधिकारी- कर्मचाऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मतमोजणीच्या फेरीदरम्यान शांततेत, चूक होऊ न देता आणि कोणतेही दडपण न घेता काम करावे. व्यवस्थित सर्व नमुने भरून संबंधित पथकाकडे जमा करावेत. नियुक्त अधिकारी- कर्मचाऱ्यांना आवश्यक तेथे मार्गदर्शन, मदत देण्यात येईल. मतपत्रिका वैध- अवैध बाबतचे मुद्दे, आक्षेप योग्यरित्या पध्दतीने सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती देऊन निकाली काढावेत. मतपत्रिकांवरील पसंतीक्रमानुसार मतमोजणीची प्रक्रिया असल्याने प्रत्येक टप्प्यावर विशेष काळजी घ्यावी.

निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान आपल्या कर्तव्य आणि कामकाजाची माहिती देत आढावा यावेळी सादर केला. मतमोजणीच्या दिवशी कोणतीही संदिग्धता राहू नये, यासाठी आवश्यक नियम, सूचना आणि कार्यपद्धतींचा यावेळी प्रत्यक्ष टेबलवर सराव करण्यात आला.सहआयुक्त वासंती माळी यांनी यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांऱ्यांना मतमोजणीशी संबंधित बाबींचे सविस्तर प्रशिक्षण दिले. मत मोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या शंकांचे अपर आयुक्त संजय जाधव व नरेंद्र फुलझेले यांनी निरसन केले.शिक्षक मतदार संघाच्या मतमोजणीसाठी एकुण १४ टेबल असणार आहेत. यासाठी एकाच कक्षात प्रत्येकी १४ टेबलच्या रांगा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.मतमोजणीच्या निरीक्षणासाठी नियुक्त उमेदवारांच्या प्रतिनिधीसाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, दोन मतमोजणी सहायक आणि एक शिपाई असा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आला आहे. मंगळवारी सकाळी ८ वाजता प्रत्यक्ष मतमोजणीची प्रक्रीया सुरू होणार आहे. या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार रिंगणात आहेत.

## अखेर चौदा दिवसांनी एफआयआर

**बार अध्यक्ष कशासाठी?**

या बाबत तात्काळ कारवाई करण्याची मागणी वकील बांधवांकडून करण्यात येत आहे. मात्र बार असोसिएशनचे अध्यक्ष याबाबत कुठलीही कारवाई करीत नसल्याचे दिसून येत आहे. जर न्यायाधीशांच्या समोर हा प्रकार घडला असताना बार असोसिएशनचे अध्यक्ष कुठलीही कारवाई करीत नसतील तर अशा उदासीन कारभार करणाऱ्या अध्यक्षांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा, अशी मागणी काही वकील बांधवांनी केली आहे.

**महिला व ज्युनियर वकील किती सुरक्षित?** अॅड. विनय देशपांडे गेल्या ३४ वर्षापासून सेवारत आहेत. या प्रकरणामुळे त्यांची सामाजिक प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. न्यायालय हे युक्तिवाद करण्याचे ठिकाण आहे, मारामारीचा आखाडा नव्हे. बौद्धिक वादात कमी पडून हात उचलावे लागणे म्हणजे वकिलाची बौद्धिक पातळी दर्शविते. साठ वर्षीय वरीष्ठ वकीलांच्या बाबतीत न्यायाधीश यांच्या समक्ष हे प्रकरण घडले असताना या प्रकरणी कुठलीही कारवाई होत नसेल तर ज्युनियर वकील आणि महिला वकील कितपत सुरक्षित असतिल. **- अॅड. चैत्राली कारंजेकर**

## शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक

कोणत्याही प्रकारची सक्ती किंवा अवास्तव व्याजामुळे एखादी अनुचित घटना घडल्यास, त्यास सर्वस्वी संबंधित फायनान्स कंपनीला जबाबदार धरले जाईल आणि कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी काकडे यांनी स्पष्ट केले आहे. सर्व फायनान्स कंपन्यांनी कायदेशीर तरतुदींचे पालन करून कर्जदारांवर कोणताही दबाव आणू नये, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## भटक्या श्वानाच्या हल्ल्यात बालक

शहरातील वेगवेगळ्या भागात कुत्र्यांच्या हल्ल्यात मुले गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. सरासरी दररोज एक डझनपेक्षा जास्त लोक भटक्या कुत्र्यांच्या दंशाला बळी पडत आहेत. महापालिका आणि प्रशासनाने याकडे लक्ष देऊन कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर आज

सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सर्व सामान्य नागरिकांचे जीवित रक्षण व कायदा व सुव्यवस्था हाताळण्यासाठी मतमोजणी केंद्र परिसरासमोरील मार्गावरील वाहतूक बंद करून इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे.

**प्रवेश बंदी मार्ग-**बियाणी चौक ते तपोवन गेट मार्ग दि.२७ ऑक्टोबर, २०२६ सकाळी ६ वाजता ते मतमोजणी प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत बंद राहील. मार्डी मार्गे तसेच तपोवन गेट परिसरातील निवासी वसाहतीतील वाहन चालकांना अमरावती शहरात येण्याकरीता विद्यापीठ चौक ते रचना सृष्टी ते विक्रांत लॉन ते दंत महाविद्यालय ते वडाळी ओवरब्रिज चौक ते अंधविद्यालय ते चपराशीपूरा असा पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.

बियाणी चौक ते विद्यापीठ चौक मार्गावरील नागरीवस्ती चिलम छावणी, व्यंकय्यापूरा, जिजाऊ नगर, ओम कॉलनी येथील वाहन चालकांना मुख्य मार्गावर प्रवेश बंद राहणार असल्याने त्यांनी परिसरातील उपलब्ध पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**यांना असणार सूट-** शिवनेरी कॉलनी, पंकज कॉलनी, परिसरातील रहिवाशी नागरिक व या मार्गावरील कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांना पर्यायी मार्ग नसल्याने त्यांना आपले वाहने कार्यालय व निवासस्थानी जाण्या-येण्याकरिता आवश्यक वेळी बियाणी चौकाकडे जाणाऱ्या मार्गाचा वापर करता येणार आहे. उत्कर्ष कॉलनी, पोस्टल कॉलनी, एचपी गॅस गोडाऊन, कोषागार कार्यालय, प्रबोधिनी कर्मचारी यांना पर्यायी मार्ग नसल्याने त्यांना आपले वाहने कार्यालय व निवासस्थानी जाण्याकरिता आवश्यक वेळी विद्यापीठ चौकाकडे जाणाऱ्या मार्गाचा वापर करता येणार आहे.

**यांना लागू नसणार आदेश-** हे वाहतूक नियम रुग्णवाहिका, अग्निशामक वाहन, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागू राहणार नाही. जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्या परवानगीने महत्त्वाच्या व अति महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमन निर्गमनाचे वेळी वाहतूक परिस्थितीनुसार सोडण्याचे चे अधिकार वाहतूक विभागात राहणार आहेत. अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतुकीच्या नियमनाबाबत अंशत: बदल करण्याचे अधिकार राहील असे या आदेशात सांगण्यात आले आहे.

## मल्लिकार्जुन खरगे यांच्याविरोधात

तैनात करण्यात आला होता.

आंदोलनात भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे, प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, महापौर श्रीचंद तेजवाणी, माजी महापौर चेतन गावंडे, किरण पातूरकर, नगरसेवक मिलिंद बांबल, आशिष अतकरे, सुरेखा लुंगारे, दिनेश सूर्यवंशी, ललित समदूरकर, कमल मालवीय, राजू मेटे, बादल कुळकर्णी, सचिन रासने जयंत डेहनकर, कौशिक अग्रवाल यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाळेतून दोन विद्यार्थिनी एकाच

बीटीएस नावाने असलेल्या एका समूहाच्या संपर्कात होत्या. या समूहात अभिनयाशी संबंधित चर्चा होत असल्याचे सांगितले जात आहे. पोलीस या संपर्कांच्या आणि उपलब्ध डिजिटल माहितीच्या आधारे दोन्ही विद्यार्थिनींचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत.दोन्ही विद्यार्थिनींबाबत कोणताही ठोस सुगावा लागलेला नव्हता. कोतवाली पोलीस विविध संभाव्य ठिकाणी त्यांचा शोध घेत आहेत. पोलिस तपासानंतरच दोन्ही विद्यार्थिनी कुठे गेल्या आहेत आणि कोणत्या परिस्थितीत बेपत्ता झाल्या आहेत, हे स्पष्ट होणार आहे.

## मिरवणुकीत सहभागी युवकाचा

शरीरावरील जखमा आणि घटनास्थळावरील परिस्थिती लक्षात घेता त्याच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला जात आहे. प्राथमिक अंदाजानुसार, एखाद्या अज्ञात वाहनाचे चाक करणच्या अंगावरून गेल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. करणचा मृत्यू नेमका अपघातामुळे झाला की त्यामागे अन्य काही कारण आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, दुर्गा विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाजविण्यात येणाऱ्या डीजेच्या प्रचंड कर्णकर्कश आवाजामुळे करणचा मृत्यू झाला असावा, अशी चर्चाही काही नागरिकांमध्ये सुरू आहे. मात्र, या चर्चेला कोणताही अधिकृत आधार नसून पोलिसांनीही याबाबत दुजोरा दिलेला नाही. नांदगाव पेठ पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# किन्हीराजा येथील अस्थायी पाणीपुरवठा योजना कुचकामी ; ग्रामस्थांची पाण्यासाठी वणवण !

## लाखो रुपये खर्चून उभारलेली पाणीपुरवठा योजना बंद ; दोन तलाव, पाच विहिरी आणि १२ हातपंपांची दुरवस्था

■ प्रवीण सावरे ■

**किन्हीराजा :** सुमारे १२ हजार लोकसंख्या असलेल्या किन्हीराजा गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली अस्थायी पाणीपुरवठा योजना कुचकामी ठरत असल्याचे चित्र आहे. गावापासून हाकेच्या अंतरावर सोनाळा प्रकल्प असतानाही गेल्या अनेक वर्षांपासून गावाला कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.



किन्हीराजा गावात दोन सार्वजनिक तलाव, सहा सार्वजनिक विहिरी आणि १२ हातपंप आहेत. मात्र, यातील बहुतांश जलस्त्रोतांची दुरवस्था झाली आहे. सहा विहिरींपैकी मारोती मंदिर परिसरातील एकमेव विहिरीचे पाणी पिण्यायोग्य असून, उर्वरित पाच विहिरींची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. काही विहिरींचा वापर कचराकुंड्यांप्रमाणे होत असल्याने त्यांची स्वच्छता आणि देखभाल करण्याची गरज निर्माण झाली आहे. दुसरीकडे, गावातील सर्व १२ हातपंप बंद असल्याने नागरिकांसमोर पाण्याचा पर्यायच उरलेला नाही. दोन्ही गाव तलावांतील पाणीसाठाही झपाट्याने कमी होत आहे. गावातील पाणीपुरवठा योजना बंद असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी पर्यायी व्यवस्थांवर अवलंबून राहावे लागत आहे. गावाची पाणीपुरवठा व्यवस्था खासगी बोअरवेल आणि खासगी जलशुद्धीकरण केंद्रांवर अवलंबून असल्याचे चित्र आहे. मागील उन्हाळ्यातही ही पाणीपुरवठा योजना आठवडाभरापेक्षा अधिक काळ सुरू राहू शकली नव्हती. योजनेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### तातडीने पाणीपुरवठा योजना सुरू करण्याची मागणी

गावात पाण्याचे उपलब्ध स्त्रोत असूनही त्यांची योग्य देखभाल होत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. आगामी काळात विहिरी आणि तलावांतील पाणीसाठा संपल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी बंद पडलेली अस्थायी पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करावी, तसेच गावासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेची व्यवस्था करावी, अशी मागणी किन्हीराजा येथील नागरिकांकडून होत आहे.

# किन्हीराजा आरोग्यवर्धीणी केंद्रातील २१ गावातील ४८६० लाभार्थींना मिळणार जंतनाशक गोळीचा लाभ

- आज जंतूनाशक मोहिमेला सुरवात
- वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर उखळे यांची माहिती

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

किन्हीराजा आरोग्यवर्धीणी केंद्रातील पाच उपकेंदातील १५ ग्रामपंचायतीतील २१ गावातील १ ते १९ वयोगटातील ४८६० पात्र लाभार्थीना दी २७ आक्टोम्बर मंगळवार ला जंतनाशक गोळीचे डोज देण्यात येणार असून या मोहिमेचा सर्व लाभार्थीनी लाभ घ्यावा असेआवाहण किन्हीराजा आरोग्यवर्धीणी केंद्राचे वैध्यकीय अधिकारी डॉ ज्ञानेश्वर उखळे यांनी केले आहे.



१वर्ष ते १९ वर्ष वयोगटातील मुल मुलींना जंत कृमीचा आजाराचा प्रसार हा खुप झपाट्याने होतो धूळ अस्वच्छ परिसर जास्त गोड पद्धार्तांचे सेवन यामुळे जंताचे कृमीचे प्रमाण बालकांत वाढतात त्यामुळे बालकांची पचनक्रीया ही मंदावते व त्यामुळे बालक हे अशक्त होतात याचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढते या सर्व बालकांना जंतापासुन बचाव करण्यासाठी महाराष्ट्र शाषण व आरोग्य विभागाने जंतनाशक मोहीम दि. २७ मंगळवार ला राबवीत असून या मोहिमेला लाभ सर्व लाभार्थीना घ्यावा अशी माहिती डॉ उखळे यांनी दिली असून ही मोहीम यशस्वी करण्यासाठी किन्हीराजा आरोग्यवर्धीणी केंद्रातील कवरदरी किन्हीराजा बोराळा गीव्हा कुटे दुबळवेल आमखेडा या उपतेंद्रातील २१ गावातील १५ ग्रामपंचायतीतील ४८६० बालकांना जंतनाशक गोळीचे वाटप करण्यासाठी डॉ ज्ञानेश्वर उखळे डॉ अंजली देंडवे, डॉ निकीता कुबडे, डॉ ऋषिकेश गवळी, डॉ काजल सरनाईक, डॉ सरदार चव्हाण चालक शेख शफीभाई,

परवेक्षक देनेन्द्र आडे, रतन करवते दीपमाला ढाकणे, मुक्तेश्वर घुगे, वैशाली इंगळे, पंकज अढाव सुभाष धाडे, बाळू वानखेडे सदानंद पवार, दिनेश माघाडे, सीमा गायकवाड प्रशांत मस्के ही सर्व आरोग्य यंत्रणा ही मोहीम यशस्वी करण्यासाठी कामाला लागली आहेत.

# अकोलेकरांना 'नरेडको' कडून सवलतीच्या दरात वॉटर सेव्हिंग टॅप !

## पाणीटंचाईवर मात करण्यासाठी बांधकाम व्यावसायिक संघटना सरसावल्या

## नरेडको, इंजिनियर्स, आर्किटेक्ट आणि बांधकाम कंत्राटदार असोसिएशनची संयुक्त कृती समिती स्थापन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर मात करून, अपव्यय रोखण्यासाठी अकोलेकरांना सवलतीच्या दरात वॉटर सेव्हिंग टॅप उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बांधकाम क्षेत्र प्रभावित होऊ नये तसेच नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी कृती समिती स्थापन करण्यात आली आहे.



नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरेडको), इंजिनियर्स असोसिएशन, आर्किटेक्ट असोसिएशन आणि बांधकाम कंत्राटदार असोसिएशन यांनी एकत्र येत आज पोलीस लॉन्स येथे संयुक्त बैठकीत पाणीटंचाईच्या समस्येवर सविस्तर विचारमंथन करण्यात केले. केवळ प्रशासनाकडे मागण्या करण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीतून या संकटावर मात करण्यासाठी योगदान देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने नरेडकोच्या वतीने अकोलेकरांना सवलतीच्या दरात वॉटर सेव्हिंग टॅप उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या नळांच्या वापरामुळे दैनंदिन घरगुती वापरातील पाण्याचा अपव्यय कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, यासाठी जनजागृती करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. पाणीटंचाईच्या समस्येवर तात्पुरत्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली. त्यानुसार शहरात आणि परिसरात अधिकाधिक शोषखड्डे निर्माण करून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. भूजल पातळी वाढविण्यासाठी जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असून, यासाठी अभियंते, वास्तुविशारद आणि बांधकाम व्यावसायिकांचे तांत्रिक कौशल्य उपयोगात आणले जाणार आहे. शहरातील पिण्याच्या पाण्यावरील ताण कमी करण्यासाठी बांधकाम क्षेत्रात पर्यायी पाण्याचा वापर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही बैठकीत घेण्यात आला. अकोला शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून (एऊइ) प्रक्रिया केलेले पाणी बांधकामासाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासनाशी समन्वय साधण्यात येणार आहे. या पाण्याची आवश्यक गुणवत्ता तपासून बांधकामासाठी त्याचा वापर करण्याचे नियोजन केले जाणार आहे. अकोला शहराच्या आसपास असलेल्या खदानींमध्ये साचलेल्या पाण्याचा बांधकामासाठी किंवा अन्य बिगरपिण्याच्या उपयोगांसाठी वापर करता येईल का, याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. संबंधित पाण्याची गुणवत्ता, उपलब्धता, वाहतूक व्यवस्था आणि आवश्यक प्रशासकीय परवानग्या यांचा विचार करून या पर्यायाचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शहरातील पाणीटंचाईचे संकट दूर करण्यासाठी महापालिका, जिल्हा प्रशासन आणि संबंधित शासकीय यंत्रणांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्धार चारही संघटनांनी व्यक्त केला. पाणीपुरवठा, जलसंधारण, पर्यायी जलस्त्रोतांचा शोध आणि पाणीबचतीच्या उपाययोजना राबविण्यासाठी संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून समन्वय साधण्यात येणार आहे. या उपक्रमात अभियंते, वास्तुविशारद, बांधकाम व्यावसायिक आणि कंत्राटदार यांचा सक्रिय सहभाग राहणार असून, या बैठकीत नरेडको अकोला चे अध्यक्ष तथा नगर सेवक सुनील इन्नाणी यांच्यासह पंकज कोठारी, अविनाश राऊत, अनुराग अग्रवाल, श्याम ठाकूर, अभिजित परांजपे, सोहेल खान, आर्किटेक्ट मनिष भुतडा आर्किटेक्ट सुमित अग्रवाल, कॉन्ट्रैक्टर तौफीकभाई व रफीक भाइ या पदाधिकाऱ्यांनी मांडल्या महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या.

### नागरिकांना मोफत पाणीपुरवठ्यासाठी टँकर उपलब्ध करून देणार !

शहरातील पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये नागरिकांना मोफत पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. यासाठी चारही संघटनांच्या समन्वयातून नियोजन करून प्रशासनाच्या सहकार्याने गरजू भागांमध्ये पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्याचा निर्धार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# धमकीच्या जाळ्यात अल्पवयीन मुलगी अत्याचार करून गर्भवती केल्याचा आरोप

## कॉल रेकॉर्डिंगच्या नावाखाली ब्लॅकमेल केल्याची तक्रार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहरात अल्पवयीन मुलीला धमकावून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आणि तिला गर्भवती केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. फोन कॉल रेकॉर्डिंगचा आधार घेत मुलीला ब्लॅकमेल करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली असून, कारंजा शहर पोलिसांनी एका ४५ वर्षीय किराणा दुकानदाराविरुद्ध पॉक्सो कायद्यासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एप्रिल २०२३ ते जून २०२६ या कालावधीत हा प्रकार घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. आरोपीने परिचयाचा फायदा घेत अल्पवयीन मुलीला दुकानात बोलावले. तिच्या मोबाईलमधील कॉल रेकॉर्डिंग आपल्याकडे असल्याचे सांगून ते तिच्या कुटुंबीयांना ऐकविण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

**धमकी आणि दबावाचा वापर करून अत्याचार केल्याचा आरोप**

पीडिता अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपीने तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आणि त्यातून ती गर्भवती झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आरोपीच्या घरी तसेच दुकानात बोलावून हे कृत्य केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

**पॉक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल :** या प्रकरणी २५ ऑक्टोबर रोजी कारंजा शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२)(एल), ६४(२)(एम), ३५१(२) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा (पॉक्सो) अंतर्गत कलम ४ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कारंजा हेरिटेज सिटी अभियानाला नवी दिशा

## ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या कामाला गती!



■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहराचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि नैसर्गिक वारसा जतन करून शहराला स्वतंत्र ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या कारंजा हेरिटेज सिटी अभियानाला नवी दिशा मिळत आहे. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य सचिव तथा वाशिम जिल्हा संपर्क प्रमुख डॉ. किरण कुलकर्णी यांनी अभियानाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सोहळ अभयारण्य येथे झालेल्या भेटीदरम्यान अभियानाचे मुख्य संयोजक तथा सर्वधर्म मित्र मंडळाचे अध्यक्ष श्याम सवाई यांनी संकलित माहिती व माहिती पुस्तक डॉ. कुलकर्णी यांना सादर केले. मागील भेटीत दिलेल्या सूचनांनुसार माहिती संकलनाचे काम पुढे नेण्यात आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कारंजा परिसरातील ऐतिहासिक वास्तू, प्राचीन प्रवेशद्वारे, तलाव, मंदिरे, नैसर्गिक संपदा, पारंपरिक व्यवसाय आणि सामाजिक परंपरांचे दस्तऐवजीकरण या अभियानांतर्गत करण्यात येत आहे. तसेच, इतर ठिकाणी विकसित झालेल्या हेरिटेज उपक्रमांचा अभ्यास करून त्यातील अनुभवांचा उपयोग कारंजा अभियानासाठी करावा, असे मार्गदर्शन डॉ. कुलकर्णी यांनी केले.

या वेळी उपविभागीय महसूल अधिकारी कैलास देवरे, वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे, आशिष भाऊ तांबोळकर, अभियंता लुंगे, नगर परिषदेचे उपमुख्य अधिकारी जितेंद्र पटले आणि हेरिटेज फेलो धनंजय राठोड उपस्थित होते.

# अडगावातील अपहरण-हत्या प्रकरणाचा उलगडा; तिघे आरोपी गजाआड!

## तरुणाची हत्या करून मृतदेह विहिरीत फेकला; तांत्रिक तपासातून पोलिसांना धागेदोरे

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

अडगाव बु. येथील २४ वर्षीय तरुणाचे अपहरण करून त्याची चाकूने भोसकून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मोहम्मद नाजीम अब्दुल बशीर असे मृत तरुणाचे नाव असून, त्याचा मृतदेह शेतातील विहिरीत फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणाचा तपास करत हिवरखेड पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. मोबाईल कॉलच्या तांत्रिक विश्लेषणातून या गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अडगाव बु. येथील घाना चौक परिसरात राहणारा मोहम्मद नाजीम अब्दुल बशीर हा घरी जेवण तयार ठेवण्यास सांगून दहा मिनिटांत परत येतो, असे आईला सांगत मोटारसायकलने घराबाहेर पडला. मात्र, रात्र उलटूनही तो घरी परतला नाही. त्याचा मोबाईल बंद येत असल्याने कुटुंबीयांनी गावात, परिसरात आणि नातेवाइकांकडे शोध घेतला; परंतु त्याचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर त्याचा भाऊ अब्दुल समीर अब्दुल बशीर याने हिवरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक देवानंद कायंदे करीत असताना, पोलिसांनी बेपत्ता तरुणाच्या मोबाईल क्रमांकाच्या कॉल डिटेल रेकॉर्डचे (सीडीआर) तांत्रिक विश्लेषण केले. त्यातून शेवटचा कॉल ताजनगर, अडगाव बु. येथील एजाजोद्दीन सलीमोद्दीन याला करण्यात आल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याला चौकशीसाठी बोलावले असता, तपासादरम्यान त्याने शेख साजीद शेख सादीक याच्या मदतीने नाजीमचे अपहरण करून चाकूने भोसकून हत्या केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शेतातील विहिरीतून नाजीमचा मृतदेह बाहेर काढला. घटनास्थळाचा पंचनामा आणि मृतदेहाची उत्तरीय तपासणी पूर्ण करण्यात आली. मृतदेह अंत्यविधीसाठी नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला.

तपासात एजाजोद्दीन सलीमोद्दीन (वय १९) आणि शेख साजीद शेख सादीक (वय २२), दोघेही रा. ताजनगर, अडगाव बु., यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच नसीमोद्दीन ऊर्फ सोनू अलीमोद्दीन (वय २६, रा. ताजनगर, अडगाव बु.) याने गुन्ह्यातील हत्यार लपवून ठेवल्याचे तपासात समोर आले. त्यानुसार तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणात सुरुवातीला भारतीय न्याय संहितेच्या कलम १४०(३) अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासात हत्या झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर कलम १०३(१) अन्वये वाढ करण्यात आली. पुढील तपास हिवरखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक सचिन पाटील करीत आहेत. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी आणि सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ठाणेदार सचिन पाटील, पोलीस उपनिरीक्षक देवानंद कायंदे, पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, पोलीस हवालदार विनोद खर्डे आणि पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल उकर्डे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# संत डॉ. रामराव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाविकांनी घेतला महाप्रसाद



■ प्रतिनिधी | मानोरा ■

संत डॉ. रामराव महाराज यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त २६ ऑक्टोबर रोजी बापू समाधीस्थळी विविध धार्मिक विधी आणि भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी सहा वाजता महाआरतीने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर ध्वजारोहण, दहीहंडी, विधिवत पूजन आणि आरदास हे कार्यक्रम पार पडले. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

पुण्यतिथी सोहळ्यास धर्मगुरू आ. बाबुसिंग महाराज, देविभक्त शेखर महाराज, संजय महाराज, भक्तराज महाराज, मनीष महाराज तसेच तेलंगणातील बद्या नायक यांच्यासह राज्याच्या विविध भागांतून आलेले भाविक उपस्थित होते. समाधीस्थळी महाआरती करण्यात आली. त्यानंतर मंदिर परिसरात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. पुढे पारंपरिक पद्धतीने दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर विधिवत पूजन करून धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले.

# 'मत वाचवा, देश वाचवा' अभियानातून काँग्रेस आक्रमक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्षाने 'मत वाचवा, देश वाचवा' हे देशव्यापी जनजागृती अभियान सुरू केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरापासून बूथ स्तरापर्यंत जनजागृती आणि संघटनात्मक सक्रियतेवर भर दिला जात असल्याची माहिती काँग्रेसचे माजी केंद्रीय मंत्री तथा मध्य प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी प्रदेशाध्यक्ष अरुण यादव यांनी वाशिम येथे दिली.

वाशिम येथील पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी यादव यांनी भाजपवर मतदारांच्या मतदानाच्या अधिकारात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला. छोट्या निवडणुकांपासून लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपर्यंत मतदार याद्यांमधील कथित अनियमिततेचा मुद्दा काँग्रेसने उपस्थित केला असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांच्या राजीनाम्याची मागणीही त्यांनी केली.



**अरुण यादव यांचा निशाणा**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मतदारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी देशव्यापी आंदोलन उभारण्यात येत आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, हरियाणा आणि अन्य राज्यांतील मतदार याद्यांमधील कथित त्रुटींचा मुद्दा राहुल गांधी यांनी जनतेसमोर आणल्याचे यादव म्हणाले. महाराष्ट्रातील मतदारांच्या संख्येत झालेल्या कथित अचानक वाढीबाबतही त्यांनी संशय व्यक्त केला.

मतदार याद्यांमधील नावांची नोंदणी आणि नावे वगळण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता असावी, तसेच एसआयआर प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी काँग्रेसची मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मतदार यादीतून नावे वगळल्यामुळे अन्याय झालेल्या नागरिकांना न्याय मिळेपर्यंत 'मत वाचवा, देश वाचवा' अभियान सुरूच राहील, असेही त्यांनी सांगितले.

येत्या १ नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथे काँग्रेसच्या वतीने भव्य संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले. पत्रकार परिषदेला जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजू चौधरी, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शाम उमाळकर, ॲड. निलेश कानकिरड, पिंटू भालेराव, जावेद सौदागर, नंदाताई गणोदे, जय चव्हाण, गजानन गोटे, वैभव सरनाईक, नगरसेवक राजू वानखेडे, दिलीप देशमुख, किसनराव मस्के, उज्ज्वल देशमुख, अरविंद लाठिया, सागर गोरे, महादेव सोळंके, मधुकर जुमडे, परशराम भोयर, सुरेश रत्नपारखी, मोहन चौधरी यांच्यासह विविध तालुका व शहर पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३२९ ■ मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नका; विचारांची विवेकबुद्धी जागवा

## मुकुल कानिटकर यांचे युवकांना आवाहन ; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव उत्साहात

**वर्धा जनमाध्यम :** आई-वडील, संत आणि धर्मगुरूंना प्रश्न विचारणाऱ्या आजच्या युवकांमध्ये मेटा, फेसबुक आणि इन्स्टाग्रामासारख्या समाजमाध्यमांना प्रश्न विचारण्याची हिंमत दिसत नाही. समाजमाध्यमे आपल्यावर राज्य करणारी यंत्रणा बनत असून, त्यातून विचारांवर परिणाम करणारे घटक पसरवले जात आहेत. ही नशा असून, त्यावर विजय मिळविण्यासाठी युवकांनी विवेक जागृत ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सदस्य तथा प्रचार विभाग प्रमुख मुकुल कानिटकर यांनी केले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वर्धा यांच्या वतीने केसरीमल कन्या शाळेच्या प्रांगणात विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून कानिटकर बोलत होते. अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चच्या कुलसचिव डॉ. श्वेता काळे (पिसुळकर) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मंचावर जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत आणि नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख उपस्थित होते.

कानिटकर म्हणाले, भारतीय संविधानाने नागरिकांना अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. अभिव्यक्तीचे आणि विरोधाचे स्वातंत्र्य दिले असले, तरी विरोधाचे रूपांतर अराजकतेत होता कामा नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधाननिर्मितीविषयक विचारांचे चिंतन प्रत्येकाने केले पाहिजे. भारत हा सनातन विचारांचा देश असून, त्याच्या संस्कृतीत त्यागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शस्त्रपूजन, योगासने, सांघिक कवायत, सुभाषित, सांघिकगीत, वैयक्तिक गीत आणि अमृतवचन सादर करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. प्रसाद देशमुख यांनी केले. माजी खासदार रामदास तडस, संत सयाजी महाराज, भूमादेवी, मुकेशनाथ महाराज, मयूर दरणे महाराज, माधुरी दीदी, अमोल ढोमणे, विलास कुलकर्णी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**त्यागाचा संस्कार भगवा ध्वज देतो -** समाजाच्या उभारणीसाठी उत्तम चारित्र्याचे व्यक्तिमत्त्व घडविणे आणि समाजाला संघटित करणे आवश्यक आहे. संवाद तुटल्याने सामाजिक प्रश्न निर्माण होतात. समरसता निर्माण करण्यासाठी प्रत्येकाला सन्मान देणे गरजेचे आहे. राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी संयम आवश्यक असून, प्रत्येकाने दिवसातील एक तास देशासाठी द्यावा, असे आवाहन कानिटकर यांनी केले. योगदिनामुळे भारतीय योगपरंपरेला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाल्याचे सांगत त्यांनी भगव्या ध्वजाच्या त्यागमूल्यांचे महत्त्वही अधोरेखित केले.

राष्ट्रनिर्माणाची सुरुवात मनुष्यनिर्माणातून होते. आजचा युवक हा केवळ देशाचे भविष्य नसून वर्तमानही आहे. त्यामुळे युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासातून राष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त होतो, असे मनोगत डॉ. श्वेता काळे (पिसुळकर) यांनी व्यक्त केले.

# प्रशासन नमले; बोर प्रकल्पातून रब्बीसाठी दोन पाण्याच्या पाळ्या जाहीर

## ‘शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारा निर्णय रद्द करा’ या वृत्ताने वेधले लक्ष सेलडोह-केळझरच्या पाणी वापर संस्थांच्या पाठपुराव्यालाही यश

**सेलू / अभय बेदमोहता**

रब्बी हंगामासाठी बोर प्रकल्पातून पाणी मिळणार नसल्याच्या निर्णयामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाला अखेर दिलासा मिळाला आहे. ‘शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारा निर्णय रद्द करा; रब्बी हंगाम नको, खरीप हंगामासाठी दोन पाणी द्या’ या मथळ्याखाली दैनिक जनमाध्यमने शेतकऱ्यांची व्यथा मांडली होती. या वृत्तानंतर बोर प्रकल्पातून रब्बी पिकांसाठी दोन पाण्याच्या पाळ्या देण्याचे वेळापत्रक जाहीर झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे. जनमाध्यमने उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे सिंचनाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाच्या निर्णयाकडे तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.


जनमाध्यम

शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारा निर्णय रद्द करा

जनमाध्यमचा दणका

**पाणी नाकारल्याने शेतकरी संकटात**

रब्बी हंगामाच्या तोंडावर बोर प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी मिळणार नसल्याची भूमिका प्रशासनाकडून मांडण्यात आली होती. त्यामुळे हरभरा, चारा आणि अन्य रब्बी पिकांचे नियोजन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. आधीच पावसाच्या अनिश्चिततेमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर पिके जगवायची कशी, असा गंभीर प्रश्न उभा राहिला होता. जनमाध्यमने या प्रश्नाला वाचा फोडत प्रशासनाच्या निर्णयावर लक्ष वेधले होते.

**पाणी वापर संस्थांचा पाठपुरावा फळाला**

सेलडोह आणि केळझर येथील पाणी वापर संस्थांचे अध्यक्ष मुकिंदा खोडे आणि मिलिंद हिवलेकर यांनी शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि आमदार समीर कुणावार यांच्या प्रयत्नांचाही या निर्णयात महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगण्यात येत आहे. अखेर रब्बी पिकांसाठी दोन पाण्याच्या पाळ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

पाण्याचे वेळापत्रक जाहीर प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, पहिली पाळी १६ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६, तर दुसरी पाळी १० डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२६ या कालावधीत राहणार आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून हरभरा, चारा आणि दोन पाण्यांवर येणाऱ्या पिकांचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जनमाध्यमच्या वृत्ताची चर्चा**

पाणी नाकारण्याच्या निर्णयामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दोन पाण्याच्या पाळ्यांच्या घोषणेने काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, हा दिलासा पुरेसा आहे का, हा प्रश्न कायम आहे. जनमाध्यमने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठविल्यानंतर आणि पाणी वापर संस्थांनी पाठपुरावा केल्यानंतर हा निर्णय जाहीर झाल्याने तालुक्यात या घडामोडीची चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांना वेळेत आणि नियोजनानुसार पाणी मिळावे, तसेच उपलब्ध जलसाठ्याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा दणका

## ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ७.०८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम** जिल्ह्यात अवैध रेती वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वडनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आर्वी छोटी येथे विनापरवाना काळ्या रेतीची वाहतूक करताना ट्रॅक्टर-ट्रॉली पकडण्यात आली. या कारवाईत ट्रॅक्टर, ट्रॉली आणि रेती असा एकूण ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गोपीचंद महादेवराव डफ (वय ४५, रा. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस अहवालानुसार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.५५ वाजताच्या सुमारास आर्वी छोटी परिसरात ही कारवाई करण्यात आली. यावेळी लाल रंगाचा मेसी फर्ग्युसन ७५० डीआय ट्रॅक्टर (क्रमांक एमएच ३२ एच ३१८४), विनाक्रमांकाची ट्रॉली आणि अंदाजे सव्वा ब्रास काळी रेती असा मुद्देमाल आढळून आला.

पोलिसांनी रेती वाहतुकीसंदर्भात रॉयल्टीची पावती तसेच वाहनाची आवश्यक कागदपत्रे मागितली. मात्र, संबंधित व्यक्तीला ही कागदपत्रे सादर करता आली नाहीत. त्यामुळे पंचांसमक्ष मुद्देमाल ताब्यात घेऊन वडनेर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १३०/१७७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास वडनेर पोलीस करीत आहेत.

# वर्ध्यातून १२ दिवसांपासून तरुण बेपत्ता, अपहरणाचा संशय

## भावाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील दयालनगर परिसरातील अंकुश हिरामण खिल्लारे (३५) हा तरुण १४ ऑक्टोबरपासून बेपत्ता आहे. नातेवाइकांसह विविध ठिकाणी शोध घेऊनही त्याचा थांगपत्ता न लागल्याने अपहरणाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी २५ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला.

अंकुश खासगी वाहनावर चालक म्हणून काम करीत होता. १४ ऑक्टोबर रोजी त्याचा मोठा भाऊ प्रविण खिल्लारे कामासाठी सेवाग्राम येथे गेला होता.




सायंकाळी घरी परतल्यानंतर अंकुश घरी नसल्याचे त्याच्या लक्षात आले. सुरुवातीला तो कामावरून परत येईल, अशी अपेक्षा कुटुंबीयांना होती. मात्र, रात्री उशिरापर्यंत तो न परतल्याने मोबाईलवर संपर्क साधला असता फोन बंद येऊ लागला.

रेल्वे स्थानक, बसस्थानक आणि नातेवाइकांकडे शोध घेऊनही तो मिळून आला नाही. अंकुशच्या उजव्या हातावर मराठीत त्याचे नाव गोंदलेले असून, बेपत्ता होताना त्याने फिकट गुलाबी शर्ट, सिमेंट रंगाची पँट आणि राखाडी सँडल घातली होती. या प्रकरणाचा पुढील तपास वर्धा शहर पोलीस करीत आहेत.

# घरात आढळला मृतदेह

## दोन दिवसांपासून घराबाहेर न दिसल्याने उघडकीस आली घटना

**पुलगाव जनमाध्यम :** शहरातील दखनीफैल परिसरात बंदे अली फकरुद्दीन (वय ६०) यांचा घरातील पलंगावर मृतदेह आढळून आला. २५ ऑक्टोबर रोजी ही घटना उघडकीस आली. मृत्यूचे नेमके कारण समजू शकले नाही. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.



बंदे अली हे दखनीफैल परिसरात एकटेच राहत होते. ते दोन दिवसांपासून घराबाहेर दिसले नसल्याने त्यांच्या परिचिताने घरी जाऊन पाहणी केली. यावेळी ते पलंगावर मृतावस्थेत आढळले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ग्रामीण रुग्णालयात हलविला. मृताला कमरेचा त्रास होता आणि ते नेहमी आजारी राहत होते, अशी माहिती तक्रारदाराने पोलिसांना दिली. त्यांच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचेही नमूद केले. पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.

# जळगावात बिबट्याची दहशत

## दोन गायींचा फडशा, ग्रामस्थांच्या जीवाला घोर

### बिबट्याचा मुक्तसंचार; बंदोबस्ताची मागणी

**आर्वी । जनमाध्यम** जळगाव परिसरात बिबट्याचा धुमाकूळ सुरू असून, रात्रीच्या अंधारात दोन गायींना ठार केल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आणखी एखादी गंभीर घटना घडण्याची वाट वनविभाग पाहणार काय, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. जळगाव परिसरातील बिबट्याच्या हल्ल्यात पशुपालक गणपती लक्ष्मण बोके यांच्या दोन गायी ठार झाल्या. त्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने शेतात जाण्यासाठीही नागरिक धास्तावत आहेत. रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही धोक्याचे वाटू लागले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे.मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभागाकडून उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगण्यात येत आहे. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक ठिकाणी ट्रॅप कॅमेरेही बसविण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, बिबट्याचा वावर कायम असल्याने या उपाययोजनांचा प्रत्यक्ष परिणाम कधी दिसणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात दोन गायी गमावलेल्या गणपती बोके यांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी. बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# दिवाळीच्या फराळावर महागाईचा घाला

## डाळींचे दर २५ ते ३० टक्क्यांनी भडकले; खरेदीचे बजेट कोलमडले

### कमी पावसाचा उत्पादनाला फटका ; मिठाई, फरसाण महागण्याची शक्यता

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीचा सण तोंडावर आला असताना महागाईने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावली आहे. दिवाळीच्या फराळासाठी लागणाऱ्या डाळींच्या दरात गेल्या काही महिन्यांत २५ ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने गृहिणींचे आर्थिक गणित बिघडले आहे. मिठाई, फरसाण आणि विविध खाद्यपदार्थांच्या तयारीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने यंदाचा दिवाळी फराळ महागण्याची चिन्हे आहेत. सणाचा उत्साह कायम असला, तरी वाढत्या खर्चामुळे सर्वसामान्य ग्राहकांचे बजेट मात्र कोलमडले आहे.



कमी पर्जन्यमानामुळे कृषी उत्पादनावर परिणाम झाल्याचे सांगितले जात असून, बाजारात विविध डाळींच्या दरांनी उसळी घेतली आहे. बेसनासह फराळासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांच्या किमती वाढल्याने घरगुती फराळाचा खर्चही वाढण्याची शक्यता आहे.

आधीच महागाईचा सामना करणाऱ्या कुटुंबांना आता सणासुदीच्या खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर डाळींची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये दरवाढीबाबत चिंता व्यक्त होत आहे. मात्र, दिवाळीपर्यंत दर आणखी वाढतीलच, असे निश्चितपणे सांगता येत नाही. बाजारातील आवक, मागणी आणि पुरवठा यावर आगामी दरांची दिशा अवलंबून राहणार आहे. काही डाळींच्या किमतींमध्ये किरकोळ चढ-उतार होऊ शकतात, तर काहींचे दर स्थिर राहण्याचीही शक्यता आहे.

भाववाढीच्या भीतीने गरजेपेक्षा अधिक खरेदी केल्यास बाजारातील मागणीवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. त्यामुळे ग्राहकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या गरजेनुसारच खरेदी करावी, असा सल्ला दिला जात आहे. दिवाळीचा गोडवा टिकवायचा असेल, तर वाढत्या महागाईच्या काळात खर्चाचे नियोजन करणे सर्वसामान्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

# दारूच्या व्यसनातून नैराश्य गळफास घेऊन आत्महत्या

**पुलगाव जनमाध्यम :** नाचणगाव येथील तुकडोजी चौक परिसरात दीपक विठ्ठलराव इंगळे (वय ४३) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २५ ऑक्टोबर रोजी दुपारी उघडकीस आली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

दीपक हे पत्नी आणि तीन वर्षांच्या मुलासह राहत होते. त्यांची पत्नी मागील पंधरा दिवसांपासून माहेरी गेली होती. दरम्यान, दीपक यांचे मोठे भाऊ किशोर इंगळे कामावर असताना त्यांच्या पत्नीचा फोन आला. घरी पोहोचल्यावर दीपक पहिल्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले.



घटनेची माहिती डायल ११२ वर देण्यात आली.

दीपक यांना दारू पिण्याची सवय होती. ते सतत विचारात राहत आणि चिडचिड करीत असल्याचे त्यांच्या भावाने सांगितले. त

यांच्या मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.

# धनादेश अनादर भोवला ; कर्जदाराला सहा महिने कारावास

## एक लाखाच्या कर्जासाठी दिलेला धनादेश वटला नाही; दीड लाखांची नुकसानभरपाई देण्याचे न्यायालयाचे आदेश

**हिंगणघाट जनमाध्यम .** कर्जाची परतफेड करण्यासाठी दिलेला धनादेश अनादरित झाल्याने कर्जदाराला न्यायालयाने दणका दिला आहे. एक लाख रुपयांचे कर्ज घेतल्यानंतर परतफेडीसाठी दिलेला धनादेश वटला नाही. या प्रकरणात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी ए. एच. सैयद यांनी माधुरी अशोक खडसे यांना सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच पतसंस्थेला दीड लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. नुकसानभरपाई देण्यात कसूर झाल्यास आणखी एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.

शहरातील संत तुकडोजी नागरी सहकारी पतसंस्थेकडून माधुरी अशोक खडसे यांनी २५ मे २०१८ रोजी संस्थेच्या नियमांनुसार आवश्यक दस्तऐवज पूर्ण करून एक लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, कर्जाची परतफेड न केल्याने पतसंस्थेने त्यांना रक्कम भरण्याची विनंती केली. त्यानंतर कर्जफेडीसाठी त्यांनी पतसंस्थेला एक लाख ६० हजार रुपयांचा धनादेश दिला. मात्र, हा धनादेश बँकेत



वटविण्यासाठी सादर केला असता तो अनादरित झाला. त्यामुळे पतसंस्थेने कायदेशीर कारवाईचा मार्ग स्वीकारला.धनादेश अनादरित झाल्याने पतसंस्थेचे व्यवस्थापक मधुसूदन वामन कानकाटे यांनी परक्राम्य लेख अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये न्यायालयात तक्रार दाखल केली. प्रकरणाची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी ए. एच. सैयद यांच्या न्यायालयात झाली.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध झाल्याचे मान्य करत सहा महिन्यांचा साधा कारावास आणि दीड लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. नुकसानभरपाई भरण्यात कसूर केल्यास अतिरिक्त एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. पतसंस्थेतर्फे ॲड. एच. एस. बोंडे यांनी बाजू मांडली.

## जाहीर सूचना

माझे पती गोविंद बापुराव फटीक याचे दिनांक १८ मे २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दोनचाकी वाहन क्रमांक श्प्३२न्न्८४७४ हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव श्रीमती गिता गोवींद फटीक वय (७१) वार्ड न. ५ हिंगणघाट फ़ैल पुलगाव जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र

**गिता गोवींद फटीक**

वार्ड न. ५ हिंगणघाट फ़ैल पुलगाव जि. वर्धा - ९४०३५७६५८१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राज्यातील दोन राखीव वनक्षेत्राना अभयारण्याचा दर्जा

## १४ संवर्धन राखीव क्षेत्रे घोषित करण्यास मान्यता-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. २६ :** गडचिरोली जिल्ह्यातील रानम्हशींसाठी ओळखल्या जाणाऱ्या कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्रास वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यात तसेच तानसा वन्यजीव अभयारण्य क्षेत्राजवळील नवीन विस्तारित तानसा वन्यजीव अभयारण्यास वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्य जीव मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच पुणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, ठाणे, पालघर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील १४ संवर्धन राखीव क्षेत्रांच्या प्रस्तावांना मान्यताही यावेळी देण्यात आली.महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची २६ वी बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच वन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, मंडळाचे सदस्य तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांच्यासह मंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते.

**महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या २६ व्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय**

गडचिरोली जिल्ह्यातील कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्राला वन्यजीव अभयारण्य घोषित करण्याच्या प्रस्तावालाही यावेळी मान्यता देण्यात आली. कोलामार्का संवर्धन क्षेत्र हे रानम्हशींसाठी उपयुक्त क्षेत्र असल्याने त्यास अभयारण्य म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याशिवाय पुणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, ठाणे, पालघर आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील १४ संवर्धन राखीव क्षेत्रांच्या प्रस्तावांना मान्यता दिली. यामध्ये पुणे/रायगड जिल्ह्यातील वेल्हे मुळशी, पुणे जिल्ह्यातील भोरगिरीगड, नाशिकमधील डिंडोरी, सुरगना व ताहाराबाद, नंदुरबारमधील चिंचपाडा, रायगडमधील अलिबाग व घेरा मानिकगड, पुणे/रायगडमधील लोणावळा, ठाणेमधील गुमतारा, पालघरमधील जव्हार, आणि औरंगोड व धामणी आणि चंद्रपूरमधील एकारा यांचा समावेश आहे.तानसा वन्यजीव अभयारण्य मानव विरहीत करण्यासाठी नवीन विस्तारित तानसा वन्यजीव अभयारण्यात मौजे ओगदा, खोडदे, तिरमाळ, पाचघर, फणसाड आणि आमले या सहा गावांतील ५८८.७६७ हेक्टर महसुली व खासगी क्षेत्र समाविष्ट करण्याच्या प्रस्तावास मंडळाने मान्यता दिली.

कोका वन्यजीव अभयारण्यातील १००.१३९ चौरस किलोमीटर आणि जायकवाडी पक्षी वन्यजीव अभयारण्यातील २५५.७९ चौरस किलोमीटर क्षेत्र धोकाग्रस्त वन्यजीव अधिवास म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावांनाही मंडळाने मान्यता दिली.अभयारण्यांमधील धरणांची दुरुस्ती, पुनर्वसन आणि गाळ काढण्याची नियमित कामे संबंधित अभयारण्याच्या व्यवस्थापन आराखड्यात समाविष्ट करावीत. नियमांशी सुसंगत मानक कार्यपद्धती तयार करून तीन महिन्यांत व्यवस्थापन आराखड्यांमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात. या कामासाठी प्रत्येक वेळी स्वतंत्र मान्यता घेण्याऐवजी संबंधित वन्यजीव अधिकाऱ्यांना पूर्वसूचना देण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.



संरक्षित क्षेत्रे, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रे आणि व्याघ्र प्रभ्रमणमार्गातील सिंचन, आरोग्य, पाणीपुरवठा, पूल, रस्ते, भूमिगत ऑप्टिकल फायबर, वीजवाहिनी आदींसह इतर पायाभूत सुविधांच्या प्रस्तावांनाही यावेळी मान्यता देण्यात आली.राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पांचे गाभा, बफर व अधिसूचित पर्यावरण संवेदनशील क्षेत्र शांतता क्षेत्र म्हणून अधिसूचित करणे, मानव-वन्यजीव संघर्षाला नैसर्गिक आपत्ती घोषित करणे आणि व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील इच्छुक गावांच्या पुनर्वसनासाठी धोरण तयार करणे या प्रस्तावांवरही बैठकीत चर्चा झाली. आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांची जबाबदारी, विद्यमान नुकसानभरपाई व्यवस्था आणि वन विभागाचे अधिकार यांची सुसंगती तपासून पुढील कार्यवाही करावी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अभयारण्य म्हणून घोषित झालेली; मात्र अद्याप प्रादेशिक वन विभाग किंवा वन विकास महामंडळाच्या व्यवस्थापनाखाली असलेली क्षेत्रे वन्यजीव शाखेकडे देण्याबाबत कर्मचारी समायोजन, प्रतिनियुक्ती आणि रिक्त पदांचा अभ्यास करून एका महिन्यात निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

## 'आरोग्यदायी महाराष्ट्र' कॉफी टेबल बुकचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई, दि. २६ :** मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या डिसेंबर २०२४ पासूनच्या कामकाजाचा



मदत कक्षाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीसह विविध उपक्रमांच्या कार्याचा आढावा मांडणाऱ्या 'आरोग्यदायी महाराष्ट्र' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे झाले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रवींद्र चव्हाण, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक उपस्थित होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी आढावा या कॉफी टेबल बुकमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. कक्षाच्या कार्याची ओळख, उद्देश, कार्यपद्धती, विविध योजना, उपक्रम, लाभार्थ्यांना मिळालेली मदत आणि रुग्णांच्या यशोगाथा यांचे दस्तऐवजीकरण या पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय योजनांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियेची माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. विविध योजनांचे स्वरूप, कायदे, नियम, लाभार्थी घटक, अंमलबजावणीची कार्यपद्धती तसेच कक्षाच्या कामकाजाची सविस्तर माहिती यात समाविष्ट आहे.

## दुष्काळ जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांतील प्रत्येक गावात किमान १०० जलशोषक खड्डे

**मुंबई, दि. २६ :** राज्यातील खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) आणि ट्रिगर-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०४ तालुक्यांतील प्रत्येक गावात किमान १०० जलशोषक खड्डे तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. या तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारणाची विविध कामेही हाती घेण्यात येणार आहेत. अपुरा पाऊस आणि दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारण विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

विभागाच्या योजनांतील प्रगतिपथावरील आणि अपूर्ण कामे पूर्ण करण्यासह जलसंधारण संरचनांच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्यात येणार आहे. सर्व बंधाऱ्यांवर गेट किंवा फळ्या बसवून पाणी अडविणे, नादुरुस्त कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करून नीडल बसविणे, जलसाठ्यांतील गाळ काढणे, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, वनराई बंधारे उभारणे तसेच बंधारे, तलाव आणि नाला खोलीकरणाच्या ठिकाणी रिचार्ज शाफ्ट तयार करण्यात येणार आहेत. शासकीय व खासगी इमारतींवर पर्जन्यजल संचयन संरचना उभारण्याचाही यात समावेश आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या कामांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.या कामांसाठी जलयुक्त शिवार अभियान २.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.०, जिल्हा नियोजन निधी, विविध घटक व उपयोजना, खनिज विकास निधी, खासदार व आमदार निधी, कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधी, रोजगार हमी योजना आणि अन्य उपलब्ध शासकीय निधीचा वापर करण्यात येणार आहे. रोजगार हमी योजना किंवा व्हीबी जी राम जी योजनेच्या निधीतून जास्तीत जास्त कामे हाती घेण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.दुरुस्तीची कामे निवडताना जलदर्पण अपवरील आद्ययावत माहितीची पडताळणी केली जाणार आहे.

**■ मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड**

**■ मृद व जलसंधारणाची अकरा प्रकारची कामे हाती घेण्याचा निर्णय**

प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के मर्यादेतील आणि २५ लाख रुपयांपेक्षा कमी खर्चाच्या दुरुस्ती कामांना मंजुरी देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राहतील. सर्व कामांचे जिओ-टॅगिंग करून संबंधित योजनांच्या पोर्टलवर माहिती अद्ययावत करावी लागणार आहे. जिल्ह्यातील कार्यकारी अभियंत्यांनी अधीक्षक अभियंत्यांमार्फत कामांचा गोषवारा दर १५ दिवसांनी शासनाला सादर करावा, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. हा शासन निर्णय राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# 'हर घर संत रविदास विचार-विकसित महाराष्ट्र' विशेष अभियान राज्यात व्यापक स्वरूपात राबवा-मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, दि. २६ :** संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त नोव्हेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत राबविण्यात येणारे 'हर घर संत रविदास विचार–विकसित महाराष्ट्र' हे विशेष अभियान राज्यात व्यापक स्वरूपात राबवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. संत रविदास महाराजांनी मांडलेले मानवता, समता, करुणा आणि दुःखमुक्त समाजाचे विचार तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावेत. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी यंत्रणा उभारावी, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विशेष अभियानाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रवींद्र चव्हाण, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक, सहसमन्वयक रविंद्र राठोड हे उपस्थित होते. तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील,वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे आणि बार्टीच्या महासंचालिका डॉ. दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

**संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम नाशिक येथे होणार**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक सामाजिक आणि वैचारिक अभिसरण घडवून आणणे हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. संत रविदास महाराजांनी समता, मानवता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाची शिकवण दिली. हे विचार केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता समाजाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनावेत, यासाठी प्रयत्न करावेत. संत रविदास महाराजांच्या विचारांवर आधारित हे अभियान समाजातील सर्व घटकांना जोडणारे आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करणारे ठरेल.विविध सामाजिक परंपरांमधील साम्यस्थळे आणि संतविचारांतील एकात्मतेचा संदेश समाजासमोर आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव अधिक दृढ करण्यासाठी या अभियानाचा उपयोग होईल. 'हिंद की चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध समाजघटकांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. त्याच धर्तीवर संत रविदास महाराजांच्या जयंती वर्षानिमित्त आयोजित उपक्रमांतूनही सामाजिक एकतेचा व्यापक संदेश दिला जावा.या अभियानासाठी संबंधित विभागांनी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा उभारून निर्धारित कार्यक्रम वेळेत पूर्ण करावेत. अभियानाच्या नियोजनापासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतच्या कामांचा सातत्याने आढावा घेण्यासाठी समिती गठित करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम नाशिक येथे होणार आहे. या कुंभमेळ्यात देशभरातून मोठ्या संख्येने भाविक व नागरिक सहभागी होतात. या पार्श्वभूमीवर संत रविदास महाराजांचे विचार आणि त्यांच्या जयंती वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या अभियानाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविता येईल.कुंभमेळ्यात येणाऱ्या दहा कोटींहून अधिक नागरिकांपर्यंत कमी खर्चात प्रभावीपणे जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव आहे. व्यापक जनसहभागाच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार करणे शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

## गुणवत्तापूर्ण औषधांसाठी आरोग्य विभागाचे ड्र्ग डिटेक्शन मशीन-आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती

**मुंबई, दि. २६ :** नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देताना डॉक्टरांची उपलब्धता, पायाभूत सुविधा आणि औषधांचा पुरवठा यांच्याइतकेच औषधांचे गुणवत्ता नियंत्रण महत्वाचे आहे. नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांमधून गुणवत्तापूर्ण औषधांचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील आठ विभागांत आधुनिक औषध शोध यंत्र (ड्र्ग डिटेक्शन मशीन) कार्यान्वित केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाला पुरवठा होत असलेली औषधे गुणवत्तापूर्ण असावीत यासाठी पहिल्यांदाच ड्र्ग डिटेक्शन यंत्रणा वापरण्यात येत असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.या यंत्रणेच्या माध्यमातून औषधांच्या नमुन्यांची प्राथमिक तपासणी करून संशयित अथवा गुणवत्तेबाबत त्रुटी आढळणारे नमुने पुढील प्रयोगशाळीय पडताळणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. औषध खरेदी आणि पुरवठा



प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नियमित देखरेख निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्वपूर्ण ठरणार असल्याचे मंत्री आबिटकर म्हणाले.आरोग्य भवन येथे आरोग्यमंत्री मंत्री आबिटकर यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ. संजय काटकर, डॉ. सुनील भोकरे उपस्थित होते. यावेळी औषध शोध यंत्राचे प्रात्यक्षिक देण्यात आले. हे यंत्र नोबेल विजेते शास्त्रज्ञ सर. सी. व्ही. रमण यांच्या रमण इफेक्टवर काम करते.

नागरिकांपर्यंत गुणवत्तापूर्ण औषधे पोहोचावीत, या उद्देशाने वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणासह सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध यंत्रणांमार्फत होणाऱ्या औषध खरेदीची सातत्याने तपासणी करण्यात येणार आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतरच तपासणी करण्याऐवजी औषध पुरवठ्याच्या संपूर्ण प्रक्रियेवर नियमित आणि अचानक नमुना तपासणीद्वारे देखरेख ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.विभागाच्या वतीने अशा स्वरूपाची औषध शोध यंत्रणा सुरू करण्यात आली असून, राज्यातील आठ विभागांमध्ये यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

## सहकार प्रशिक्षणासाठी राज्यभर एकसमान अभ्यासक्रमाची आखणी

**मुंबई, दि. २६ :** राज्यातील सहकारी संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि आधुनिक करण्यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण पावले उचलण्यात येत आहेत. राज्यातील शासनमान्य १७ प्रशिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रमात समानता आणण्यासाठी 'एक राज्य, एक मूलभूत अभ्यासक्रम' ही संकल्पना राबविणे, प्रशिक्षण निधीच्या संकलनासाठी एक खिडकी पद्धत विकसित करणे आणि प्रशिक्षणाच्या गुणवत्तेनुसार निधीचे वितरण करणे आदी महत्वपूर्ण शिफारशींवर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीस सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, महाराष्ट्राचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, पुणे येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंटचे उपसंचालक डॉ. देवदत्त दिवेकर, नागपूर येथील धनंजयराव गाडगीळ सहकारी व्यवस्थापन संस्थेचे प्रतिनिधी तसेच सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सहकारी संस्थांच्या सभासद, संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विभागीय सहनिबंधक योगिराज सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने तयार केलेल्या अहवालावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. समितीने प्रशिक्षण अभ्यासक्रमांची पुनर्रचना, आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश, प्रशिक्षण शुल्क, सहकार शिक्षण निधीचे अंशदान आणि त्याच्या वितरणाबाबत विविध शिफारशी केल्या आहेत. सहकारी संस्थांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन पारंपरिक प्रशिक्षणाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची शिफारस समितीने केली आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा सहकार व बँकिंग क्षेत्रातील वापर, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन आर्थिक व्यवहार, सायबर सुरक्षा, ऑनलाइन लेखापरीक्षण, माहिती व्यवस्थापन आणि डिजिटल फसवणूक प्रतिबंध यांचा समावेश आहे. राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्थांमध्ये सहकार तत्वज्ञान, सहकार कायदा, नियम, सुशासन, आर्थिक शिस्त आणि लेखापरीक्षण यांसारखे मूलभूत विषय समान ठेवण्याचा प्रस्ताव आहे. त्याचवेळी साखर कारखाने, सहकारी बँका, पतसंस्था, दुग्ध संस्था आणि गृहनिर्माण संस्थांच्या स्वतंत्र गरजांनुसार विशेष प्रशिक्षण देण्याची मुभा संबंधित संस्थांना राहणार आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकारी आणि सदस्यांसाठी मानीव अभिहस्तांतरण, इमारतींचा पुनर्विकास, स्वयंपुनर्विकास, स्थावर संपदा नियमन कायदा, इमारत देखभाल, सौरऊर्जा आणि प्रधानमंत्री सूर्यघर योजना यांसारख्या विषयांचा विशेष अभ्यासक्रमात समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे. गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांसाठी वर्षातून किमान तीन तासांचे एक प्रशिक्षण सत्र, तर व्यवस्थापन समिती सदस्य आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येकी तीन तासांची किमान दोन सत्रे आयोजित करण्याची तरतूद अहवालात नमूद करण्यात आली आहे. प्रशिक्षण पूर्ण न करणाऱ्या व्यवस्थापन समिती सदस्यांच्या पात्रतेबाबत कायदेशीर तरतुदी प्रभावी करण्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्याचाही प्रस्ताव आहे. सहकार शिक्षण व प्रशिक्षणासाठी जमा होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे या संस्थेला निधी संकलनाची एकमेव अधिकृत संस्था म्हणून नियुक्त करण्याची शिफारस समितीने केली आहे.

## 'मायक्रो फायनान्स'विरोधात 'हंटर मारो' आंदोलन करणार

**अमरावती /प्रतिनिधी-** 'मायक्रो फायनान्स कंपनी'ने जर शेतक-यांकडून जबरदस्तीने वसुली केली तर त्यांच्याविरोधात आम्ही 'हंटर मारो' आंदोलन करणार आहोत. शेतक-यांकडून कुठेही सक्तीची वसुली केली जात असेल तर हंटर मारा आणि त्या घटनेची आम्हालाही माहिती द्या. आम्ही त्याला रस्त्यावर चोपल्याशिवाय राहणार नाही. सरकारने पत्रिपत्रक काढून सुद्धा अवैध सावकार आणि छोट्या फायनान्स कंपन्या मानत नाही.



या सर्वांनी वसुलीसाठी गुंड पोसले आहेत.सरकारने जी ५ हजार रुपयांची मदत शेतक-यांना जाहीर केली आहे त्यामध्ये वाढ झाली पाहिजे आणि ३० तारखेपूर्वी ही मदत शेतक-यांच्या खात्यात जमा झाली तर बरे होईल, असे शिवसेना नेते बच्चू कडू यांनी म्हटले आहे.बच्चू कडू म्हणाले की, महायुतीमध्ये भाजप आणि शिवसेनेचे काहीही तणाव नाही. मंत्रिमंडळ विस्तार दुष्काळामुळे होईल का नाही सांगता येत नाही. पण ठरल्याप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे अर्थखाते होते ते त्यांना दिले पाहिजे. खरगे यांच्यासारखा नेता जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना पातळी सोडत असेल तर योग्य नाही.

## ९ महिन्यांच्या बाळाला उंचावरून फेकले; आरोपी अटकेत

**मुंबई :** पती-पत्नीमधील किरकोळ वादातून एका क्रूर बापाने आपल्याच अवघ्या ९ महिन्यांच्या निष्पाप पोटच्या गोळ्याला स्कायवॉकवरून खाली फेकून दिल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना घाटकोपर परिसरात घडली आहे. या भीषण घटनेत चिमुकला गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या सायन रुग्णालयात वैद्यकीय उपचाराची शर्थ सुरू आहे. याप्रकरणी पंतनगर/घाटकोपर पोलिसांनी आरोपी बापाला बेड्या ठोकल्या आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काल रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास पिडिती आरती जाफर शेख आणि तिचा मुलगा आरव (वय नऊ महिने) हे घाटकोपर रेल्वे स्टेशन बाहेरील स्कायवॉकवर थांबले होते. त्याच वेळी तिचा पती जाफर शेख तिथे आला. त्याने आरतीसोबत कौटुंबिक कारणावरून जोरदार वाद घालण्यास सुरुवात केली. वाद विकोपाला गेला आणि आरोपी जाफर याने आरतीला शिवीगाळ करत तीव्र रागाच्या भरात ९ महिन्यांच्या चिमुकल्या आरवला थेट जीवे मारण्याच्या उद्देशाने स्कायवॉकवरून खाली फेकून दिले.उंचावरून खाली फेकल्या गेल्यामुळे ९ महिन्यांचा आरव गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील स्थानिकांनी आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी बाळाला सुरुवातीला जवळच्या रुग्णालयात व त्यानंतर पुढील तातडीच्या उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या डॉक्टरांच्या विशेष देखरेखीखाली चिमुकल्यावर उपचार सुरू आहेत.

## पुण्यात शिवाई बसला भीषण आग

**पुणे /प्रतिनिधी-** पुण्यातील वर्दळीच्या स्वारगेट परिसरात एका धावत्या इलेक्ट्रिक 'शिवाई' बसला अचानक भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अपोलो हॉस्पिटलसमोर घडलेल्या या थरारक घटनेत सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असून, चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील सर्व १७ प्रवाशांचा जीव वाचला आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एसटी महामंडळाची इलेक्ट्रिक 'शिवाई' बस प्रवाशांना घेऊन स्वारगेटच्या दिशेने जात होती. बस अपोलो हॉस्पिटलजवळ आली असताना गाडीतून अचानक धूर येऊ लागला आणि काही क्षणांतच ज्वाला भडकू लागल्या. गाडीला आग लागल्याचे लक्षात येताच बस चालकाने अत्यंत प्रसंगावधान राखत गाडी तात्काळ रस्त्याच्या बाजूला सुरक्षित ठिकाणी उभी केली.चालकाने गाडी थांबवताच प्रवाशांना तातडीने खाली उतरवण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सर्वांच्या तत्परतेमुळे आणि सतर्कतेमुळे बसमधील १७ प्रवाशांना वेळेत बाहेर काढता आले, ज्यामुळे एका मोठ्या दुर्घटनेतून या सर्वांचा जीव थोडक्यात बचावला. आगीच्या या घटनेमुळे परिसरात धुराचे मोठे लोट पसरले होते, ज्याचा परिणाम म्हणून या मार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत पाण्याचा मारा करून या भीषण आगीवर नियंत्रण मिळवले. ही आग नेमकी कशामुळे लागली याचे ठोस कारण अद्याप समोर आले नसले तरी, शॉर्ट सर्किटमुळे गाडीने पेट घेतल्याचा प्राथमिक अंदाज अधिका-यांकडून वर्तवला जात आहे.

## दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त राज्यपालांकडून सत्यनिष्ठा प्रतिज्ञा

**मुंबई, दि. २६ :** दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी तसेच लोकभवन येथील पोलीस अधिकारी व अंमलदारांना भ्रष्टाचार निर्मूलनाची 'सत्यनिष्ठा प्रतिज्ञा' दिली. देशाच्या आर्थिक, राजनीतिक आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा मोठा अडथळा आहे. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी सरकार, नागरिक आणि खासगी क्षेत्र यांसह सर्व भागधारकांनी एकत्रित येऊन काम करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक नागरिकाने भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्यात साथ दिली पाहिजे, असे सत्यनिष्ठा प्रतिज्ञेत म्हटले आहे. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त दिलेले लेखी संदेश वाचून दाखवले. 'भ्रष्टाचारामुळे विकासाची गती मंदावते आणि सार्वजनिक संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी होतो. भ्रष्टाचाराचे उच्चाटन झाल्यास विकसित भारताचे उद्दिष्ट निर्धारित वेळेपूर्वी गाठता येईल,' असे राज्यपालांनी दिलेल्या संदेशात म्हटले आहे. भ्रष्टाचार निर्मूलनाची जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून, समाजातील प्रत्येक घटकाची आहे. भ्रष्ट्राचार मुक्त समाजाची सुरुवात स्वतःपासून करण्याचा संकल्प प्रत्येकाने करणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. दि. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत राज्यात दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून 'समृध्दीसाठी सत्यनिष्ठा' हे या सप्ताहाचे ब्रीदवाक्य आहे.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## दुटप्पी रणनीती

भारत-चीन सरहद्दीवरील अरुणाचल प्रदेशातील अनेक ठिकाणी भारतीय व चिनी सैनिकांमध्ये गेल्या चार महिन्यांपासून चकमकी घडत आहेत आणि आजही परिस्थिती तशीच आहे, असे आयटीबीपीचे (इंडो-तिबेट बॉर्डर पोलिस) महासंचालक शत्रूजित कपूर यांनीच म्हटले आहे. चार महिने चीनकडून भारताच्या कुरापती काढण्याचे काम चालू आहे. भारतीय सैन्य ताकदीनिशी चीनच्या सैनिकांना उत्तर देऊन परतावून लावत आहेत. पण, एकीकडे भारताबरोबर सैन्य पातळीवर शांततेसाठी बैठकांच्या मालिका चालू ठेवायच्या आणि दुसरीकडे भारताच्या सीमेवर विशेषत: अरुणाचल प्रदेशात घुसखोरी करून आपलाच प्रदेश असल्याचा दावा करायचा, ही चीनची दुटप्पी आणि घातक रणनीती आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये आजही तणावाचे वातावरण आहे. अरुणाचल हा भारताचाच अविभाज्य भाग आहे, असे भारताने चीनला अनेकदा बजावले आहे. तरीही या प्रदेशाकडे चीन गेली अनेक वर्षे वाकड्या नजरेने बघत आहे.अरुणाचल प्रदेशात भारत व चीन यांचे सैन्य अनेकदा अनेक ठिकाणी समोरासमोर आले आहे व आजही तेच घडत आहे, असे आयटीबीपीचे महासंचालक कपूर यांनी म्हटले आहे. आयटीबीपीचा वार्षिक समारंभ राजस्थानमधील अलवर येथे पार पडला. या समारंभातच कपूर यांनी अरुणाचल प्रदेशमधील चीनच्या कुरापतींबद्दल चिंता व्यक्त केली. मात्र, चिनी सैन्याच्या कारवायांना लगाम घालून परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळल्याबाबत त्यांनी आयटीबीपीच्या शौर्य पथकाचे कौतुकही केले. डोकलाम व गलवाननंतर अरुणाचल प्रदेशमध्ये भारत-चीन दरम्यान नवा संघर्ष उभा राहतो आहे का? चीनच्या घुसखोरीमुळे भारतीय सैन्याच्या गस्त घालण्याच्या पद्धतीवर परिणाम होतो आहे का? सीमावर्ती भागात शांतता राखण्यासाठी चीनकडून प्रतिसाद मिळत नाही का, असे अनेक प्रश्न या निमित्ताने निर्माण होतात. भारताचे चीनशी असलेले संबंध हे सुरक्षा व संरक्षण या दृष्टीने संवेदनशील आहेतच, पण आर्थिक सुरक्षिततेशी निगडित आहेत. गेल्या पाच वर्षांत चीनकडून भारतात होणाऱ्या आयातीचे प्रमाण १०२ टक्के वाढले आहे. चीनसोबत भारताची व्यापार तूट प्रचंड वाढली असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीच संसदेत सांगितले आहे. चीन मात्र भारतीय वस्तूंच्या निर्यातीत सतत अडथळे निर्माण करीत असतो. दुसरीकडे भारत मात्र चिनी गुंतवणुकीला मुक्त वाव देत असतो, असा आरोप विरोधी पक्ष करीत आहे. हे जर वास्तव असेल तर भारतानेही चीन संदर्भात कठोर धोरण अवलंबणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह भारतीय उच्चस्तरीय शिष्टमंडळाच्या चीनसोबत २५ पेक्षा जास्त बैठका झाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी व शी जिनपिंग यांच्याही बैठका झाल्या. शिखर परिषदेच्या निमित्ताने चर्चा झाली. चीनबरोबर विविध पातळीवर सतत बैठका होत असतात. तरीही चीनकडून भारतात आगळीक का होत असते? भारत-चीन दरम्यान सीमेवर तणावाची स्थिती आहे, याचा अर्थ रोज दोन देशांच्या सैन्यांमध्ये परस्परांवर गोळीबार चालू आहे असा नव्हे. गस्तीच्या दरम्यान दोन्ही देशांच्या फौजा समोरासमोर येणे अशा घटना वारंवार होत आहेत. चिनी सैन्याने गस्तीच्या प्रचलित पद्धतीत बदल केल्यास शांतता बिघडते व तणावाची परिस्थिती निर्माण होते. चीन हा अरुणाचल प्रदेशला त्यांच्या भाषेत झांगनान किंवा दक्षिण तिबेट म्हणून संबोधतो. अरुणाचल प्रदेश हा चीनचा भाग असल्याचा दावा बीजिंगने अनेकदा केला आहे. अरुणाचल प्रदेश हा भारताचा भाग असल्याचे भारतानेही स्पष्ट केले आहे, तरीही चीनने आपल्या भूमिकेत बदल केलेला नाही. २०१७ मध्ये अरुणाचल प्रदेशमधील सहा ठिकाणांची नावे चीनने बदलली. नंतर २०२१ मध्ये १५, २०२३ मध्ये ११, एप्रिल २०२६ मध्ये २३ ठिकाणची नावे चीनने बदलली. या नामांतराला भारताने तत्काळ आक्षेप घेतला आहे. एखाद्या प्रदेशाचे नाव बदलले म्हणून त्याचे सार्वभौमत्व बदलत नाही, ही भारताची भूमिका आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये भारताने सर्व्हे ऑफ इंडियाच्या अधिकृत नकाशावर अरुणाचल प्रदेशमधील २७ ठिकाणी भौगोलिक वैशिष्ट्याची प्रमाणित नावे नोंदवली. त्यात काही पर्वतीय खिंडींचा समावेश आहे. चीनने भारताच्या या कृतीला आक्षेप घेतला होता. याचा दुसरा अर्थ चीन भारताचा अविभाज्य भाग असलेल्या अरुणाचल प्रदेशावरील हक्क सोडायला तयार नाही. भारत-चीन सीमावाद हा केवळ जमिनीवरच नव्हे तर नकाशे व भौगोलिक नावे व ऐतिहासिक दाव्यांवरही सुरू झाला आहे. भारत-चीन सीमा संघर्ष १९६२ पासून आहे. दोन्ही देशांच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेबाबत आजही मतभेद आहेत. १९६२ मध्ये भारत-चीन झालेल्या युद्धानंतरही सीमावाद कायम आहे. १९८७ मध्ये अरुणाचल प्रदेशमध्ये तणाव निर्माण झाला होता. २०१७ मध्ये दोन्ही देशांचे सैन्य डोकलाम येथे समोरासमोर आल्यानंतर चकमकी झाल्या होत्या. जून २०२० मध्ये पूर्व लडाखमधील गलवान खोऱ्यात झालेल्या धुमश्चक्रीत दोन्ही देशांच्या जवानांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर दोन्ही देशांत लष्करी व राजनैतिक माध्यमातून अनेक वर्षे चर्चेच्या बैठका चालू होत्या. ऑक्टोबर २०२४ मध्ये पूर्व लडाखमध्ये दोन्ही देशांच्या सैन्यांत चकमकी घडल्या. सीमेवरील गावांचे महत्त्व केवळ लोकसंख्या किती यावर अवलंबून नसते. रस्ते, दळणवळण, प्रशासन, मूलभूत सुविधा, दूरसंचार व्यवस्था यांचाही सीमावर्ती व्यवस्थापनाशी संबंध असतो. चीनने सीमेजवळ काही वसाहती उभारल्या. रस्ते बांधले. भारत-चीन संबंधात सीमावाद हा कायमचा अडथळा होऊन बसला. चीनच्या सीमेवरील कारवायांविषयी सरकारच्या वतीने अजून कोणी बोललेले नाही. भारत-चीन संबंधाबाबत भारताने नेहमीच संयमी भूमिका ठेवली आहे; मात्र वेळ आल्यानंतर भारतीय सैन्याने चिनी सैन्याला इंगा दाखवून माघारी जाण्यास भाग पाडले आहे. तरीही चिनी सैन्याच्या घुसखोरीच्या घटना वारंवार का घडत आहेत? संरक्षणमंत्र्यांनी याविषयी वस्तुस्थिती काय आहे हे देशापुढे मांडले पाहिजे. वेळप्रसंगी जगापुढेही चीनकडून वारंवार जी आगळीक केली जाते, त्याविषयी पुराव्यासह आलेख सादर केला पाहिजे. चीनच्या वारंवार होणाऱ्या कुरापतींकडे केवळ सीमावाद म्हणून पाहून चालणार नाही. भारताने लष्करी सज्जतेसोबतच राजनैतिक आणि आर्थिक पातळीवरही ठोस रणनीती आखली पाहिजे. सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधा मजबूत करताना चीनच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी सजगता आणि ठामपणा हाच पर्याय आहे.

**देशात दुष्काळी परिस्थिती असूनही सोयाबीन उत्पादनात केवळ दोन टक्के घट झाल्याचा अंदाज सोपाने व्यक्त केला आहे. तर पोल्ट्री उद्योगाने मका व सोयापेंड आयातीची मागणी केली आहे. देशातील उत्पादन घटल्यामुळे नव्हे तर साठेबाजीमुळे सोयाबीनचे भाव वाढत असल्याचे चित्र या दोन्ही उद्योगांनी रंगवले आहे. त्यामागचे गौडबंगाल काय, या प्रश्नाची चर्चा करणे गरजेचे आहे.**

# सोयाबीनच्या तेजीमागे दुष्काळ की साठेबाजी?

देशात यंदा दुष्काळामुळे खरीप हंगामाला मोठा फटक बसला. आतापर्यंत महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या राज्यांमध्ये सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. यापैकी महाराष्ट्र सोयाबीन उत्पादनात आघाडीवर होते; तर राजस्थान तिसऱ्या आणि कर्नाटक चौथ्या क्रमांकावर असते. तेलंगणाही पाचव्या किंवा सहाव्या स्थानावर असतो. म्हणजेच देशातील जवळपास ६० टक्के सोयाबीन उत्पादन घेणाऱ्या राज्यांमध्ये यंदा दुष्काळ आहे.

या परिस्थितीमुळे देशातील सोयाबीन उत्पादनात यंदा मोठी घट आल्याचे अनेक व्यापारी संस्था आणि संशोधन संस्थांनी म्हटले आहे. पण सोयाबीन प्रक्रिया उद्योगाची संघटना असलेल्या सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात सोपाने यंदाचे उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा केवळ दोन टक्क्यांनी कमी असल्याचा अंदाज दिला आहे. देशात दुष्काळी परिस्थिती असतानाही सोपाने व्यक्त केलेल्या या अंदाजावर शंका उपस्थित केली जात आहे. यापूर्वीही या संघटनेने अनेकदा हंगामाच्या सुरुवातीला जास्त उत्पादनाचे अंदाज द्यायचे आणि नंतर ते कमी करायचे, असे प्रकार केले आहेत. हंगामाच्या सुरुवातीला जास्त उत्पादनाचे अंदाज दिल्याने शेतकऱ्यांचा माल बाजारात येण्याच्या काळात भाव कमी झाले. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला. यंदाही सोपाने वर्तविलेल्या १०७.९३ लाख टनांच्या अंदाजाशी बहुतांशी संस्था आणि अभ्यासक सहमत नाहीत. खुद्द सोपाच्या काही सदस्य संस्थांनीही या अंदाजाशी असहमती दर्शविली आहे. काही जण सोपाच्या अंदाजावर उघडपणे बोलणे टाळत आहेत. परंतु एकंदरीत हा अंदाज बाजारात मान्य होताना दिसत नाही.

### सोपाच्या अंदाजात कितपत तथ्य?

सोपाने हंगामाच्या पहिल्या अंदाजात अजब दावा केला आहे. मध्य प्रदेशमध्ये सोयाबीन उत्पादनात तब्बल ३२ टक्के आणि राजस्थानमध्ये तब्बल ४९ टक्के वाढ झाल्याचे म्हटले आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील उत्पादनात ३३ टक्के, कर्नाटकात जवळपास ४४ टक्के आणि तेलंगणात ४६ टक्के घट झाल्याचेही म्हटले आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच गुजरात आणि राज्यांमध्ये उत्पादन घटले तरी मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये उत्पादनात मोठी वाढ झाल्याने देशातील एकूण उत्पादनातील घट केवळ दोन टक्के असल्याचा दावा सोपाने केला आहे. थोडक्यात महाराष्ट्रातील उत्पादनातील घट मध्य प्रदेश भरून काढणार, तर कर्नाटक, तेलंगणा, गुजरातसह इतर राज्यांतील घट राजस्थान भरून काढणार, असाच याचा अर्थ काढावा लागेल. पण सोपाचा हा दावा अनाकलनीय असल्याचे मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील काही उद्योगांचे प्रतिनिधी व व्यापाऱ्यांनी म्हटले आहे.

मध्य प्रदेशात यंदा सोयाबीनची पेरणी सात टक्क्यांनी वाढली आणि उत्पादकताही ८८९ किलोवरून १,१०८ किलोवर पोचली, असा सोपाचा दावा आहे. म्हणजेच उत्पादकता तब्बल २५ टक्क्यांनी वाढली. मग खरंच सोयाबीन पिकासाठी मध्य प्रदेशात यंदा एवढे पोषक हवामान होते का ? याचे उत्तर 'नाही' असेच येते. मध्य प्रदेशात यंदाच्या हंगामात सरासरीपेक्षा केवळ चार टक्के कमी पाऊस दिसत असला तरी महाराष्ट्राप्रमाणेच मध्य प्रदेशातही पावसाचे वितरण खूपच असमान आहे. काही जिल्ह्यांमध्ये पावसात मोठी तूट आहे. तूट असलेल्या जिल्ह्यांमध्ये सोयाबीन उत्पादक भागाचा समावेश आहे. मध्य प्रदेशात उज्जैन, धार, इंदोर, मंदसौर, नीमच, देवास, सिहोर, विदिशा, रतलाम, शाजापूर, राजगड, हरदा आदी जिल्हे सोयाबीन उत्पादनात आघाडीवर आहेत. त्यातही उज्जैन पहिल्या आणि धार दुसऱ्या क्रमांकावर असतो. पण यंदा उज्जैन जिल्ह्यात सरासरीपेक्षा जवळपास २६ टक्के आणि धार जिल्ह्यात ३९ टक्के कमी पाऊस झाला आहे. रतलाम जिल्ह्यातही ३४



टक्के कमी पाऊस पडला. इंदोर आणि शाजापूर जिल्ह्यातही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. विशेष म्हणजे या जिल्ह्यांसह एकूण ११ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याची मागणी मध्य प्रदेशातील शेतकरी करत आहेत.थोडक्यात काय तर मध्य प्रदेशातील प्रमुख तीन सोयाबीन उत्पादक जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण खूपच कमीच आहे. त्याचा फटका पिकाला बसला आहेच. एक वेळ कमी पावसाने पिकाचे नुकसान झाले नाही असे वादासाठी गृहीत धरले तरी उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढली हे येथील शेतकऱ्यांनाही मान्य नाही. मागील वर्षीही मध्य प्रदेशातील उत्पादकता सरासरीपेक्षा खूपच कमी होती. आणि यंदा प्रतिकूल परिस्थिती असताना त्यात वाढ कशी होईल? त्यामुळे मध्य प्रदेशातील उत्पादन तब्बल ३२ टक्क्यांनी वाढल्याचा दावा अवास्तव असल्याची जोरदार चर्चा बाजारात सुरु झाली आहे.

राजस्थानमध्येही परिस्थिती वेगळी नाही. मुख्य सोयाबीन उत्पादक बुंदी, कोटा आणि बारां जिल्ह्यात पावसातील तूट २० ते २१ टक्के आहे. जून आणि जुलै महिन्यात पाऊस काहीसा बरा होता. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसात मोठी तूट दिसून आली. याचा पिकावर परिणाम झाल्याचे राजस्थानमधील काही व्यापारी आणि अभ्यासक सांगत आहेत. त्यामुळे सोपाने राजस्थानमधील उत्पादन यंदा ४९ टक्क्यांनी वाढल्याचा दिलेला अंदाज वस्तुस्थितीला धरून नाही, अशीही टिका होत आहे. एकंदर मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये उत्पादनात विक्रमी वाढ झाल्याचा सोपाचा अंदाज वस्तुस्थितीशी मेळ खाणारा दिसत नाही.

### बाजारातील अंदाज

सोपाने अंदाज दिल्यानंतरही बाजारात सोयाबीनचे भाव टिकून आहेत. त्यासाठी सोपाने साठेबाजांना जबाबदार धरले आहे. देशातील उत्पादन यंदा चांगलेच आहे पण सोयाबीनची साठेबाजी होत असल्याने भाव वाढलेले आहेत, असा एकंदर सोपाचा सूर आहे. यंदा हंगामाच्या सुरुवातीलाच सोयाबीनच्या भावात चांगली तेजी आली आहे. नवीन हंगाम सुरु झाला तेव्हा बाजारात सोयाबीन प्रति क्विंटल सहा हजार रुपयांच्या आसपास विकले जात होते. आवक सुरु झाल्यानंतर भाव काहीसे कमी होतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. पण दुष्काळामुळे सोयाबीन उत्पादन घटीची स्थिती स्पष्ट होत गेली आणि भाव वाढतच गेले. मध्यंतरी साडे सात हजारापर्यंत भाव गेले होते. सध्या ते सात हजारांच्या आसपास आहेत. सोपाच्या अंदाजानंतरही उद्योगांना अपेक्षित नरमाई बाजारात आलेली नाही. यावरून उत्पादनातील घट सोपाच्या अंदाजापेक्षा अधिक असल्याचे स्पष्ट होते.

अनेक व्यापारी आणि संशोधन संस्थांनी देशातील उत्पादन यंदा सोयाबीन उत्पादन ९० ते ९५ लाख टनांच्या दरम्यान स्थिरावल्याचे म्हटले आहे. म्हणजेच उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा किमान २० ते २५ टक्क्यांनी घटल्याचा अंदाज आहे. यापुर्वी व्यापारी आणि शेतकऱ्यांकडून आलेल्या माहितीच्या आधारे उत्पादन २५ ते ३० टक्क्यांनी घटल्याचे म्हटले होते. पण सोपाचा अंदाज जास्त उत्पादनाचा असून सोयाबीन टंचाईला सोयाबीनच्या साठेबाजीला जबाबदार धरण्यात आले आहे. डिसेंबरनंतर म्हणजेच शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त सोयाबीन बाजारात आल्यानंतर सोपा उत्पादनाचा अंदाज कमी करू शकते, असे अभ्यासकांनी म्हटले आहे.

### आयातीची मागणी

एकीकडे सोयाबीन प्रक्रिया उद्योग देशातील उत्पादन जास्त असल्याचा दावा करत आहे तर दुसरीकडे पोल्ट्री उद्योगाने सोयाबीनचे भाव वाढल्यामुळे आयात वाढविण्याची मागणी केली आहे. सोयाबीनचे भाव वाढल्याने सोयापेंडचाही भाव वाढला आहे. सध्या सोयापेंड ६ हजार ते ६ हजार २०० रुपयांच्या आसपास विकले जात आहे. उत्पादन घटीमुळे मक्याचे भाव वाढलेले आहेत. खाद्य महाग झाल्याने पोल्ट्री उद्योगाने मका आणि सोयापेंड आयातीला परवानगी देण्याची मागणी केली आहे. देशात जीएम सोयापेंड आयातीला परवानगी नाही. पण पोल्ट्री उद्योगाने जीएम सोयापेंड आयातीचा कोटा द्यावा तसेच नॉन जीएम सोयाबीन आयातीवरील सर्व शुल्क काढून टाकावे, अशीही मागणी केली आहे. सध्या केवळ अविकसित देशांतून येणाऱ्या नॉन जीएम सोयाबीनला आयात शुल्क लागत नाही. परंतु हा नियम सर्वच देशांसाठी लागू करावा, अशी मागणी पोल्ट्री उद्योग करत आहे. यापूर्वी २०२१ मध्ये सरकारने १५ लाख टन जीएम सोयापेंड आयातीला परवानगी दिली होती. त्यापैकी १२ लाख टन आयात झाली होती. तेव्हा तीन महिन्यांची मुदत होती. यंदाही सरकारने मुदत देऊन आयातीचा कोटा द्यावा, अशी मागणी केली जात आहे. ही मागणी करताना पोल्ट्री उद्योगाने सोयाबीनच्या वाढलेल्या भावासाठी साठेबाजीला जबाबदार धरले आहे. पोल्ट्री उद्योगाच्या मते, देशातील सोयाबीन उत्पादन चांगले आहे; परंतु सोयाबीनची साठेबाजी होत असल्याने भाव वाढले आहेत. सरकारने आयातीला परवानगी दिल्यास साठा झालेले सर्व सोयाबीन बाजारात येईल आणि भाव कमी होतील, म्हणजेच उद्योगांना स्वस्तात सोयाबीन मिळेल, असा त्यांचा होरा आहे. थोडक्यात देशातील उत्पादन घटल्याने भाववाढ झाली यापेक्षा साठेबाजी झाल्याने भाव वाढले, अशी चर्चा सोयाबीन प्रक्रिया आणि पोल्ट्री या उद्योगांनी सुरु केली आहे.

पोल्ट्री उद्योगाने ओरड सुरु केली असली तरी सध्या सोयापेंडचे भाव त्या प्रमाणात वाढलेले नाहीत. शिवाय चिकन आणि अंड्यांचे भावही टिकून आहेत. पुढे चिकन आणि अंड्यांची मागणी वाढण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सरकार लगेच पोल्ट्री उद्योगाची मागणी मान्य करण्याची शक्यता कमीच आहे. त्याऐवजी सरकारने मक्याचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी कमी व्हावा म्हणून मक्यापासून निर्मित इथेनॉलचा भाव कमी केला आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे उत्पादन घटल्याचे सरकारच्या अहवालातूनही स्पष्ट होत आहे. त्यामुळे उद्योगांनी घडवून आणलेल्या चर्चांकडे फारसे लक्ष न देता शेतकऱ्यांनी बाजारातील चढ-उतारावर लक्ष ठेवून सोयाबीनची विक्री करण्याविषयीचा निर्णय घेणे योग्य ठरेल, असे अभ्यासकांचे मत आहे.

**अनिल जाधव**

## दुष्काळ आणि जलसंकट

महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आहे.महाराष्ट्रातील काही शहरांमध्ये पाणी कपातीच्या/ काटकसरीच्या घोषणा होत आहेत. यावर्षी ऑक्टोबर महिन्यातच ही चिंताजनक परिस्थिती उद्भवली आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकार कुंभमेळ्यावर होऊ घातलेला खर्च रद्द करून तो निधी दुष्काळी मदतीसाठी का वळवत नाही? हा मुद्दा लावून धरायला विरोधकांना भीती वाटते आहे का?

त्याचबरोबर कुंभमेळ्यासारख्या मोठ्या आयोजनासाठी जो पाण्याचा अतिरिक्त वापर होणार आहे त्यावरही निर्बंध घालायची हीच योग्य वेळ नाही का? नाहीतर येत्या काळात एकीकडे महाराष्ट्रातील लाखो लोकांना रोजच्या पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना, दुसरीकडे राज्य सरकार हजारो कोटी खर्च करून नदीत स्नानाचे सोहळे करत असेल हे दृश्य तुम्हाला बरं वाटते का?

हा प्रश्न सरकारी खर्च आणि पाण्याच्या वापरापुरता मर्यादित आहे. बाकी धर्मकार्य म्हणून खासगी वर्गणी/ दानातून सदर सोहळ्यावर खर्च व्हायला आमची काही हरकत नाही. पाणी हिंदू-मुस्लिम, आस्तिक-नास्तिक, जातीपाती वगैरे बघत नाही. पाणी ही एक मूलभूत गरज आहे आणि यावर्षी अल निनो प्रभावामुळे राज्यावर आलेले पाण्याचे मोठे संकट हे वास्तव आहे. त्यामुळे पाण्याच्या प्रश्नाबाबत तरी धर्म आणि जातीचं राजकारण करायची राक्षसी वृत्ती दाखवू नये अशी महाराष्ट्रातील राजकारण्यांना हात जोडून विनंती आहे!

प्रत्येकालाच दिवसाला अमुक लिटर पाण्याचा गरज असते. माणसाला असते तशी गायीम्हशींना, शेळ्यामेंढ्यांना आणि अन्य जनावरांनाही असते. पाण्याचा तुडवडा सगळ्यांनाच जाणवणार आहे. त्यामुळे



दुष्काळाचं गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने कुंभमेळा आणि तत्सम सर्व ऐच्छिक खर्च यावर्षी रद्द करून संबंधित सर्व रक्कम दुष्काळी मदतीसाठी वळवावी, अशी विनंती करायला कोणाचा धर्म आडवा येणार नाही अशी माफक अपेक्षा आहे!!

त्याचबरोबर सरकारने कुंभमेळ्यासह सर्वच मोठ्या सोहळ्यांवर किंवा खासगी स्वरूपाच्या मोठ्या विकासकामांवर पाण्याचे निर्बंधही लावले पाहिजेत. लाखो लोकांची तहान भागण्याचं कर्तव्य अर्धवट सोडून, कुंभमेळा किंवा तत्सम सोहळ्यासाठी पाण्याची उधळपट्टी होणार नाही, याबाबत राज्यातील सुशिक्षित नागरिकांनी सरकारकडे पाठपुरावा करण्याची गरज आहे.

हे मुद्दे खरंतर मराठी माध्यमांनी रोज लावून धरले पाहिजेत. लाखो माणसांचे आणि जनावरांचे पाण्याविना हाल होण्याचे संकट आपल्यासमोर उभे आहे, याहून जास्त महत्त्वाचा विषय कोणता असू शकतो? मात्र आपल्या मेनस्ट्रीम मीडियाला ऑडिओ क्लिपांची आणि चटकदार हेडलाईन्सची नशा चढली आहे. त्यामुळे हे महत्त्वाचे मुद्दे सोशल मीडियातून मांडत राहणे एवढंच सध्या आपल्या हातात आहे! त्यामुळे किमान या माध्यमातून तरी राज्य सरकारपर्यंत आपला आवाज पोचेल अशी आशा बाळगून हे दुष्काळ आणि पाण्याचे प्रश्न जमेल तिथे मांडत राहण्याची गरज आहे.

**-मकरंद देसाई**

**संवाद**

## केंद्र सरकारचा स्तुत्य उपक्रम

सध्या 'रिझीम चेंज 'हा अजंडा देशांतर्गत शत्रू बाह्य शक्तींच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर कार्यरत करत आहेत. ही लढाई सीमेवरच्या लढाई पेक्षा जास्त धोकादायक आहे. यासाठी देशांतर्गत सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने काही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश मिळून १२ ठिकाणी हा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचे ठरवलेआहे. एकूण साठ सहस्त्र स्वयंसेवकांचे नागरी सुरक्षा संघटन करण्याचे निश्चित केले आहे. प्रत्येक विभागातून ५० स्वयंसेवकाची निवड केली जाईल. अशा एकूण सहाशे जणांना सैन्यदल प्रशिक्षण देणार आहे या सहाशे जणांना 'मास्टर ट्रेनर्स'असे संबोधले जाईल. या मास्टर ट्रेनर्सना तीन दिवसांचे विशेष प्रशिक्षण सैन्य दलाकडून दिले जाईल.आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे आणि प्रसारामुळे विशेषतः इलेक्ट्रॉनिक मीडिया मधून खोटे कथानक तयार करून जनतेला संभ्रमित करणे अफवा पसरवणे या प्रकारच्या कार्यपद्धतीमुळे अंतर्गत सुरक्षा धोकादायक बनते. अशावेळी आधुनिक प्रणाली ,तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक क्षमतेने सुसज्ज असलेल्या प्रणाली या साधनांचा वापर करणाऱ्या नागरी संरक्षण दलाची आवश्यकता महत्त्वाची ठरते.

**संध्या काटदरे**

## युरोपमध्ये तीव्र उष्णतेमुळे हजारो मृत्युमुखी

'नेचर हेल्थ जर्नल'च्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार २०२६ च्या उन्हाळ्याचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.२०२२ मध्ये आत्तापर्यंत सर्वात तीव्र उन्हाळा गणला जात होता.त्यावेळी सुमारे २२००० हुन अधिक लोकांचा मृत्यू उन्हाळ्यामुळे झाला होता. २०२६ चा उन्हाळा सर्वात तापदायक ठरला. यावेळी ५०००० जास्त लोक मृत्युमुखी पडले. युरोपच्या दृष्टीने मे,जून व जुलै हे महिने अतिशय तापदायक ठरले. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. युरोपमधील ८५४ शहरात हे मृत्यू झाले आहेत.या मृत्यूपैकी सुमारे ३२६१९ मृत्यू हे हवामानाच्या बदलामुळे झाले आहेत.संधोक्यांच्या मते या पेक्षाही जास्त मृत्यू असू शकतात. या उन्हाळ्यात वृद्धांना मोठा झटका बसला एकूण मृत्यूपैकी सुमारे ५० टक्क्याहून अधिक ८५ वर्षावरील वृद्ध होते. औधोगिक क्रांतीपासून युरोपामधीहल तापमान सुमारे २.५ अंशांनी वाढले आहे.भारतातील परिस्थिती सुद्धा वेगळी नाही. उन्हाळा तीव्रतेने वाढत आहे. पावसाळा कमी होत आहे. धो धो पाऊस पडत आहे. कोठे दुष्काळ तर कोठे अतिवृष्टी चा सामना करावा लागत आहे. या सर्व गोष्टीला कारणीभूत ठरत आहे बदलते हवामान. आज विकासाच्या नावाखाली जंगल तोड होत आहे. विद्युत निर्मितीसाठी भूगर्भातील कोळसा प्रचंड प्रमाणात काढला जात आहे. रस्तावरील वाहनांमुळे प्रचंड प्रमाणांत प्रदूषण होत आहे नद्या प्रदूषित झाल्या आहेत.ही सारी कारणे हवामान बदलाची आहेत. हे असेच चालू राहिले तर मानवाचा विनाश अटळ आहे.

**शांताराम वाघ**

## विश्वविक्रमी शंखनाद!

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या परमपवित्र नाशिक नगरीत सिंहस्थ कुंभपर्वाची सिद्धता जोमात सुरु असताना कोजागिरी पौर्णिमेच्या पावन दिनी नाशिक परिसर ५१७ जणांच्या सामूहिक शंखनादाने निनादून गेला. एकाच वेळी ३०३ जणांकडून शंखनाद करण्याचा अमेरिकेचा विक्रम मागे टाकत हा नवीन विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आला आहे. सनातन भारतीय संस्कृतीत शंखाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समुद्र-मंथनात मिळालेल्या १४ रत्नांमध्ये शंख असल्यामुळे तो 'समुद्रतनय' म्हणून ओळखला जातो. देवपूजेत शंखातील पाणी ज्याला 'शंखोदक' म्हणतात, ते देवाच्या मूर्तीभोवती फिरवून भक्तांवर शिंपडले जाते. यामुळे भक्तांच्या मनात भगवंताविषयी प्रेम निर्माण होते. शंखातील पाणी ब्रह्महत्येसारख्या मोठ्या पापांनाही दूर करते, असे मानले जाते.

**जगन घाणेकर**

मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# गोखी जलाशयातील अवैध पाणी उपशावर प्रशासनाचा बडगा!

## २५० वीजपंपांच्या जोडण्या खंडित पिण्याच्या पाण्याच्या संरक्षणासाठी संयुक्त पथकाची धडक कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. २६ : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी गोखी मध्यम प्रकल्पातून होणाऱ्या अवैध पाणी उपशाविरोधात प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. रविवार, २५ ऑक्टोबर रोजी पाटबंधारे, महसूल, महावितरण आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने धडक मोहीम राबवत परिसरातील सुमारे २५० वीजपंपांच्या जोडण्या खंडित केल्या.**



### पाणी उपसा केल्यास पुन्हा कारवाई!

**जलाशयातील पाणी संबंधित गावांच्या पिण्याच्या गरजांसाठी सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील आदेश मिळेपर्यंत जलाशयातून अनधिकृत पाणी उपसा करू नये. नियमांचे उल्लंघन करताना आढळल्यास संबंधितांवर संयुक्त कारवाई करण्यात येईल, असा इशारा शाखा अभियंता अ. यू. भोयर यांनी दिला आहे.**

त्यामुळे जलाशयातील पाण्याचा अनधिकृत वापर करणाऱ्यांवर प्रशासनाने कारवाईचा इशारा दिला आहे. दारव्हा तालुक्यातील पाथ्रड देवी परिसरातील गोखी मध्यम प्रकल्पाच्या जलाशयात सध्या सुमारे ९३.८३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, दुष्काळी परिस्थिती आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता हा साठा प्रामुख्याने पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्याचे नियोजन आहे. असे असतानाही जलाशयातून अवैधरीत्या पाणी उपसा होत असल्याने प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली. पाथ्रड देवी, पांढुर्णा, बोधगव्हाण, उमठा, चानी, सावळा, चिकणी, सावंगी, मोरगव्हाण आणि आमशेतसह परिसरातील गावांमध्ये ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या पंपांच्या वीजजोडण्या खंडित करण्यासोबतच संबंधित ट्रान्सफॉर्मरची वीजजोडणीही बंद करण्यात आली. या मोहिमेत पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता अ. यू. भोयर, महावितरणचे कर्मचारी, लाडखेड पोलीस ठाण्याचे पथक आणि महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

# दिग्रसमध्ये भीषण अपघात,ट्रॅक्टरचे चाक डोक्यावरून गेल्याने तरुणाचा मृत्यू!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २६ :** शहरातील आरोग्यधाम हॉस्पिटलजवळ सुरू असलेल्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामस्थळी सोमवारी सकाळी भीषण अपघात घडला. अनियंत्रित ट्रॅक्टरचे चाक डोक्यावरून गेल्याने चालक रोहित गजानन पवार (वय २५, रा. रुई तलाव) याचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोग्यधाम हॉस्पिटलजवळ पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असताना हा अपघात घडला. यावेळी ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टरने लगतच्या चहाच्या कॅंटीनला जोरदार धडक दिली. या धडकेत कॅंटीनचे पत्रे तुटून मोठे नुकसान झाले. दरम्यान, ट्रॅक्टरचे चाक रोहित पवार याच्या डोक्यावरून गेल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच दिग्रस पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. याप्रकरणी दिग्रस पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, ठाणेदार वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.



### बांधकामस्थळावरील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**पाण्याच्या टाकीच्या बांधकामस्थळी घडलेल्या या दुर्घटनेमुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा प्रश्न उपस्थित झाला आहे. बांधकामस्थळी वाहनांची ये-जा, वाहनचालकांसाठी आवश्यक खबरदारी आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पुरेशा उपाययोजना होत्या का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. अपघात नेमका कशामुळे घडला, याचा तपास पूर्ण झाल्यानंतरच त्यामागील कारण स्पष्ट होणार आहे.**
**अवघ्या २५व्या वर्षी रोहित पवार याचा मृत्यू झाल्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका तरुणाचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.**

## थोडक्यात




### लाईटच्या लपंडावाने पाटणबोरीकर त्रस्त; दररोज सकाळी वीज गायब

**स्वतंत्र ३३ केव्ही पॉवर हाऊस असूनही भारनियमन, सणासुदीतही नागरिकांची गैरसोय; आंदोलनाचा इशारा**

**पाटणबोरी :** तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या पाटणबोरी येथे नागरिक विविध समस्यांनी त्रस्त असताना आता विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण झाले आहेत. पाटणबोरी येथे स्वतंत्र ३३ केव्ही पॉवर हाऊस असूनही दररोज सकाळी नियमितपणे वीज पुरवठा खंडित होत आहे. सकाळच्या वेळीच लाईन जात असल्याने पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय होत आहे. पाणी भरण्यासाठी नागरिकांची भटकंती सुरू असून सकाळची सर्व कामे खोळंबत असल्याने विशेषतः महिलांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सणासुदीच्या दिवसातही दररोज लाईट जाण्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. याबाबत अनेकदा बातम्या प्रकाशित होऊनही वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक अभियंता याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. वारंवार होणाऱ्या या भारनियमनामुळे जनता वीज विभागाच्या धोरणाला वैतागली आहे. या प्रश्नावर येथील राजकीय पक्ष, आमदार, खासदार यांनी तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा येत्या काळात जनता रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.



### राष्ट्रहिताचा ध्यास, संघशिस्तीचा संदेश!

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव उत्साहात**

**महागाव :** राष्ट्रहित, शिस्त आणि संघभावनेचा संदेश देत महागाव येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महागाव मंडळाच्या वतीने २४ ऑक्टोबर रोजी विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या शिस्तबद्ध पथसंचलनाने स्वयंसेवकांच्या संघटनात्मक एकतेचे दर्शन घडविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून समाजकल्याण विभागाचे सेवानिवृत्त उपायुक्त माधवराव वैद्य उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून संघाचे यवतमाळ विभाग कार्यवाह अंकुश रामगडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना अंकुश रामगडे म्हणाले की, राष्ट्रहित जपणे आणि देशाला परमवैभवापर्यंत नेणे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख ध्येय आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजात राष्ट्रीय विचार, कर्तव्यनिष्ठा आणि संघभावना रुजविणे आवश्यक आहे. राष्ट्रनिष्ठेची भावना जोपासत समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. शहरातून काढलेल्या पथसंचलनात स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध सहभाग नोंदविला. त्यानंतर पार पडलेल्या शस्त्रपूजन कार्यक्रमातून परंपरा आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. प्रमुख अतिथी माधवराव वैद्य यांनी संघाच्या कार्यातील शिस्त, समर्पण आणि संघटनात्मक बांधिलकीचा उल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महागाव खंडाचे कार्यवाह हरीश नरवाडे यांनी केले. राष्ट्रहिताचा संदेश देत हा उत्सव उत्साहात पार पडला.

# पोलिसांनी अवघ्या २२ तासांत केला चोरीचा पर्दाफाश! चार आरोपी जाळ्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. २६ :** दुर्गादेवी विसर्जनाच्या उत्सवी वातावरणात घाटंजी मध्यवस्तीत अंबादेवी वॉर्डात झालेल्या घरफोडीने शहरात एकच खळबळ उडाली होती.मात्र, या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी घाटंजी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या २२ तासांत चार संशयित आरोपींना ताब्यात घेऊन मुसक्या आवळल्या. सीसीटीव्ही चित्रण, तांत्रिक माहिती आणि माहितीगारांकडून मिळालेल्या धाग्यांची सांगड घालत पोलिसांनी या घरफोडीचा उलगडा केला.

या प्रकरणात अमोल स. भोजवार (वय ३१), अर्जुन ना. धोत्रे (वय २०), अभिषेक प्र. एम्बडवार (वय २७, तिघेही रा. घाटंजी) आणि उमेश पा. मोहुर्ले (वय ३६, रा. दुर्गामाता वॉर्ड, घाटंजी) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.२२ ऑक्टोबर रोजी जयश्री अग्रवाल यांच्या घराचे कुलूप व कोंडा तोडून घरफोडी करण्यात आली होती. घटनेची फिर्याद दाखल होताच मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासाला गती देत कर्तव्यदक्ष घाटंजीचे पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी तपासाची चक्रे वेगात फीरवत आरोपींचा शोधण्यात गती दिली. त्यारिता घटनास्थळी न्यायवैद्यक पथकाला पाचारण करून पुरावे गोळा करण्यात आले. अखेर अवघ्या २२ तासांत चार जणांना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. या चोरीचे प्रकरणात ११ वर्षे दुकानात काम करणारा नौकरला सदर घराच्या परिस्थितीची संपुर्ण माहिती असल्याचे उघड झाले. यात प्रकरणातील उमेश मोहुर्ले हा फिर्यादींच्या दुकानात तब्बल ११ वर्षे कामाला होता. दोन वर्षांपूर्वी त्याला कामावरून कमी करण्यात आले होते. त्यामुळे फिर्यादींच्या घराची व दुकानाची परिस्थिती तसेच तेथील व्यवहारांची त्याला माहिती असण्याची शक्यता पोलिस तपासत आहेत. या घरफोडीत त्याची नेमकी भूमिका काय होती, हे पुढील तपासातून स्पष्ट होणार आहे.उत्सवाच्या गर्दीत घडलेल्या घरफोडीचा अल्पावधीत छडा लावल्याने घाटंजी पोलिसांच्या वेगवान तपासाची चर्चा व कौतुक सर्वत्र सुरू आहे. आता या गुन्ह्यातील चोरीचा मुद्देमाल, आरोपींची नेमकी भूमिका आणि गुन्ह्यामागील इतर बाबींचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.



# कृष्णापूरमध्ये शांततेचे आवाहन; अफवांपासून दूर राहण्याचा प्रशासनाचा इशारा!

## शांतता समितीची बैठकीत तहसीलदार मीरा पागोरे,ठाणेदार दीपमाला भेंडे यांची उपस्थिती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. २६ :** तालुक्यातील कृष्णापूर येथे २२ ऑक्टोबर रोजी घडलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर गावातील शांतता आणि सामाजिक सलोखा कायम राखण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

या पार्श्वभूमीवर २४ ऑक्टोबर रोजी शांतता समितीची बैठक घेण्यात आली. तहसीलदार मीरा पागोरे आणि बाभुळगाव पोलीस ठाण्याच्या ठाणेदार दीपमाला भेंडे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सर्व धर्मीय नागरिकांनी सहभागी होत गावात शांतता राखण्याचा निर्धार व्यक्त केला. अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कृष्णापूर येथे एका महिलेला अश्लील इशारे केल्याच्या कारणावरून वाद झाल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली होती. या घटनेदरम्यान काचेची बाटली फेकल्याने एक जण जखमी झाल्याचा, तर अन्य एका व्यक्तीला काठीने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी प्राप्त तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर गावातील वातावरण बिघडू नये, गैरसमज वाढू नयेत आणि नागरिकांमधील परस्पर विश्वास कायम राहावा, यासाठी प्रशासनाने शांतता समितीच्या माध्यमातून संवादावर भर दिला. गावातील शांतता ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश बैठकीतून देण्यात आला. सर्व धर्मीय नागरिकांनी परस्परांशी सौहार्दाचे संबंध कायम ठेवावेत, कोणत्याही अफवांना बळी पडू नये आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचेल असे कृत्य टाळावे, असे आवाहन करण्यात आले. सध्या गावात शांततेचे वातावरण असून दैनंदिन जनजीवन सुरळीत राहावे, यासाठी नागरिकांनी संयम राखणे आवश्यक आहे. प्रशासन आणि पोलीस यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे. वादाला खतपाणी न घालता संवाद, संयम आणि बंधुभाव जपणे, हाच कृष्णापूरच्या सामाजिक एकोप्याचा खरा कस आहे.



# ऊस उत्पादक शेतकऱ्यांनो, आणखी किती दिवस अन्याय सहन करणार?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २६ :** उमरखेड तालुक्यातील नागेशवाडी येथे २५ ऑक्टोबर रोजी शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत आठ ते दहा शेतकऱ्यांचा सुमारे ३० एकरांतील ऊस जळून खाक झाला. सिंचन साहित्याचेही लाखोंचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकरी गोविंदराव देशमुख (सवनेकर) यांनी शेतकऱ्यांच्या संघटित लढ्याची गरज अधोरेखित केली.

कापूस, सोयाबीनच्या नुकसानीनंतर ऊस हेच आर्थिक आधाराचे पीक असताना आगीच्या घटनांमुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. वीज वितरण कंपनीकडून तातडीने नुकसानभरपाई मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. जळीत उसाच्या गाळपात

**३० एकरांतील ऊस जळून खाक**



साखर कारखानदारांकडून २० ते २५ टक्के कपात केली जात असल्याने शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. ऊस पिकाला विमा संरक्षण, जळीत उसाची हंगाम संपण्यापूर्वी भरपाई आणि अन्यायकारक कपात रद्द करण्यासाठी शासनाने ठोस नियम करावेत, अशी मागणी देशमुख यांनी केली. अन्यायाविरुद्ध शेतकरी संघटित होणार की प्रत्येक वेळी नुकसान सोसत राहणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# दिव्यांगांच्या हक्काचा पाच टक्के निधी दिवाळीपूर्वी द्या..!

## अन्यथा पंचायत समितीतच दिवाळी साजरी करणार!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २६ :** दिवाळीचा सण तोंडावर आला असताना दिग्रस तालुक्यातील दिव्यांग बांधवांना ग्रामपंचायतींकडून मिळणारा राखीव पाच टक्के निधी अद्याप वितरित झालेला नसल्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. हा निधी दिवाळीपूर्वी वितरित करून दिव्यांग बांधवांची दिवाळी गोड करावी, अन्यथा पंचायत समिती कार्यालयातच ठिय्या आंदोलन करून दिवाळी साजरी करू, असा इशारा भूमिपुत्र संघटनेच्या दिव्यांग सेलने दिला आहे. तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने सर्वसामान्यांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे जगणे कठीण झाले आहे. त्यात दिव्यांग बांधवांना उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजा भागविताना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतींकडून मिळणारा पाच टक्के राखीव निधी त्यांच्यासाठी मोठा आधार ठरू शकतो. दिवाळीच्या तोंडावरही निधीसाठी प्रतीक्षा का? असा सवाल उपस्थित करत संघटनेने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर लक्ष वेधले आहे. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना निधी वितरणाबाबत निर्देश द्यावेत, अशी मागणी गटविकास अधिकारी रणमले यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. भूमिपुत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विशाल चव्हाण यांनी हा इशारा दिला. यावेळी शेकडो दिव्यांग बांधव उपस्थित होते. आता प्रशासन दिवाळीपूर्वी निधी वितरित करण्यासाठी ठोस पावले उचलते का, याकडे दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे.

# २२ वर्षांची परंपरा कायम, गुणवंत विद्यार्थ्यांसह आदर्श शिक्षिकेचा गौरव



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी-जामणी, दि. २६ :** केवळ सण-उत्सव साजरे न करता, त्यातून सामाजिक एकोपा जपत नव्या पिढीला शिक्षणाची प्रेरणा देण्याचा आदर्श मुकुटबन येथील पेरकी समाजाने घालून दिला आहे.

समाजबांधवांच्या वतीने रविवार, २५ ऑक्टोबर रोजी भूमन्नाजी गोपतवार यांच्या निवासस्थानी कोजागिरी पौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सन २००४ पासून सुरू असलेली ही परंपरा यंदा २२ व्या वर्षातही कायम राखण्यात आली. इयत्ता दहावीतील क्रिश राजू बोळकुंटवार व श्रुती गणेश मासटवार, तसेच बारावीतील प्रिन्सी राजू बोळकुंटवार, प्रणय गजानन पैसटवार आणि तनश्री अशोक बारपटवार या गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या रुद्रानिल स्वप्नील पाईलवार याचाही विशेष सत्कार करण्यात आला. त्याच्या आई-वडिलांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. पंचायत समितीच्या वतीने आदर्श शिक्षिका म्हणून गौरविलेल्या माया बळीराम तुडमवार यांचाही समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. उत्सवात आयोजित वन मिनिट गेम्समध्ये मुलांच्या गटातून वेद मुत्तेवार, महिलांच्या गटातून पल्लवी नितीन पाईलवार, तर कपल गेममध्ये कविता गजानन मुत्तेवार यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठ्ठलराव बंडेवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून रामदासजी पाईलवार, गंगाराम बोडेवार, विनोद बोळकुंटवार व विठ्ठल गोपतवार उपस्थित होते. प्रास्ताविक रामदासजी पाईलवार यांनी केले. सूत्रसंचालन बळीराम तुडमवार यांनी, तर आभार गजानन टोंगलवार यांनी मानले. शिक्षणाचा सन्मान, परंपरेचे जतन आणि समाजातील बंध अधिक दृढ करण्याचा संदेश देणारा हा उत्सव पेरकी समाजातील महिला, पुरुष आणि बालकांच्या मोठ्या सहभागामुळे उत्साहात पार पडला.

# उमरखेडकरांची पाण्यासाठी वणवण, भाजपकडून टॅंकरद्वारे पाणीपुरवठा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २६ :** शहरात मागील पाच ते सहा दिवसांपासून तांत्रिक अडचणींमुळे बेलखेड बंधारा हा कोरडा पडल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागले. ऐन पाणीटंचाईच्या काळात नळाला पाणी येत नसल्याने महिला, वृद्ध आणि लहान मुलांचे हाल होत आहेत.

नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन भारतीय जनता पक्षाने मदतीचा हात पुढे केला आहे. आमदार किसनराव वानखेडे आणि भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध प्रभागांत टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. शहरातील पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना दैनंदिन गरजांसाठी पाण्याची जुळवाजुळव करावी लागत

**नगर परिषदेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह !**



आहे. या परिस्थितीत प्रभाग क्रमांक पाचच्या नगरसेविका वंदना सचिन घाडगे यांनी आपल्या प्रभागापुरते मर्यादित न राहता शहरातील इतर भागांतही टॅंकरद्वारे मोफत पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या या उपक्रमामुळे पाण्यासाठी त्रस्त झालेल्या नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मात्र, टॅंकरद्वारे होणारा पाणीपुरवठा ही तात्पुरती व्यवस्था असून, नगर परिषद प्रशासनाने शहरातील नियमित पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत करणे आवश्यक आहे. तांत्रिक अडचणी दूर करून नागरिकांना वेळेत पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी नागरिकांना भटकंती करावी लागत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

### पाणीपुरवठा सुरळीत करा, अन्यथा भाजप रस्त्यावर उतरणार!

**माझ्या प्रभागातील महिला, वृद्ध आणि लहान मुले पाण्यासाठी वणवण भटकत होती. जनता तहानलेली असताना लोकप्रतिनिधी म्हणून मी गप्प बसू शकत नाही. त्यामुळे नितीन भाऊ भुतडा यांच्या सहकार्याने संपूर्ण शहरात टॅंकरद्वारे मोफत पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न केला. नगर परिषद प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करावा. नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागल्यास भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

**- वंदना सचिन घाडगे नगरसेविका, प्रभाग क्रमांक ५, भाजप, उमरखेड**

# महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

**यवतमाळ, दि. २६ :** यवतमाळ नगरपरिषद येथे सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महर्षी वाल्मिकी यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली. या कार्यक्रमाला नगरपरिषदेतील कर्मचारी, समाजसेवक तसेच वाल्मिकी समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महर्षी वाल्मिकी यांच्या विचारांचा समाजात प्रसार व्हावा आणि त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घ्यावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. याप्रसंगी नगरपालिकेचे उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी ओम प्रकाश तिवारी अख्तर सिंग चव्हाण श्याम बनसोड नितीन भूसरेड्डी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

**म. स. सं. अधिनियम १९६० चे कलम ८८ / ९८ अन्वये स्थावर मालमत्ता जाहीर ई-निवीदा (E-Auction) नोटीस.**

जनता ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. महागाव (र.नं.७६१) या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये झालेल्या चौकशीमध्ये संस्थेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार ठरलेल्या तत्कालीन संचालक व कर्मचारी यांच्याविरुध्द सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पुसद यांनी कलम ९८ अन्वये वसुली प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. सदर वसुलीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने कलम १५६ व नियम १०७ (११) अन्वये खाली नमुद स्थावर मालमत्ता **"जशी आहे, जेथे आहे व जे काही आहे"** या तत्वावर ऑनलाइन ई-लिलाव पध्दतीने विक्री करावयाच्या आहेत. इच्छुक बोलीदारांनी खालील वेळापत्रकानुसार ई-लिलावात भाग घ्यावा.

| अ. क्र. | जबाबदार व्यक्तीचे नाव व पत्ता | वसुलीपात्र रक्कम (रु.) | स्थावर मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु.) | बयाणा रक्कम (EMD) (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | जयंत अरविंद पांडे | १९५५५०४/- + व्याज | मौजा महागाव ता. महागाव येथील भुमापन क्र.१८ क्षेत्रफळ ०.३० हे. आर. | ४४४६०००/- | ४४४६००/- |
| २. | सुभाष देवराव नरवाडे रा. महागाव ता. महागाव | ४६०२२/- + व्याज | मौजा महागाव येथील भुमापन क्र.१६७ क्षेत्रफळ ०.५८ हे. आर. | १७९९६००/- | १७९९६०/- |
| ३. | सोनबा किसन पवार (मय्यत) रा. पिंपळगाव (ई) ता. महागाव | १६०५००/- + व्याज | मौजा पिंपळगाव (ई) ता. महागाव येथील भुमापन क्र.१३४ क्षेत्रफळ १.१२, ०.३६ व ०.९७ हे. आर. | ४२३५५००/- | ४२३५५०/- |

**-: ई-लिलाव वेळापत्रक :-**

| | |
|---|---|
| ई-लिलाव संकेतस्थळ (पोर्टल) | https://mahatender.gov.in |
| निवीदा ऑनलाईन उपलब्ध होण्याची तारीख | दि.३०.१०.२०२६ |
| ऑनलाइन नोंदणी व कागदपत्रे अपलोड करण्याची तारीख | दि.३०.१०.२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०५.११.२०२६ सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| बयाणा रक्कम (EMD) भरण्याची अंतिम तारीख | दि.०५.११.२०२६ सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| मालमत्ता पाहणी | दि.३०.१०.२०२६ ते दि.०५.११.२०२६ सकाळी ११ ते सायं. ४ (पूर्वसूचनेने) |
| तांत्रीक निवीदा उघडण्याची तारीख | दि.०६.११.२०२६ |
| आर्थिक निवीदा उघडण्याची तारीख व लिलावाची तारीख | तांत्रीक निवीदांची पडताळणी झाल्यावर जाहीर करण्यात येईल. |

**टीप :-** १. ई-लिलावाच्या अठी व शर्ती https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.
२. बोली अंतिम करण्याचे अधिकार निबंधकास राहतील.

**ठिकाण :-** महागाव
**दिनांक :-** २७.१०.२०२६

**वसूली अधिकारी**
**जनता ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. महागाव (र.नं.७६१)**

## संक्षिप्त

### महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त अभिवादन



**अमरावती**-महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजय जाधव, सहआयुक्त (रोहयो) वासंती माळी, तहसीलदार सुनीता झाडे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महर्षी वाल्मिकी यांच्या साहित्यिक योगदानाचे आणि भारतीय संस्कृतीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण स्थानाचे स्मरण यावेळी करण्यात आले.

### क्रीडा पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती**-महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटू आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारां'साठी ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पुरस्कारांसाठी पात्र क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू आणि साहसी उपक्रमात सहभागी झालेल्या व्यक्तींना १५ नोव्हेंबर २०२६ रोजी (रात्री ११ वा.५९ मि. ५९ सेकंद वाजेपर्यंत) ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहेत. सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांच्या पुरस्कारांसाठी हे अर्ज मागविण्यात येत आहेत. या अंतर्गत विविध श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान केले जातात.क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षींसाठी 'जीवन गौरव पुरस्कार',क्रीडा मार्गदर्शक आणि महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार,उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू),यशस्वी दिव्यांग खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू),साहसी उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) या श्रेणींमध्ये अर्ज मागविण्यात आले आहेत.इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://sports.maharashtra.gov.in १५ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत फक्त ऑनलाईन पद्धतीने आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन क्रीडा विभागाद्वारे करण्यात आले आहे.अंतिम मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

# दुष्काळात चारा उत्पादनासाठी मिळणार अनुदान!



अखेर बच्चू कडूंच्या मागणीला यश

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईमुळे पशुधन संकटात येऊ नये, यासाठी बच्चू कडू यांनी वैयक्तिक शेतकऱ्यांना चारा उत्पादनासाठी अनुदान देण्याची मागणी सरकारकडे केली होती. या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी करून सन २०२६-२७ या वर्षासाठी चारा बियाणे व ठोंबे वाटपाच्या अटी शिथिल केल्या आहेत.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत चारा उत्पादनासाठी वैयक्तिक लाभार्थ्यांना एका हेक्टर क्षेत्रासाठी ४,००० किमतीचे चारा बियाणे व ठोंबे १०० टक्के अनुदानावर देण्याची तरतूद आहे. यापूर्वी स्वतःकडे किमान तीन ते चार पशुधने असण्याची अट होती. मात्र, नव्या शासन निर्णयानुसार २०२६-२७ या वर्षासाठी ही अट शिथिल करण्यात आली आहे. त्यामुळे पशुधनाची अट पूर्ण होत नसल्याने लाभापासून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळण्याची शक्यता आहे. शेतकरी समूहासाठी पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत २०,००० किमतीचे चारा बियाणे व ठोंबे १०० टक्के अनुदानावर देण्याची तरतूद आहे. सार्वजनिक जमिनीवर सामूहिक स्वरूपात चारा उत्पादन करण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरू शकते. मात्र, शासन निर्णयातील ही तरतूद शेतकरी समूहासाठी असून सार्वजनिक जमिनीवरील प्रत्येक क्षेत्राला स्वतंत्रपणे अनुदान मिळेल, असे त्यात स्पष्ट नमूद नाही.

**एक हेक्टरसाठी ४,०००, तर शेतकरी समूहाला पाच हेक्टरसाठी २०,००० पर्यंत अनुदान, पाणीसाठा उपलब्ध असल्यास वारंवार लाभाचीही तरतूद**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाने आणखी एक महत्त्वाची सवलत दिली आहे. चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि यापूर्वी लाभाची मागणी करणारा पात्र अर्जदार उपलब्ध नसल्यास, वैयक्तिक लाभार्थी तसेच शेतकरी समूहाला एकापेक्षा अधिक वेळा अनुदानाचा लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. संबंधित शेतकऱ्याकडे किंवा समूहाकडे चारा उत्पादनासाठी पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र विभागाच्या संबंधित उपायुक्तांकडून घेणे आवश्यक राहील.

बच्चू कडू यांनी दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ चारा छावण्यांवर अवलंबून न राहता, ज्या शेतकऱ्यांकडे जमीन आणि पाणी उपलब्ध आहे, त्यांना चारा उत्पादनासाठी थेट मदत देण्याची मागणी केली होती. चारा उत्पादन वाढल्यास पशुधनाला हिरवा चारा उपलब्ध होण्याबरोबरच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीही निर्माण होऊ शकतात.शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील पशुपालक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा असून, बच्चू कडू यांच्या मागणीचा पाठपुरावा आणि शासन निर्णयातील सवलतींचे पशुपालकांनी स्वागत केले आहे. आता या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र शेतकऱ्यांना वेळेत लाभ मिळवून देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

# देवस्थान इनाम जमिनींसाठी स्वतंत्र कायद्याच्या हालचालींना वेग!

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील हजारो एकर देवस्थान इनाम जमिनींचे संरक्षण आणि योग्य व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. या जमिनींसंदर्भातील अतिक्रमणे, विक्री, मालकी हक्क आणि वहिवाटीच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याची प्रक्रिया महसूल विभागाने सुरू केली आहे.

या अनुषंगाने राज्यातील विविध जिल्ह्यांमधून देवस्थान प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली असून, सात अभ्यास उपगटांमार्फत देवस्थान इनाम



**महसूल विभागाकडून प्रतिनिधींची नियुक्ती**

जमिनींचा इतिहास, सद्यस्थिती, अतिक्रमणे आणि न्यायालयीन प्रकरणांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. विभागाच्या १५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अधिकृत पत्रानुसार, अमरावती विभागासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य कोर कमिटी पदाधिकारी अनुप जयस्वाल यांची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रक्रियेत संबंधित देवस्थानांच्या जमिनींची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेऊन आवश्यक माहिती व महसुली कागदपत्रे संकलित केली जाणार आहेत.प्रस्तावित कायद्याच्या प्रारूपासाठी जुन्या सातबारा उताऱ्यांसह फेरफार नोंदी, इनाम पत्रके, वहिवाटीचे अभिलेख आणि इतर महत्त्वाच्या कागदपत्रांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

यासाठी जिल्हाधिकारी, तहसील कार्यालये आणि संबंधित महसूल यंत्रणांनी नियुक्त प्रतिनिधींना आवश्यक सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील अनेक ठिकाणी देवस्थान इनाम जमिनींवर अतिक्रमण झाल्याच्या तसेच काही ठिकाणी जमिनींची विक्री झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे या जमिनींचे संरक्षण, पारदर्शक व्यवस्थापन आणि देवस्थानांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र कायदा महत्त्वपूर्ण ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विमानतळ नोकरभरतीच्या बनावट जाहिराती, सावध राहण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विमानतळावर नोकरी देण्याच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांची दखल घेत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. 'एमएडीसी'च्या नावाचा गैरवापर करून नोकरी किंवा नियुक्तीचे आमिष दाखवणाऱ्या अनधिकृत व्यक्ती आणि संस्थांपासून सावध राहण्याचे आवाहन कंपनीने केले आहे. 'एमएडीसी'चे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी स्वतः समाज माध्यमांद्वारे ही माहिती दिली आहे.

विमानतळावरील भरतीच्या नावाखाली काही भामटे नागरिकांची आर्थिक फसवणूक करत असल्याचे समोर आल्यानंतर प्रशासनाने यासंदर्भात जाहीर सूचना जारी केली आहे.

भरतीविषयक कोणत्याही जाहिराती अथवा नियुक्तीपत्रांची सत्यता केवळ 'एमएडीसी'च्या अधिकृत माध्यमांतूनच तपासून घ्यावी.

अशा प्रकारची फसवणूक झाल्यास संबंधितांनी त्याबाबतचे सर्व पुरावे जपून ठेवावेत आणि तातडीने स्थानिक पोलीस ठाण्यात किंवा सायबर गुन्हे विभागाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन 'एमएडीसी'कडून जनहितार्थ करण्यात आले आहे.

## 'क्षितिज २०२७' महोत्सवासाठी अमरावतीच्या विद्यार्थ्यांना निमंत्रण

**अमरावती/का.प्र.**

भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) खरगपूर येथे १५ ते १७ जानेवारी २०२७ दरम्यान वार्षिक टेक्नो-मॅनेजमेंट महोत्सव 'क्षितिज २०२७' चे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या २४ व्या आवृत्तीत ४५ हून अधिक कार्यक्रम आयोजित केले जाणार असून, आयोजकांनी देशभरातील विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. अमरावती जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांनाही या महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

महोत्सवात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाशी संबंधित स्पर्धा, कार्यशाळा, अतिथी व्याख्याने, संवाद सत्रे आणि प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान, नवोपक्रम तसेच व्यवस्थापन क्षेत्रातील उदयोन्मुख संधींची माहिती करून देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.१५ जानेवारी रोजी महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यंदाच्या महोत्सवात संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) तसेच भारतीय वायुसेनेचे प्रदर्शन, ड्रोन लाइट शो आणि अन्य आकर्षक कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातील प्रगती व उपलब्धी जवळून जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. 'क्षितिज'च्या मागील आवृत्त्यांमध्ये भारताचे माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) चे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी सहभाग नोंदवला आहे. अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. के. एन. व्यास, माजी निवडणूक आयुक्त अशोक लवासा आणि डुकाटी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक बिपुल चंद्रा यांसारख्या मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. आयोजकांच्या माहितीनुसार, सर्जनशीलता आणि नवोपक्रम यांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. देशभरातील विद्यार्थ्यांना या महोत्सवाशी जोडण्यासाठी कॅम्पस ॲम्बेसेडर म्हणून नोंदणी करण्याची संधीही उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे अमरावतीसह महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील या तंत्रज्ञान महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय 'कौशल्याकडून रोजगाराकडे' कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती येथे मराठी व इंग्रजी विभागाच्या वतीने 'कौशल्याकडून रोजगाराकडे' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय कोल्हे अध्यक्ष म्हणून तर विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या कार्यकारणी सदस्य प्रा. डॉ. पूनम चौधरी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

प्रमुख मार्गदर्शक अवंती मोरे उद्घोषक आकाशवाणी अमरावती यांनी 'प्रसारमाध्यमे आणि रोजगाराच्या संधि' या विषयावर बोलताना वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून विद्यार्थिनी आपल्या कौशल्याच्या व ज्ञानाच्या आधारे रोजगार निर्मिती कशा करू शकतात ते विविध उदाहरणाच्या आधारे सांगितले. बातमीलेखन व



आकर्षक शीर्षक लेखन ,जाहिरात लेखन,जाहिरात गीतलेखन या संदर्भात त्यांनी ऊहापोह केला.नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज कारंजा घाडगे येथील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मोहन मेंढे यांचे 'इंग्रजी भाषेतून कौशल्य विकास' या मार्गदर्शन लाभले. त्यांनी यावेळी इंग्रजी भाषेतून संवाद कौशल्य विकसित करण्याकरिता कोणत्या गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत हे दैनंदिन जीवनातील दाखले देऊन पटवून दिले.डॉ. पूनम चौधरी यांनी प्रमुख अतिथि म्हणून बोलताना आजच्या धकाधकीच्या काळात विद्यार्थिनींनी स्वत:च्या पायावर उभे राहणे किती गरजेचे आहे व त्या दृष्टीने कौशल्य विकास कसा महत्वाचा आहे ते प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. अजय कोल्हे यांनी यथोचित मार्गदर्शन केले. संचालन कोमल मुंधडा प्रास्ताविक डॉ. वंदना भोयर आभार डॉ. सीमा जगताप यांनी मानले.कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी पदव्युत्तर मराठी विभागातील प्रा. डॉ. सीता शिंदे आणि प्रा. मनीषा अडगांवकर वेदिका यमगवळी,अपूर्वा जाधव,प्रगती कोंकणे, यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली

# ऑक्टोबर हिट कायम;नागरिक हैराण

**अमरावती/का.प्र.**

ऑक्टोबर महिन्याचा शेवट जवळ आला असतानाही नागरिकांना उन्हाच्या कडाक्यापासून अद्याप दिलासा मिळालेला नाही. साधारणपणे ऑक्टोबरच्या अखेरिस वातावरणात थंडावा वाढण्याची अपेक्षा असते. परंतु यंदा जिल्ह्यातील अनेक भागांत दुपारच्या वेळी उन्हाचा चटका कायम असल्याने नागरिकांना उष्णतेचा सामना करावा लागत आहे.

जिल्ह्यात दिवसा उन्हाची तीव्रता जाणवत असून रात्रीच्या तापमानात घट होत असल्याने वातावरणात काहीसा गारवा अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे दिवसाचे कडक उन्ह आणि रात्रीचा आल्हाददायक गारवा असे संमिश्र वातावरण सध्या पाहायला मिळत आहे. नांदगाव खंडेश्वर शहरातील



कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने दुपारच्या सुमारास उन्हाचा चटका अधिक जाणवत आहे. सकाळपासून वाढणारी उष्णता दुपारी तीव्र होत असल्याने बाहेर पडणाऱ्या नागरिकांना उन्हाचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत रस्त्यांवरील वर्दळ आणि बाहेरील कामकाजावर उष्णतेचा परिणाम जाणवू लागला आहे.

दुसरीकडे सूर्यास्तानंतर वातावरणात काहीसा बदल होत असून रात्रीचे तापमान साधारण १९ ते २२ अंश सेल्सिअसदरम्यान राहत असल्याने नागरिकांना दिलासा मिळत आहे. दिवसा आणि रात्रीच्या तापमानातील हा फरक सध्या हवामानाचे वैशिष्ट्य ठरत आहे. दिवसाच्या वेळी उन्हामुळे उकाडा जाणवत असला, तरी रात्रीच्या वेळी तापमान कमी झाल्याने वातावरण तुलनेने थंड होत आहे. त्यामुळे ऑक्टोबर महिना संपत असतानाही उन्हाळ्यासारखी उष्णता आणि हिवाळ्याची सुरुवातीची चाहूल अशा दोन्ही ऋतूंचा अनुभव नागरिकांना एकाच दिवसात येत आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राच्या हालचालीकडे हवामान अभ्यासकांचे लक्ष लागले आहे. या हवामान प्रणालीची दिशा आणि तिच्या पुढील वाटचालीवर वातावरणात बदल होण्याची शक्यता अवलंबून राहू शकते. कमी दाबाचे क्षेत्र उत्तरेकडे सरकल्यास काही भागांत ढगाळ वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यातून पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होते का? याकडे लक्ष राहणार आहे. मात्र ही प्रणाली तामिळनाडूच्या दिशेने सरकल्यास विदर्भातील हवामानावर तिचा परिणाम मर्यादित राहू शकतो. त्यामुळे पुढील काही दिवसांतील हवामानाचा अंदाज या प्रणालीच्या हालचालींवर अवलंबून असेल. हवामानातील बदलांचा परिणाम शेती, दैनंदिन व्यवहार आणि नागरिकांच्या आरोग्यावरही होऊ शकतो. २ नोव्हेंबरपर्यंत तापमानाची स्थिती साधारण अशीच राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## 'उल्लास नवभारत साक्षरता' कार्यक्रमांतर्गत १३ हजार १५६ असाक्षरांनी दिली परीक्षा

**अमरावती/का.प्र.**

प्रौढ व्यक्तींसह सर्वच असाक्षर व्यक्तींसाठी 'उल्लास नवभारत साक्षरता' कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात रविवारी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यांकन चाचणी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत १३ हजार १५६ असाक्षर आजी-आजोबा, काका-काकूंनी परीक्षा दिली. यावेळी त्यांच्यात अगदी शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांप्रमाणे परीक्षा उत्तीर्ण करण्याची चढाओढ दिसून आली, हे विशेष.

साधारणतः १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसित करणे, या उद्देशाने जवळपास गत तीन वर्षांपासून ही परीक्षा घेतली जात आहे. आज १० हजार ६७५ महिला, २ हजार ४७८ पुरूष, तर ३ तृतीयपंथींनी ही परीक्षा दिली. त्यामुळे महिलांमध्ये शिक्षणाची ओढ आजही कायम असल्याचे यावरून दिसून आले. या परीक्षार्थ्यांमध्ये एससी, एसटी, अल्पसंख्याक व दिव्यांगांचाही समावेश होता. शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके यांच्या मार्गदर्शनात तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) सतीश मुगल, साहाय्यक योजना अधिकारी प्रितम व्ही. गणगणे, प्राचार्य (डायट) मिलिंद कुबडे यांच्या नेतृत्वात या परीक्षेचे नियोजन करण्यात आले होते.



## दुष्काळसदृश परिस्थितीत अंजनगाव बारीच्या शेतकऱ्याची कमाल!

# टोकण पद्धतीने दोन एकरांत २६ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना सोयाबीनच्या उत्पादनात मोठा फटका बसला आहे. कुठे पिकांची वाढ खुंटली, तर कुठे उत्पादन खर्चही वसूल होणे कठीण झाले आहे.अशा परिस्थितीत अंजनगाव बारी येथील शेतकरी रविंद्र मेटकर यांनी अवघ्या दोन एकरांत २६ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन घेत लक्ष वेधून घेतले आहे.टोकण पद्धतीने केलेली पेरणी, आंतरपीक लागवड खत व्यवस्थापनाच्या त्यांच्या प्रयोगाची परिसरात चर्चा होत आहे.

रविंद्र मेटकर यांनी २२ जून रोजी 'बूस्टर हुतूतू' या वाणाची टोकण पद्धतीने पेरणी केली. शेतात बेड तयार करून त्यावर एक ओळ तूर आणि दोन ओळी सोयाबीन अशी आंतरपीक पद्धत



## कमी खर्चातील शेती प्रयोगाची चर्चा

अवलंबली. दोन एकर क्षेत्रासाठी त्यांनी २५ किलो वजनाच्या सोयाबीन बियाण्यांच्या दोन बॅग, म्हणजेच एकूण ५० किलो बियाण्यांचा वापर केला. या नियोजनातून त्यांना दोन एकरांत तब्बल २६ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन मिळाले.

शेतीचा वाढता खर्च शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरत असताना मेटकर यांनी सोयाबीन पिकासाठी कोंबडी खताचा वापर केला. तसेच पिकावर पंचामृताची फवारणी केली. उपलब्ध साधनांचा योग्य वापर आणि खर्चावर नियंत्रण ठेवण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या या प्रयोगामुळे प्रतिकूल परिस्थितीतही नियोजनबद्ध शेतीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

यंदाच्या हंगामात अनेक शेतकऱ्यांनी बियाणे, खते, कीटकनाशके आणि फवारण्यांवर मोठा खर्च केला. मात्र, पावसाच्या अनियमिततेमुळे अपेक्षित उत्पादन मिळवण्यात त्यांना अडचणी आल्या. अशा परिस्थितीत मेटकर यांनी दोन एकरांत २६ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन घेतल्याने त्यांच्या शेती व्यवस्थापनाची चर्चा होत आहे.शेतीत यश मिळवण्यासाठी योग्य नियोजन, लागवडीची पद्धत आणि खर्चाचे व्यवस्थापन महत्त्वाचे ठरू शकते, हे मेटकर यांच्या प्रयोगातून दिसून येते. मात्र, प्रत्येक शेतातील जमीन, हवामान आणि पावसाची परिस्थिती वेगळी असल्याने उत्पादनात फरक पडू शकतो. त्यामुळे त्यांच्या प्रयोगाचा अभ्यास करून स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पद्धतीचा अवलंब करणे इतर शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरू शकते.मेटकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले हे उत्पादन परिसरातील शेतकऱ्यांसाठी आशादायी ठरत आहे.



'टोकण पद्धतीने बेडवर लागवड केल्यामुळे बियाण्यांची बचत झाली, शेतातील पाणी जमिनीत मुरले, तर डवरणी व निंदणीचा खर्चही वाचला. तणनाशकाचा वापर करून कमी खर्चात चांगले उत्पादन घेता आले. 'बूस्टर हुतूतू' या वाणाच्या २५ किलो बियाण्यांतून दोन एकरांत ६० किलो वजनाचे २७ कट्टे सोयाबीनचे उत्पादन मिळाले. योग्य पेरणी व नियोजन केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पादन घेता येऊ शकते.'

**-रविंद्र मेटकर,**
अंजनगाव बारी

# पंजाबमध्ये बदलत्या वाऱ्यांची चाहूल

**पंजाबमध्ये २०२७ च्या विधानसभा निवडणुकीची चाहूल लागताच काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष बदलून पुन्हा नेतृत्वबदलाचा प्रयोग केला आहे. दुसरीकडे आम आदमी पक्षाने मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या 'इमानदार' प्रतिमेला नव्याने राजकीय रंग देण्यास सुरुवात केली आहे. नोकरशाहीमध्ये 'ईडी'च्या कारवाईची धास्ती वाढली आहे. पंजाबच्या राजकारणात आकार घेत असलेल्या मोठ्या बदलांची चाहूल दडलेली आहे. तिचाच हा वेध.**

पंजाबचे राजकारण नेहमीच राष्ट्रीय राजकारणापेक्षा काहीसे वेगळे राहिले आहे. शेतकरी, शीख अस्मिता, पाणी, केंद्र-राज्य संबंध, उद्योग, बेरोजगारी आणि अमली पदार्थ यासारखे प्रश्न येथे राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये मात्र पारंपरिक काँग्रेस-अकाली दलाच्या राजकारणाला आम आदमी पक्षाने मोठे आव्हान दिले. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून 'आप' सत्तेवर आला. आता २०२७ ची निवडणूक जवळ येत असताना सत्ताधारी पक्ष आणि विरोधक दोघांनाही आपापली राजकीय घडी नव्याने बसवावी लागत आहे. काँग्रेससाठी हा काळ विशेष महत्त्वाचा आहे. २०२१ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या अवघ्या काही महिन्यांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांना हटवून चरणजीत सिंह चन्नी यांना मुख्यमंत्री करण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत काँग्रेस सत्तेबाहेर गेली आणि आम आदमी पक्षाने मोठे यश मिळवले. आता सप्टेंबर २०२६ मध्ये, म्हणजे पुन्हा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष अमरिंदर सिंह राजा वडिंग यांची जागा परगत सिंह यांच्याकडे सोपवली आहे. दोन्ही वेळी निवडणुकीच्या आधी नेतृत्वबदल झाला. या वेळी काँग्रेसकडे भूतकाळातून शिकण्याची संधी आहे. नेतृत्वबदल हा पक्षाच्या पुनरुज्जीवनाचा भाग आहे, की अंतर्गत मतभेदांवर तात्पुरता पडदा, हे आगामी काळात स्पष्ट होईल. काँग्रेससमोर केवळ अध्यक्ष बदलण्याचा प्रश्न नाही. प्रदेशाध्यक्ष बदलणे हा संघटनात्मक निर्णय असू शकतो; पण केवळ चेहरा बदलल्याने पक्षाचे राजकीय भवितव्य बदलत नाही.

**पंजाब काँग्रेससमोर अनेक प्रश्न**

पंजाबमध्ये काँग्रेससमोर अनेक मूलभूत प्रश्न आहेत. पक्षाची संघटनात्मक ताकद पुन्हा उभी करणे, कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करणे, स्थानिक नेतृत्वाला एकत्र आणणे आणि सत्ताधारी 'आप' विरोधात विश्वासार्ह पर्याय उभा करणे ही खरी परीक्षा आहे. पंजाबच्या मतदाराला केवळ सत्ताविरोधी भावना पुरेशी नसतात, त्याला पर्याय हवा असतो. काँग्रेसने 'आप'वर टीका करणे सोपे आहे; पण सत्ता मिळाल्यास काय करणार, याचे स्पष्ट उत्तर पक्षाला द्यावे लागेल. विशेषतः रोजगार, उद्योग, शेती, अमली पदार्थांचे संकट, सरकारी वित्तव्यवस्था आणि राज्याच्या अधिकारांचा प्रश्न यावर काँग्रेसची स्वतंत्र आणि स्पष्ट भूमिका काय आहे, हे जनतेसमोर यायला हवे. पंजाब सरकारच्या आर्थिक अडचणींचे चित्र सप्टेंबरमधील एका अनोख्या घटनेतून समोर आले. काही सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांना पेट्रोल पंपांनी थकबाकी न मिळाल्याने इंधन देणे थांबवले. काही अधिकाऱ्यांना वाहन चालू ठेवण्यासाठी स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागल्याचे वृत्त आहे. नंतर वित्त विभागाकडून प्रलंबित रक्कम अदा करण्यात आली आणि इंधनपुरवठा पूर्ववत झाला. सरकारच्या म्हणण्यानुसार हा निधीअभावाचा प्रश्न नसून तांत्रिक अडथळा होता. अधिकृत स्पष्टीकरण स्वीकारले, तरी या घटनेने उपस्थित केलेला मोठा प्रश्न टाळता येत नाही. सरकारच्या दैनंदिन कामकाजातील छोट्या देयकांमध्येही विलंब होऊ लागला, तर त्याचा परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होतो. पगार, निवृत्तीवेतन, अनुदाने, विकासकामे आणि सामाजिक योजनांसाठी लागणारा निधी वेळेवर उपलब्ध होणे आवश्यक असते.

**मतदाराच्या अनुभवाला महत्त्व**

राज्याची अर्थव्यवस्था ही निवडणुकीतील केवळ आकड्यांची बाब नसते. तिचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या जीवनावर होतो. त्यामुळे २०२७ च्या निवडणुकीत पंजाबच्या आर्थिक स्थितीवर सखोल चर्चा होणे आवश्यक आहे. आम आदमी पक्षाने पंजाबमध्ये सुरुवातीपासूनच भ्रष्टाचारविरोधी आणि स्वच्छ प्रतिमेचा राजकीय संदेश दिला. 'कट्टर इमानदार' ही त्याची प्रमुख राजकीय ओळख बनली. आता विधानसभा निवडणूक जवळ येत असताना मुख्यमंत्री भगवंत मान यांना 'इमानदार मुख्यमंत्री' संबोधणारे फलक राज्यभर दिसू लागले आहेत. याकडे केवळ जाहिरात म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. निवडणुकीच्या राजकारणात प्रतिमा हे स्वतःमध्ये एक मोठे शस्त्र असते; परंतु कोणत्याही नेत्याला 'इमानदार' म्हणणे आणि प्रशासन खरोखर पारदर्शक, उत्तरदायी आणि भ्रष्टाचारमुक्त असणे यात फरक आहे. जनतेसमोर प्रश्न असा असतो, की सरकारच्या प्रतिमेचा दावा आणि प्रत्यक्ष प्रशासन यामध्ये किती अंतर आहे? राजकीय जाहिरातींमध्ये एखाद्या नेत्याची प्रतिमा कितीही उजळवता येते; पण मतदाराच्या अनुभवाला जाहिरातीपेक्षा अधिक महत्त्व असते. सरकारी कार्यालयात कामासाठी गेलेल्या नागरिकाला काय अनुभव येतो, तरुणाला रोजगाराच्या किती संधी मिळतात, शेतकऱ्याच्या उत्पन्नात काय बदल झाला, उद्योगांना राज्यात गुंतवणूक करणे किती सोपे झाले या प्रश्नांची उत्तरेच सरकारच्या प्रतिमेची खरी परीक्षा असतात. पंजाबच्या प्रशासकीय व्यवस्थेतही सध्या अस्वस्थता आहे.

**घोषणांनी प्रश्न सुटणार नाहीत**

'ग्रेटर मोहाली एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी'च्या अधिकाऱ्यांची दीर्घ चौकशी आणि मोबाइल फोन जप्त करण्याच्या कारवाईनंतर नोकरशाहीमध्ये संभाषणांबाबत सावधगिरी वाढल्याचे चित्र समोर आले आहे. व्हॉट्स ॲपवरील संदेश काही



काळाने आपोआप नष्ट होतील, म्हणून निर्णयही नष्ट होत नाहीत. फाइलवर झालेली नोंद, अधिकृत आदेश, आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय निर्णय यांना उत्तरदायित्व असतेच. नोकरशाहीने कायद्याची भीती बाळगावी; पण निर्णय घेण्याची भीती बाळगणे ही वेगळी बाब आहे. प्रत्येक अधिकारी उद्या चौकशी होईल या भीतीने निर्णय घेण्यास टाळाटाळ करू लागला, तर प्रशासनाची गती मंदावते. त्याच वेळी चौकशी यंत्रणांनीही आपले काम कायद्याच्या चौकटीत, पारदर्शकपणे आणि पुराव्यांच्या आधारे करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराविरोधातील कारवाई आवश्यक आहे; पण तिचे राजकीय शस्त्रात रूपांतर होऊ नये, ही लोकशाहीची अपेक्षा आहे. २०२७ ची निवडणूक जसजशी जवळ येईल तसतसे राजकीय पक्षांचे आरोप-प्रत्यारोप वाढतील. काँग्रेस 'आप' सरकारच्या कारभारावर टीका करेल. 'आप' आपली कामगिरी मांडेल. इतर पक्षही आपापल्या राजकीय जागा शोधतील; पण पंजाबसमोरचे प्रश्न पोस्टर आणि घोषणांनी सुटणार नाहीत. राज्याच्या अर्थव्यवस्थेला दीर्घकालीन स्थैर्य कसे मिळणार, शेतीवरील अवलंबित्व कमी करताना शेतकऱ्यांचे हित कसे जपणार, तरुणांना रोजगार देण्यासाठी उद्योग कसे आणणार, अमली पदार्थांच्या समस्येवर केवळ पोलिसी कारवाई पुरेशी आहे का, पाण्याच्या प्रश्नावर दीर्घकालीन धोरण काय असणार, सरकारी शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था कशी मजबूत करणार हे प्रश्न निवडणुकीच्या प्रचारात केंद्रस्थानी आले पाहिजेत.

दुर्दैवाने भारतीय राजकारणात अनेकदा प्रत्यक्ष धोरणांपेक्षा प्रतिमांचे राजकारण पुढे येते. कोण नेता अधिक प्रामाणिक, कोण अधिक राष्ट्रवादी, कोण अधिक लोकप्रिय, कोणाचा चेहरा मोठ्या होर्डिंगवर या स्पर्धेत मूलभूत प्रश्न मागे पडतात. पंजाबला या सापळ्यात अडकण्याची गरज नाही. २०२७ ची विधानसभा निवडणूक 'आप' साठीही मोठी परीक्षा असेल. २०२२ मध्ये जनतेने मोठ्या अपेक्षेने सत्ता दिली. त्या अपेक्षांचा किती भाग पूर्ण झाला, याचा हिशेब मतदार आता घेणार आहे. काँग्रेससाठीही ही केवळ सत्तेत परतण्याची संधी नाही. स्वतःच्या संघटनात्मक चुका, नेतृत्वातील मतभेद आणि जनतेपासून निर्माण झालेले अंतर भरून काढण्याची संधी आहे. राजकारणात चेहरे बदलणे सोपे असते; पण जनतेचा विश्वास पुन्हा मिळवणे कठीण असते. अध्यक्ष बदलता येतो, घोषवाक्य बदलता येते, होर्डिंग बदलता येते; पण मतदाराचा अनुभव बदलण्यासाठी प्रत्यक्ष काम करावे लागते. पंजाबच्या राजकारणात सध्या अनेक संकेत दिसत आहेत. काँग्रेसचा नेतृत्वबदल, आपची 'इमानदार' प्रतिमा पुन्हा अधोरेखित करण्याची धडपड, सरकारी आर्थिक अडचणी आणि नोकरशाहीवरील तपास यंत्रणांची छाया या सगळ्यांचा एकत्रित अर्थ असा, की २०२७ ची निवडणूक केवळ सत्तांतराची लढाई राहणार नाही. कोणत्या पक्षावर, नेतृत्वावर, धोरणांवर विश्वास ठेवायचा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांपैकी किती प्रत्यक्षात उतरली या प्रश्नांची उत्तरे पंजाबचा मतदार शोधणार आहे.

**प्रामाणिकपणाचा दाखला जनता देते**

राजकारणात स्वतःला 'प्रामाणिक' अशी पदवी देता येते; पण प्रामाणिकपणाचा अंतिम दाखला जनता देते. नेतृत्वबदलाने पक्षाला नवी सुरुवात मिळू शकते; पण जनतेचा विश्वास मिळवण्यासाठी नवा चेहरा नव्हे, तर नवी राजकीय दिशा आवश्यक असते. पंजाबच्या निवडणुकीच्या रणशिंगाचा आवाज आता दूर नाही. या रणांगणात घोषणा भरपूर असतील, चेहरे अनेक असतील आणि आश्वासनांची कमतरता नसेल; मात्र अखेरचा निर्णय त्या शेतकऱ्याचा, तरुणाचा, व्यापाऱ्याचा, कर्मचाऱ्याचा आणि सामान्य नागरिकाचा असेल, ज्याला जाहिरातीतील पंजाब नव्हे, तर प्रत्यक्ष आयुष्यात बदललेला पंजाब हवा आहे.

**राही भिडे**

# आंदोलनांची वाढती दहशत

हिंसक आंदोलनांनी रक्तबंबाळ झालेला फ्रान्स अजून शांत होत नाही, तोच त्याचे लोण बेल्जियम, स्पेन, इटली, पोर्तुगाल आणि अल्बेनिया या देशांमध्ये पसरले आहे. फ्रान्समध्ये खालावलेला शैक्षणिक दर्जा, अपुरे शिक्षक आणि वर्गखोल्यांची दुरवस्था यामुळे आंदोलन पेटले. युरोपमधील अन्य देशांमध्ये आंदोलने भडकण्याची कारणे वेगवेगळी आहेत. मात्र वाढती महागाई, आर्थिक संकट आणि असमानता या गोष्टी केंद्रस्थानी आहेत.

सुखासीन, ऐषोरामात जगणारा आणि मानवी हक्क या सूत्राला कवटाळून बसलेला युरोप या आंदोलनामुळे हबकला आहे. फ्रान्ससारख्या देशात आंदोलनाचे लोण बहुतांश शहरांत पसरल्यामुळे तेथील सरकार आणि प्रशासन हतबल झाल्याचे चित्र आहे. बांगलादेश, नेपाळ येथे तरुणांनी केलेल्या हिंसक आंदोलनांमुळे तेथे सत्तापालट झाला. युरोपमध्येही अशा प्रकारे सत्तापालट अपेक्षित आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो.

**आंदोलनाचे शस्त्र आणि त्याचा गैरवापर**

लोकांच्या मागण्यांची शासन दरबारी नोंद घेण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हे लोकांना मिळालेले प्रमुख शस्त्र आहे. त्याच्या वापरावर कुणाचीही आडकाठी असू नये. मात्र आंदोलने जेव्हा भरकटतात, त्याला वैचारिक किंवा तात्त्विक आधार राहत नाही, तेव्हा आंदोलनाच्या नावाखाली जमा झालेला समाज हिंसक आणि समाजविघातक होतो. युरोपमध्ये हेच पाहायला मिळते.

युरोपमधील समाज हा शांतताप्रिय, कायद्याने चालणारा, मानवतावादी आणि सुधारणावादी समजला जातो. तेथे सामाजिक भान मोठ्या प्रमाणात जपले जाते. त्यामुळे हा समाज जेव्हा हिंसक होतो, तेव्हा जमावाची माथी कोणीतरी पद्धतशीरपणे भडकवली आहेत, असे म्हणायला वाव आहे. असा हिंसाचार पचवणे युरोपला जड जात आहे.

नागरी हक्कांचे उल्लंघन होऊ नये यासाठी प्रशिक्षित असणाऱ्या पोलिसांना अशा हिंसक आंदोलनावर नियंत्रण मिळवण्याचा अनुभव नाही. त्याही पुढे जाऊन तेथील समाज आणि राजकीय रचनेवर असलेला मानवाधिकाराचा पगडा महत्त्वाचा आहे. युरोपमधील मानवी हक्क कायदे हे प्रामुख्याने 'युरोपियन कन्व्हेन्शन ऑन ह्यूमन राईट्स' या आंतरराष्ट्रीय करारावर आधारित आहेत. अनेकदा या कायद्यांमुळे पोलिसांना हिंसक आंदोलने रोखण्यात अडचणी येतात. त्यामुळे हिंसक आंदोलने रोखण्याचे आव्हान हे देश कसे पेलतील, हाच प्रश्न आहे.येथे अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे, युरोपचा मसीहा म्हणून मिरवणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आंदोलने आटोक्यात आणण्यासाठी युरोपला सहाय्य करण्याऐवजी फ्रान्समधील हिंसाचाराची खिल्ली उडवली आहे. युरोप अशांत असतानाच ट्रम्प यांनी घेतलेल्या अशा भूमिकेमुळे प्रश्नचिन्हे उपस्थित होतात.

**षड्यंत्राचा कयास आणि साम्यवादी सहभाग**

पूर्वी अमेरिकेच्या धोरणांना पाठिंबा देणारे पाश्चिमात्य देश गेल्या एक-दोन वर्षांत उघडपणे विरोध करताना दिसतात. त्यामुळे या देशांमध्ये हिंसाचार घडवून त्यांना हतबल करून पुन्हा वठणीवर आणण्यासाठी अमेरिकेनेच ही आंदोलने घडवून आणल्याचा कयास काही राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.या आंदोलनातील साम्यवाद्यांचा सहभाग लपून राहिला नाही. फ्रान्समधील हिंसक आंदोलनाच्या मागे साम्यवाद्यांच्या ५० संघटना कार्यरत असल्याचे सांगितले जाते. बेल्जियम, पोर्तुगाल, इटली येथेही हीच स्थिती आहे. युरोप खंडात साम्यवाद्यांचा एक-एक बुरुज ढासळत असताना तेथे पुन्हा प्रस्थापित होण्यासाठी ते संधी शोधत आहेत. त्यामुळे धर्मांध स्थलांतरित आणि साम्यवादी हे अतिघातक मिश्रण बनवून आंदोलनाच्या आडून सत्तांतर करण्याचे षड्यंत्र आखले गेल्याची चर्चा आहे. तेथील देश ही आंदोलने कशा प्रकारे हाताळतात, यावरून तेथील राजकीय पक्षांचे आणि युरोप खंडाचे भवितव्य ठरणार आहे.

भारतात शाहीन बाग येथील आंदोलन किंवा कृषी कायद्यांविरोधातील आंदोलनामुळे देशातील वातावरण ढवळून निघाले होते. त्यानंतर कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) केलेल्या आंदोलनातील राष्ट्रघातकी मानसिकता समोर आली आहे. या आंदोलनाला अमेरिकेने मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य केले असल्याचे निदर्शनास आले आहे, असा दावा काही जण करतात. आता हे आंदोलन हाताबाहेर गेले नसले, तरी भविष्यात त्याचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भारत सरकारनेही सतर्क राहणे आवश्यक आहे.जगभरात एक प्रकारे आंदोलनांची सुनामी आली आहे, ती रोखायाची कशी? आंदोलनाचे हत्यार उपसून सत्तांतर, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उलथापालथ करण्याचे जे षड्यंत्र रचले जात आहे, ते हाणून पाडण्यासाठी आंदोलनाचे अंतरंग जाणणे आवश्यक आहे.

**- लीना गाडगीळ**

## हॅलोविनचे अंधानुकरण नको...

सनबर्ननंतर सध्या गोव्यात हॅलोविन या पाश्चात्त्य सणाचे आकर्षण वाढताना दिसत आहे. मूळचा 'ऑल हॅलोज ईव्ह' म्हणजेच 'हॅलोविन' हा सण युरोपमधील 'सेल्टिक' संस्कृतीशी संबंधित आहे. जुन्या समजुतीनुसार, हिवाळ्याची सुरुवात आणि उन्हाळ्याची समाप्ती यांच्या दरम्यान मृतात्मे पृथ्वीवर येतात, अशी श्रद्धा होती. त्यांच्यापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी लोक भयानक मुखवटे घालत असत. कालांतराने या परंपरेचे स्वरूप बदलत गेले. आज हॅलोविनच्या निमित्ताने भुतांचे मुखवटे घालणे, भयावह वेशभूषा करणे आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे, असे प्रकार केले जातात.

लहान मुलांचे मन संवेदनशील असते. भयानक मुखवटे, भीतीदायक दृश्ये आणि वातावरण यांचा काही मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यांच्यामध्ये अनावश्यक भीती निर्माण होणे, अस्वस्थता वाढणे असा त्रास त्यांना होऊ शकतो. त्यामुळे मुलांच्या मानसिक भावविश्वाचा विचार करून अशा कार्यक्रमांचे आयोजन करताना पालक, शिक्षक आणि आयोजक यांनी काळजी घेणे आवश्यक आहे.भारतीय संस्कृतीत पितृपक्षाच्या काळात आपल्या पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा आहे. मात्र, पितृपक्षाशी संबंधित श्रद्धांची अनेकदा खिल्ली उडवली जाते, तर दुसरीकडे पाश्चात्त्य संस्कृतीचे मोठ्या उत्साहाने अनुकरण केले जाते. ही विसंगती येथे लक्षात येते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाज यांनी अशा सणांच्या आयोजनाबाबत सजग राहून मुलांना आपल्या संस्कृतीतील परंपरा, श्रद्धा आणि संस्कार यांचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. भयावह प्रतिमांचे केवळ आकर्षण वाढवण्याऐवजी मुलांमध्ये कृतज्ञता, सद्विचार आणि नैतिक मूल्ये रुजवणे महत्वाचे आहे. पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण नव्हे, तर आपल्या संस्कृतीतील उदात्त मूल्यांचे जतन आणि संवर्धन हीच काळाची गरज आहे.

**प्रिया बागडदेव**

# 'डिजिटल इंडिया'त कागदपत्रांचा ससेमिरा

सरकार डिजिटल इंडियाची घोषणा करते, ऑनलाइन सेवांचा विस्तार झाल्याचे सांगते आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासन अधिक गतिमान होत असल्याचे चित्र उभे करते. सरकारी कागदपत्रे ऑनलाइन उपलब्ध आहेत, बँकिंग सेवा डिजिटल झाल्या आहेत आणि विविध योजनांसाठी स्वतंत्र पोर्टल कार्यरत आहेत. मात्र, या सुविधांमुळे सामान्य माणसाची कागदपत्रांसाठी होणारी धावपळ खरोखर कमी झाली आहे का? सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वारंवार अर्ज, केवायसी, प्रमाणपत्रे आणि छायांकित प्रतींची पूर्तता करावी लागत असेल, तर डिजिटल क्रांतीच्या यशाचे मूल्यमापन नेमके कोणत्या निकषांवर केले जात आहे, असा प्रश्न पडतो.

आज सामान्य नागरिकाच्या दैनंदिन आयुष्यात कागदपत्रांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते. कधी आधार-पॅन जोडण्याची प्रक्रिया, कधी बँकेची केवायसी, कधी लाडकी बहीण योजनेचा अर्ज आणि त्याची वारंवार होणारी केवायसी, कधी शेतकऱ्यांचा फार्मर आयडी, तर कधी महिला शेतकरी प्रमाणपत्र, पीएम-किसान योजनेतील ई-केवायसी आणि मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षणासारख्या प्रक्रियांमध्येही आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करावी लागू शकतात.

प्रत्येक प्रक्रियेचा स्वतंत्र उद्देश आणि नियम असू शकतात. मात्र, या सगळ्या प्रक्रियांचा एकत्रित भार नागरिकांवर किती पडतो, याचाही विचार होणे आवश्यक आहे. लाभार्थींची ओळख पडताळणे, अपात्र व्यक्तींना योजनांचा लाभ मिळू न देणे, आर्थिक गैरव्यवहार रोखणे आणि सार्वजनिक निधी योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचवणे या प्रशासनाच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत. त्याबद्दल आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु ही उद्दिष्टे साध्य करताना नागरिकांना प्रत्येक वेळी त्याच माहितीची पुनरावृत्ती करण्यास भाग पाडणे कितपत आवश्यक आहे? नागरिकांची ओळख, पत्ता आणि इतर तपशील यापूर्वीच नोंदवलेले असतील, तर त्या माहितीची सुरक्षितपणे पडताळणी करून तिचा पुनर्वापर करता येणार नाही का? 'डिजिलॉकर'सारख्या सुविधांचा उद्देश कागदपत्रे उपलब्ध करून देणे आणि त्यांची पडताळणी सुलभ करणे हा आहे.

डिजिलॉकरमधून अधिकृतरीत्या जारी केलेल्या कागदपत्रांना संबंधित नियमांनुसार मूळ भौतिक कागदपत्रांइतकी कायदेशीर मान्यता आहे. मात्र, स्वत: अपलोड केलेली कोणतीही छायाप्रत आणि संबंधित संस्थेने अधिकृतरीत्या जारी केलेले डिजिटल कागदपत्र यांत फरक आहे. तरीही नागरिकांना अनेक व्यवहारांत आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेऊन जावे लागते. बँकेत यापूर्वीच कागदपत्रे दिलेली असतानाही पुन्हा प्रती मागितल्या जातात, असा अनेकांचा अनुभव आहे.

मोठ्या आर्थिक व्यवहारांसाठी पॅन क्रमांक आवश्यक असण्यामागे करव्यवस्थेतील पारदर्शकता आणि व्यवहारांचा मागोवा घेण्याची गरज आहे. मात्र, पॅन क्रमांक नमूद करणे, त्याची पडताळणी करणे आणि प्रत्येक वेळी त्याची छायांकित प्रत जमा करणे या वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या केवायसीविषयक निर्देशांमध्येही हीच भूमिका दिसते. केंद्रीय केवायसी नोंदणी संस्थेकडे (सीकेवायसीआर) उपलब्ध असलेली माहिती ग्राहकाच्या केवायसी आयडेंटिफायरच्या आधारे मिळवता येत असेल, तर तीच माहिती किंवा तीच कागदपत्रे पुन्हा मागू नयेत, अशी तरतूद आहे. मात्र, ग्राहकाच्या माहितीमध्ये बदल झाला असेल, नोंदी अपूर्ण असतील,



कागदपत्रांची वैधता संपली असेल किंवा ओळख व पत्त्याची अधिक पडताळणी आवश्यक असेल, तर अतिरिक्त माहिती मागवण्याचीही तरतूद आहे. म्हणजेच केवायसीची गरज नाकारणे हा मुद्दा नाही; आवश्यक पडताळणी करताना अनावश्यक पुनरावृत्ती टाळणे हा मुद्दा आहे.

**'पीएम- किसान'ची गत**

शेतकऱ्यांबाबतीत हा प्रश्न अधिक संवेदनशील ठरतो. पीएम-किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना वर्षाला सहा हजार रुपये तीन समान हप्त्यांत दिले जातात. या लाभासाठी ई-केवायसीसह योजनेच्या इतर अटींची पूर्तता करावी लागते. मात्र, प्रत्येक हप्त्यापूर्वी प्रत्येक शेतकऱ्याने नव्याने ई-केवायसी करणे आवश्यक आहे, असे सरसकट म्हणता येत नाही. एखाद्या शेतकऱ्याची ई-केवायसी पूर्ण असूनही पोर्टलवर स्थिती अपूर्ण दिसत असेल किंवा पुन्हा प्रक्रिया करण्यास सांगितले जात असेल, तर त्यामागचे कारण स्पष्ट केले पाहिजे. पात्रतेची किंवा नोंदींची पुनर्पडताळणी आवश्यक असेल, तर ती कशासाठी आहे आणि पुढे काय करायचे, याची माहिती शेतकऱ्याला सहज मिळाली पाहिजे.

'पीएम-किसान'च्या अधिकृत माहितीनुसार ई-केवायसीसाठी ओटीपी, सामायिक सेवा केंद्रांवरील बायोमेट्रिक पडताळणी आणि मोबाइल ॲपद्वारे फेस ऑथेंटिकेशन असे पर्याय उपलब्ध आहेत. योजनेच्या अधिकृत मार्गदर्शक दस्तऐवजात सीएससीमार्फत ई-केवायसीसाठी पंधरा रुपये सुविधा शुल्क नमूद केले आहे. प्रत्यक्षात काही शेतकऱ्यांकडून शंभर रुपयांपर्यंत फी आकारली जात असल्याच्या तक्रारी असतील, तर त्यांची स्वतंत्रपणे चौकशी झाली पाहिजे. मात्र, हा प्रत्येक केंद्राचा अधिकृत दर आहे किंवा सर्वत्र इतकीच जादा आकारणी होते, असा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढता येणार नाही. आकारण्यात येणारे शुल्क स्पष्टपणे प्रदर्शित करणे, पावती देणे आणि जादा आकारणीविरोधात तक्रार करण्याची सोपी व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन प्रक्रिया स्वत: पूर्ण करणे शक्य होत नाही. आधारशी जोडलेल्या मोबाइल क्रमांकाची अनुपलब्धता, इंटरनेटची समस्या, बोटांचे ठसे न जुळणे किंवा तांत्रिक अडचणी यांमुळे त्यांना सेवा केंद्रावर जावे लागते. त्यासाठी प्रवासाचा खर्च, प्रतीक्षा आणि कामाचा खोळंबा सहन करावा लागतो. एका दिवसाचे शेतीकाम सोडून एखाद्या नोंदणीसाठी किंवा प्रमाणपत्रासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागणे हीदेखील आर्थिक हानीच आहे. सरकारी योजनेचा लाभ मिळवण्यासाठीच शेतकऱ्याला वेळ आणि पैसा खर्च करावा लागत असेल, तर त्या व्यवस्थेच्या सुलभतेचा पुनर्विचार झाला पाहिजे.

यामागे केवळ पैशांचा प्रश्न नाही; तर वेळ, श्रम आणि प्रतिष्ठेचाही प्रश्न आहे. डिजिटल साक्षरतेचा अभाव असलेल्या नागरिकांना मदत करणे हीदेखील डिजिटल सेवांच्या अंमलबजावणीचा भाग असला पाहिजे. यासाठी सर्व विभागांतील माहिती कोणत्याही निर्बंधांशिवाय एकमेकांना उपलब्ध करून देणे हा उपाय नाही. वैयक्तिक माहितीची सुरक्षितता, नागरिकांची संमती, माहितीचा मर्यादित व योग्य वापर आणि गैरवापराविरोधातील संरक्षण या बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत.मात्र, आवश्यक तेवढीच माहिती योग्य परवानगीने आणि सुरक्षित पद्धतीने पडताळता येईल, अशी परस्पर-सुसंगत यंत्रणा उभी करता येऊ शकते. नागरिकाने एकदा दिलेली माहिती नियमांच्या चौकटीत पुन्हा वापरणे, अधिकृत डिजिटल कागदपत्रे स्वीकारणे, अर्जातील त्रुटी स्पष्टपणे सांगणे आणि पडताळणीसाठी लागणारा कालावधी कमी करणे यांवर भर दिला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी 'फार्मर आयडी'सारखे उपक्रमही याच कसोटीवर तपासले पाहिजेत. विविध योजनांमधील नोंदणी, पात्रता पडताळणी आणि लाभवितरण अधिक सुलभ करणे हा अशा उपक्रमांचा अपेक्षित उद्देश आहे. मात्र, नवीन ओळख क्रमांकामुळे जुन्या प्रक्रिया कमी होण्याऐवजी त्याबरोबर आणखी एक नोंदणी, आणखी एक पडताळणी आणि आणखी एक कागदपत्र जोडले गेले, तर अपेक्षित लाभ साध्य होणार नाही. नवीन व्यवस्था आणताना कोणत्या जुन्या प्रक्रिया कमी होतील, नागरिकांच्या किती फेऱ्या वाचतील आणि लाभ मिळण्याचा कालावधी किती घटेल, हेही स्पष्ट असले पाहिजे.सरकारने योजना आखाव्यात, पात्रता तपासावी आणि सार्वजनिक निधीचा योग्य विनियोग सुनिश्चित करावा. पण या प्रक्रियांचा अनावश्यक भार नागरिकांवर पडणार नाही, याची काळजी घ्यावी.

**अक्षय अरुण शेळके**

# गोर बंजारा आरक्षणासाठी हिवाळी अधिवेशनात आवाज उठवा!

## दीड हजारांवर ग्रामपंचायतींचे ठराव मुख्यमंत्री, राज्यपालांना पाठवणार

### लोकप्रतिनिधींच्या घरांना घेराव घालण्याचा गोरसेनेचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

गोर बंजारा समाजाच्या अनुसूचित जमातीच्या (एसटी) आरक्षणाचा प्रश्न आता हिवाळी अधिवेशनात गाजवण्याची तयारी गोरसेनेने केली आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करावा, अन्यथा खासदार आणि आमदारांच्या घरांना घेराव घालून जाब विचारण्यात येईल, असा इशारा गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेतून दिला आहे. दीड हजारांहून अधिक ग्रामपंचायतींचे ठराव मुख्यमंत्री आणि राज्यपालांना पाठविण्याची तयारीही करण्यात येत आहे.

गोर बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज यांनी दिल्लीतील जंतरमंतर आणि मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर नायक काशिनाथ यांनी समाजात जनजागृतीसाठी प्रयत्न केले. आता प्रा. संदेशभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गोरसेनेने राज्यभर आंदोलनाची भूमिका घेतली आहे. गेल्या वर्षभरात समाजाच्या वतीने ५६ महामोर्चे काढण्यात आले, १७ युवकांनी आमरण उपोषण केले, तर आंदोलनादरम्यान आठ युवकांनी प्राण गमावल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. समृद्धी महामार्ग रोखूनही शासनाचे लक्ष वेधण्यात आले. रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर माजी न्यायमूर्ती तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करण्यात आली. मात्र, या समितीच्या अहवालाचे पुढे काय झाले, त्यातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. १२ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आरक्षण मेळावा घेण्यात आला होता. त्यानंतर दीड हजारांहून अधिक ग्रामपंचायतींनी आरक्षणाच्या समर्थनार्थ ठराव मंजूर केल्याचे गोरसेनेने म्हटले आहे. या ठरावांच्या माध्यमातून समाजाची मागणी शासनापर्यंत पोहोचवून हिवाळी अधिवेशनात आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी लोकप्रतिनिधींवर दबाव वाढविण्याची रणनीती आखण्यात येत आहे.



#### लोकप्रतिनिधींना लेखी उत्तर द्यावे लागणार?

आरक्षणाचा प्रश्न हिवाळी अधिवेशनात प्रभावीपणे मांडण्यासोबतच, या मागणीसाठी आतापर्यंत केलेल्या प्रयत्नांची आणि पुढील भूमिकेची लेखी माहिती लोकप्रतिनिधींनी गोर बंजारा आरक्षण कृती समितीला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधी नेमकी काय भूमिका घेतात, याकडे समाजाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनात्मक भूमिकेत अजाबराव राठोड, मनोहर राठोड, कुलदीप चव्हाण, शिवराज जाधव, रवी राठोड, यशपाल जाधव, कुणाल जाधव, डॉ. विकास जाधव, मयूर पवार, आत्माराम जाधव, सतीश राठोड, घनश्याम राठोड, रवींद्र जाधव आणि गणेश राठोड यांच्यासह अन्य कार्यकर्ते सहभागी आहेत.

#### आरक्षण मिळेपर्यंत आदिवासींच्या सुविधा द्या!

गोर बंजारा समाजाला एसटी आरक्षण मिळेपर्यंत आदिवासी विकास विभागांतर्गत केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुसूचित जमातींसाठी असलेल्या सुविधा, सवलती व योजना लागू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तहलियानी समितीच्या शिफारशी तातडीने केंद्र सरकारकडे पाठवाव्यात, आंदोलनादरम्यान प्राण गमावलेल्या युवकांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी आणि त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे, अशीही मागणी आहे. आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे विनाशर्त मागे घेण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# वंचित बहुजन आघाडीचा चर्मकार समाजावर फोकस

### डॉ. गणेश बोरकर यांचा पक्षप्रवेश




#### चर्मकार समाजाच्या प्रश्नांवर प्रकाश आंबेडकरांशी चर्चा; उपवर्गीकरणविरोधी लढ्यातील महत्त्वाचा चेहरा वंचितच्या गोटात

■ प्रतिनिधी | अकोला ■

वंचित बहुजन आघाडीने सामाजिक आणि राजकीय विस्ताराच्या दृष्टीने चर्मकार समाजाला पक्षाच्या चळवळीत सक्रियपणे सहभागी करून घेण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. चर्मकार समाजातील सामाजिक कार्यकर्ते तथा नेते डॉ. गणेश बोरकर यांनी आपल्या असंख्य सहकाऱ्यांसह वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. अकोल्यातील पक्ष कार्यालयात वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.

डॉ. गणेश बोरकर हे चर्मकार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष असून, अकोल्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत संत रविदास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्यांमध्येही त्यांचा समावेश आहे. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे सामाजिक आणि राजकीय वर्तुळात या घडामोडीला महत्त्व प्राप्त झाले आहे. पक्षप्रवेशानंतर डॉ. बोरकर यांच्यासह चर्मकार समाजातील नेते आणि पदाधिकाऱ्यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याशी समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. चर्मकार समाजाच्या समस्या, सामाजिक न्याय आणि अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा यावर यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

राज्यात चर्चेत असलेल्या अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणविरोधी लढ्यात डॉ. बोरकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या विषयावर राज्यातील विविध ठिकाणी त्यांनी केलेल्या भाषणांना प्रतिसाद मिळाला आहे. तसेच या लढ्याच्या माध्यमातून चर्मकार समाजाला बौद्ध समाजासोबत जोडण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले आहेत. चर्मकार समाजातील प्रभावी सामाजिक नेतृत्वाला पक्षाशी जोडण्याच्या या घडामोडीकडे वंचित बहुजन आघाडीच्या सामाजिक विस्ताराच्या दृष्टीने पाहिले जात आहे. डॉ. बोरकर यांच्या प्रवेशामुळे चर्मकार समाजाचे प्रश्न पक्षाच्या राजकीय व्यासपीठावर अधिक ठळकपणे मांडले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यांच्या पक्षप्रवेशाचा आगामी राजकीय समीकरणांवर काय परिणाम होतो, याकडे आता लक्ष लागले आहे. या पक्षप्रवेशावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद भाऊ देंडवे, पश्चिम शहर कार्याध्यक्ष हाजी मजहर खान, पश्चिम शहर महासचिव गजानन दादा गवई, पूर्व शहर महासचिव दामोदरजी जगताप, तालुका प्रसिद्धी प्रमुख, मोहन तायडे, उत्तमराव खंडारे, शरद इंगोले आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७४७/२०२६ प्रोसेस नं.१३५२८/२०२६

चौ.ता. ०१/१२/२०२६ दिनांक : २२/१०/२०२६

**अर्जदार :** १. अनिल देविदास पिंपळे रा. ए८, अथर्व अपार्टमेंट, प्लॅट क्र. ५७, सेक्टर १, इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे. ता. जि. पुणे. ह. मु. अनिता मोटर्स जवळ, प्लॅट नं. ३९, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. रेखा सुभाष घाटोळ रा.गणेश नगर, राम रक्षा अपार्टमेंट ए४, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : विमल देविदास पिंपळे

**पत्ता :-** रा. जवाहर नगर, प्लॅट नं. ३९, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विमल देविदास पिंपळे यांचे दि. ०३/०९/२०२६ रोजी जवाहर नगर, प्लॅट नं. ३९, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# तुदगावच्या घशाला कोरड; पाण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव!

### माणसांसह मुक्या जनावरांचीही तहान भागवा; ग्रामस्थांच्या निवेदनानंतर आश्वासन



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

गावात पाणीटंचाईचे संकट गडद झाले असून नागरिकांसह मुक्या जनावरांचीही पाण्यासाठी परवड होत आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामहितासाठी पुढाकार घेणाऱ्या प्रतिनिधींनी सोमवारी (२६ ऑक्टोबर) जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत निवेदन सादर केले. लवकरच पाण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन मिळाले असले, तरी ग्रामस्थांना प्रत्यक्ष पाणी मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे.

प्रशांत देशमुख, डॉ. संजीवनीताई बिहाडे, ॲड. संदीप देशमुख, मोहनराव अंजनकर आणि अनंत सोनमाळे यांनी तुदगावच्या पाणीप्रश्नावर प्रशासनाचे लक्ष केंद्रित केले. गावातील नागरिकांची गैरसोय दूर करण्यासोबतच मुक्या जनावरांसाठीही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी त्यांनी केली.

पाणीटंचाईमुळे गावकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असताना जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी लवकरच पाण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले; मात्र ही व्यवस्था नेमकी कधी होणार, याबाबत ग्रामस्थांना प्रतीक्षा आहे.

पाणी हा मूलभूत गरजेचा प्रश्न असून तो केवळ आश्वासनांवर सुटणार नाही. संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना करून तुदगावच्या नागरिकांसह मुक्या जनावरांची तहान भागवावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# शिवसृष्टीच्या कामाची तांत्रिक तपासणी करा!

### अंदाजपत्रक, साहित्याचा दर्जा आणि प्रत्यक्ष कामाची पडताळणी करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टीच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. मंजूर अंदाजपत्रकानुसार काम सुरू आहे का, वापरण्यात येणारे साहित्य दर्जेदार आहे का आणि प्रत्यक्ष काम व खर्चात तफावत आहे का, याची सखोल तांत्रिक तपासणी करण्याची मागणी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार अर्जाद्वारे करण्यात आली आहे.

शिवसृष्टी हा ऐतिहासिक अस्मितेशी निगडित प्रकल्प असल्याने बांधकामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये, अशी भूमिका तक्रारकर्त्यांनी मांडली आहे. मंजूर आराखडा, तांत्रिक मान्यता, कार्यादेश, कामाचे मोजमाप आणि साहित्याचा दर्जा यांची सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करून पडताळणी करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. तपासणीत निकृष्ट साहित्याचा वापर, कामातील अनियमितता किंवा मंजूर अंदाजपत्रकापासून विचलन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी. तसेच प्रकल्पावरील खर्च आणि तपासणीचा अहवाल लेखी स्वरूपात द्यावा, अशी मागणी आहे. नगर परिषद प्रशासनाने दखल न घेतल्यास वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचा इशाराही तक्रारकर्त्यांनी दिला आहे.



#### अनियमितता आढळल्यास कारवाईचे साकडे

या तक्रार अर्जावर सचिन थाटे, गौरव धुळे, विशाल नांदोकार आणि विशाल जवंजाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, तक्रारीतील मुद्द्यांची अधिकृत तांत्रिक तपासणी झालेली नसल्याने बांधकामातील अनियमितता अद्याप सिद्ध झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या तपासणीकडे लक्ष लागले आहे.


## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७७९/२०२६ प्रोसेस नं.१३३०९/२०२६

चौ.ता. ३०/११/२०२६ दिनांक : १७/१०/२०२६

**अर्जदार :** त्रिंबक पुरुषोत्तम देशपांडे मो. क्र. ९४०५९०२११३ रा. मुकुंद मंदिर नगर, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : सुमन पुरूषोत्तम देशपांडे

**पत्ता :-** रा. मुकुंद मंदिर नगर, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुमन पुरूषोत्तम देशपांडे यांचे दि. २९/०७/२०२५ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## Change In Name

I have changed my name from **SHEKH AMIR SHEKH HARUN** -to- **SHAIKH AMEER SHAIKH HARUN** (Passport No. W7673843) Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura,Juni Basti Murtizapur PO-Murtizapur DIST-Akola, Maharashtra-444107

## Change In Name

I have changed my name from **MO. SHAKIR SHEKH HARUN** -to- **MO. SHAKIR SHAIKH HARUN** (Passport No. W7673844) Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura,Juni Basti Murtizapur PO-Murtizapur DIST-Akola, Maharashtra-444107


### गरजू विद्यार्थ्यांना १२ लाख ९८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती

**अकोला :** सामाजिक आणि शैक्षणिक सेवेत गेल्या सात वर्षांपासून कार्यरत असलेल्या महेश शिक्षा कोषच्या वतीने माहेश्वरी समाजातील गरजू गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व करिअर सहायतासाठी शिष्यवृत्ती वितरण करण्यात आली. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या उद्देशाने सेवाकार्य करत असलेला महेश शिक्षा कोष हा रचनात्मक उपक्रम पुढे नेत आहे.


## Change In Name

I have changed my name from **KAUSAR JAHA SHEKH AMIR** -to- **KAUSAR JAHA SHAIKH AMIR** (Passport No. W7673843) Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura,Juni Basti Murtizapur PO-Murtizapur DIST-Akola, Maharashtra-444107

## Change In Name

I have changed my name from **MOHAMMAD ARIF SHEKH HARUN** -to- **MOHAMMAD ARIF SHAIKH HARUN** (Passport No. W7673845) Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura,Juni Basti Murtizapur PO-Murtizapur DIST-Akola, Maharashtra-444107

## Change In Name

I have changed my name from **SHEKH AMEER SHEKH HARUN** -to- **SHAIKH AMEER SHAIKH HARUN** (Passport No. S2875311) Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura,Juni Basti Murtizapur PO-Murtizapur DIST-Akola, Maharashtra-444107

## Change In Name

I have changed my name from **KAUSAR JAHA** -to- **KAUSAR JAHA SHAIKH AMIR** (Passport No. S2875311) Address : C/O Shaikh Harun Nalsahab Pura, Juni Basti Murtizapur PO-Murtizapur DIST-Akola, Maharashtra-444107

## जाहीर नोटी

**वि. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, अकोला यांचे न्यायालय**

ए.पि. नं. ६५/२०२६ चौ.ता. ०८/१२/२०२६

गणेश विरुध्द सौ. दिपीका

**अर्जदार :** गणेश देविदास कंडारकर वय. ४६ वर्ष, धंदा निल रा. मोठी उमरी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार क्र. २ :** सौ. दिपीका गणेश कंडारकर वय अंदाजे - ३६ वर्ष, धंदा -घरकाम रा. व्ही. एच.बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला

ज्याआर्थी अर्जदार यांनी या **हिंदू विवाह अधिनियचे कलम 13(1)(iA) (iB) अन्वये घटस्फोटा चा आदेशाकरीता या न्यायालयात अर्ज केला आहे.** त्याअर्थी, याव्दारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जा विरूध्द कारण दाखवण्या करीता दिनांक ०८/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास उक्त याचीकेची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. जर चौकशी तारीख ०८/१२/२०२६ पर्यंत कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जाईल असे सर्वांना या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येत आहे. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
**प्र. प्रबंधक**
कौटुंबिक न्यायालय, अकोला.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# अकोटमध्ये वंचित बहुजन आघाडीची ताकद वाढली!

## राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांसह काँग्रेसच्या पदाधिका-यांचा पक्षप्रवेश

### चरण इंगळे यांच्या नेतृत्वाला बळ




■ प्रतिनिधी | अकोट ■

व्अकोट तालुक्यात वंचित बहुजन आघाडीने संघटनात्मक विस्ताराच्या दिशेने पाऊल टाकले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांसह काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. तालुकाध्यक्ष चरण इंगळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात ओबीसी आणि मुस्लिम समाजातील असंख्य कार्यकर्त्यांनीही पक्षात प्रवेश केल्याने अकोटच्या राजकीय वर्तुळात या घडामोडीची चर्चा सुरू झाली आहे.

पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) अकोट शहराध्यक्ष संदेश सुरेश घनबहादुर, काँग्रेसचे बारी समाज प्रदेशाध्यक्ष तथा डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. श्याम नेमाळे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) येथील प्रवीण धांडे आणि मुरलीधर तेलगोटे यांच्यासह दिलीप लायसे, गौतमजी पळधामोल, विजयजी तेलगोटे आणि स्वप्निल घनबहादुर यांचा समावेश आहे. विविध राजकीय पक्षांतील पदाधिकाऱ्यांनी वंचित बहुजन आघाडीचा पर्याय स्वीकारल्याने अकोट तालुक्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे. विशेषतः ओबीसी आणि मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांचा सहभाग पक्षाच्या स्थानिक राजकारणातील भूमिकेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, माजी नगरसेवक गजानन गवई, महिला जिल्हाध्यक्ष आम्रपाली खंडारे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संगिता अढाऊ, काशीराम साबळे, नगरसेवक इमरान पठाण, नगरसेविका लता कांबळे, निखिल गावंडे, डॉ. अनिल गणगणे, रोशन पुंडकर, निलेश झाडे, सुरेंद्र ओइंबे आणि संजय पुंडकर संभा थोरात, गोपाल ढोरे, लखन इंगळे, अषय तेलगोटे, सुभाष तेलगोटे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### अकोटच्या राजकारणात नवी समीकरणे?

विविध पक्षांतील पदाधिकारी आणि सामाजिक घटकांतील कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीतील प्रवेश हा आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर लक्षवेधी ठरत आहे. या प्रवेशामुळे पक्षाची स्थानिक पातळीवरील संघटनात्मक बांधणी कितपत मजबूत होते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रीय दृष्टिहीन संघ-जागृत दृष्टी साहित्य संमेलनाची सांगता

# दृष्टिहीनांच्या हितासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार-डॉ.पंकज भोयर




**वर्धा/जनमाध्यम**
जागृत दृष्टी साहित्य संमेलनाने समाजाला नवी दिशा दिली असून संमेलनात मांडण्यात आलेल्या प्रस्तावांचा गांभीर्याने विचार केला जाईल व दृष्टिहीनांच्या हितासाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पहिल्या राज्यस्तरीय जागृत दृष्टी साहित्य संमेलनाच्या समारोप समारोहात दिली.

राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र या केंद्रीय संघटनेद्वारे स्थानिक स्वाध्याय मंदिर सभागृहात आयोजित या समारोहाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक संजय इंगळे तिगावकर होते. यावेळी, कृषिविचारक ॲड. दिनेश शर्मा, राष्ट्रीय दृष्टिहीन संघाचे राज्याध्यक्ष भोजराज पाटील, महासचिव डी. पी. जाधव, कोषाध्यक्ष डी.एन.मरडे, माजी अध्यक्ष लक्ष्मण खापेकर, मानद अध्यक्ष कविता बिराजदार, राष्ट्रीय सचिव जगदीप कवाळ, कार्यकारी सदस्य राहुल बिजवे, विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते, संस्कार भारतीचे जिल्हा मंत्री मकरंद उमाळकर, संमेलन समन्वयक नरेंद्र नरोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारोप समारोहात संमेलनाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर यांनी, दृष्टिहीनांचा लोकशाही प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग असावा यासाठी विधान परिषद तसेच राज्यसभेवर त्यांच्यातून एकेक प्रतिनिधी नियुक्त करण्यात यावा, जेणेकरून त्यांना स्वतः आपल्या समस्या मांडता येतील व त्या सोडविण्याकरिता उपाययोजनाही सुचवता येतील, अशी मागणी करीत राष्ट्रीय दृष्टिहीन संघाच्यावतीने नऊ प्रस्ताव मांडले. यावेळी, राष्ट्रीय दृष्टिहीन संघ ही सर्वमान्य व केंद्रीय संस्था असून या संस्थेला दरवर्षी जागृत दृष्टी साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी अन्य संमेलनांप्रमाणे शासन निधी उपलब्ध करून द्यावा, महाराष्ट्रात आयोजित मुख्य साहित्य संमेलनांमध्ये दृष्टिबाधितांकरिता एक स्वतंत्र सत्र असावे, साहित्य अकादमीवर किमान एक दृष्टिबाधित प्रतिनिधी नियुक्त करण्यात यावा, दृष्टिहीन साहित्यिकांच्या साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे साहित्य ब्रेल लिपीत प्रसिद्ध करण्यात यावे, मराठी व अन्य भाषांतील उत्कृष्ट साहित्य ब्रेल लिपीत उपलब्ध करून द्यावे, ब्रेल पुस्तकांप्रमाणेच मोठ्या प्रमाणात दर्जेदार साहित्यावरील ध्वनिपुस्तके (ऑडिओ बुक) उपलब्ध करून द्यावीत, शैक्षणिक संस्था तथा विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात दृष्टिहिनांच्या प्रेरक साहित्याचा समावेश करण्याबाबत राज्य शासनाच्या भाषा व सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून शासकीय अध्यादेशाद्वारे निर्देश देण्यात यावेत, शासनाद्वारे दरवर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य पुरस्कारांच्या नियोजनात दृष्टिबाधित व दिव्यांगांच्या उत्तम साहित्यकृतीसाठीही स्वतंत्र तरतूद असावी, आदी ठरावांवर सभागृहाची मान्यता घेण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.पी.जाधव यांनी केले. संचालन ज्योती भगत यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष राजेंद्र देवरे यांनी मानले.या संमेलनाच्या यशस्वितेसाठी प्रा.शैला शिरीष देशपांडे,प्रसन्न कवडीकर,अश्विनी कोतवाल,डॉ. प्रदीप सुने,डॉ. विनोद अदलखिया,डॉ.जयंत मकरंदे,डॉ. सचिन पावडे, विजय चोपडे,सुवर्णा डोंगरे,डॉ.यश लालवानी,डॉ.यश काशीकर,डॉ. पियुष गुप्ता,विशाल मानकर, विशाल धांदे,प्राचार्य डॉ.मिलिंद सवाई,श्रीकांत राठी,सुरेखा धोंगडे,राजेंद्र राजूरकर, कैलाश मोहर्ले, सुरेखा धोंगडे,तुफान डोये,दिव्या पाटील, सोनाली,पियूष पाटील,निकेश राऊत तसेच आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

राष्ट्रीय दृष्टिहीन संघाच्या मागण्यांना राज्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद दृष्टिहीन संघाचे महासचिव डी. पी. जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकातून शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांना शासनाकडे प्रलंबित असलेल्या मागण्यांची आठवण करून दिली.

आळंदी येथील जागृती अंधकन्या विद्यालयाशी संबंधित विविध प्रश्न, नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यासंदर्भात मंजुरी,वाढीव विद्यार्थी संख्येस मान्यता, नाशिक येथील संगणक प्रशिक्षण केंद्राला अनुदानित दर्जा मिळवून देणे,संभाजीनगर येथे अठरा वर्षांवरील मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण केंद्राला शासनाचे अंशतः अनुदान असून ते शंभर टक्के करण्यात यावे,आदी मागण्यांसह महाराष्ट्राशी संलग्न असलेले दृष्टिहीन संघाचे सर्व प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही ना. भोयर यांनी यावेळी दिली.

## कापूस हातात कमी, संकट मात्र मोठे

### खरेदी केंद्रे मोजकीच सुरू; खासगी व्यापाऱ्यांकडून ९४०० ते ९५०० रुपये भाव

**मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**
यंदा निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसलेल्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या हाती कापूस कमी आला, तर शेतीचा खर्च मात्र वाढतच गेला. अशा परिस्थितीत जिल्ह्यात कापूस खरेदीचा हंगाम सुरू झाला असला, तरी बहुतांश ठिकाणी खरेदी केंद्रे अद्याप सुरू झालेली नाहीत. खासगी व्यापारी प्रतिक्विंटल ९ हजार ४०० ते ९ हजार ५०० रुपये भाव देत असल्याने शेतकरी त्यांच्याकडे कापूस विक्रीस प्राधान्य देत आहेत. दुसरीकडे, भारतीय कापूस महामंडळाच्या (सीसीआय) खरेदी केंद्रावर चांगल्या प्रतीच्या कापसाला प्रतिक्विंटल ८ हजार ६६७ रुपये दर मिळत आहे. उत्पादनातील घट आणि खरेदी केंद्रांची मर्यादित संख्या यामुळे शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. यंदा पावसाने दिलेल्या दीर्घ खंडामुळे कोरडवाहू शेतीचे गणितच बिघडले. कापसाच्या पिकाला अपेक्षित पाणी न मिळाल्याने अनेक शेतांमध्ये बोंडांची संख्या घटली. परिणामी, उत्पादनात मोठी घसरण झाली असून शेतकऱ्यांच्या हाती यंदा मोजकाच कापूस आला आहे. बोंडे पूर्णपणे फुटल्यानंतर सीतादहीची विधिवत पूजा करून कापूस घरी आणण्याची परंपरा शेतकरी जपत असले, तरी यंदाच्या कमी उत्पादनामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हरवले आहे. जिल्ह्यात मोजकीच कापूस खरेदी केंद्रे सुरू असल्याने विक्रीसाठी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. खासगी व्यापाऱ्यांकडून मिळणारा दर सीसीआयच्या तुलनेत अधिक असल्याने शेतकरी खासगी खरेदीदारांकडे वळत आहेत. मात्र, यंदा उत्पादनच कमी असल्याने चांगला भाव मिळाला तरी एकूण उत्पन्नातून शेतीचा खर्च भरून निघेलच, याची खात्री नाही. उत्पादनात घट, दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च आणि त्यात खरेदी केंद्रांची मर्यादित उपलब्धता, अशा तिहेरी शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठे सावट निर्माण झाले आहे.

## खत बुकिंगचे एफएफएस ॲप शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी

### ऑनलाइन बुकिंगच्या जाचातून मुक्त करा; अन्यथा आंदोलन छेडणार-शुभम नागपुरे यांचा इशारा

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**
रासायनिक खत खरेदीसाठी शासनाने लागू केलेली एफएफएस ॲपवरील ऑनलाइन बुकिंग प्रणाली शेतकऱ्यांसाठी गैरसोयीची ठरत असल्याने ती तातडीने बंद करावी आणि कृषी सेवा केंद्रांमधून खताची थेट विक्री सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते शुभम उद्धवराव नागपुरे यांनी केली आहे. शासनाने याबाबत त्वरित निर्णय न घेतल्यास आंदोलन पुकारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

हरभरा आणि गव्हाच्या पेरणीचा हंगाम सुरू असताना खत खरेदीसाठी ऑनलाइन बुकिंगची अट शेतकऱ्यांसमोर नवी अडचण निर्माण करीत आहे.अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नसणे,ॲप हाताळण्याचे अपुरे ज्ञान आणि ग्रामीण भागातील नेटवर्कच्या समस्या यामुळे बुकिंग करताना अडथळे येत आहेत. परिणामी,खत खरेदीसाठी कृषी केंद्रांवर जाऊनही शेतकऱ्यांची निराशा होत असल्याच्या तक्रारी आहेत. शेतीच्या हंगामात शेतकऱ्यांना वेळेत खत मिळणे आवश्यक आहे. मात्र, ऑनलाइन प्रक्रियेतील गुंतागुंतीमुळे त्यांचा वेळ आणि श्रम वाया जात असून मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे एफएफएस ॲपची सक्ती रद्द करून कृषी केंद्रांतून पूर्वीप्रमाणे थेट खत वितरण करावे, अशी मागणी नागपुरे यांनी केली.

**निर्णय घ्या, अन्यथा आंदोलन** शेतकऱ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शुभम नागपुरे यांनी दिला आहे. आता शासन आणि कृषी विभाग यावर काय भूमिका घेतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## दुष्काळाच्या वणव्यात शेतकरी होरपळतोय; पाच हजारांची मदत म्हणजे थट्टाच

### शरद पवारांच्या बैठकीत अमर काळेंनी मांडले वास्तव



**वर्धा/जनमाध्यम**
दुष्काळाचे संकट गडद होत असताना शेतकऱ्यांच्या पदरात पडणारी मदत मात्र तुटपुंजी! पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, कोलमडलेले अर्थचक्र आणि वाढत्या कर्जाचा डोंगर अशा संकटांत सापडलेल्या शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची मदत कितपत पुरेशी ठरणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, २५ ऑक्टोबर रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या खासदारांच्या बैठकीत खासदार अमर काळे यांनी वर्धा लोकसभा मतदारसंघातील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे वास्तव मांडले.

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीने शेतीचे अर्थकारण विस्कटले आहे. पावसाच्या लहरीपणामुळे उत्पादन घटले असून शेतीवरील खर्चाचा भार कायम आहे. अशा वेळी शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी आणि पाच हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचा मुद्दा बैठकीत चर्चेला आला. संकटाच्या तुलनेत मदत पुरेशी आहे का, पात्र शेतकऱ्यांपर्यंत तिचा लाभ पोहोचतो आहे का आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा देण्यासाठी आणखी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, याकडे लक्ष वेधण्यात आले. खासदार काळे यांनी वर्धा मतदारसंघातील पाणीटंचाई, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता आणि शेतकरी व शेतमजुरांच्या समस्यांची वस्तुस्थिती पवार यांच्यासमोर मांडली. दुष्काळाची झळ केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर शेतमजूर, लहान व्यावसायिक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असलेल्या सर्वसामान्य कुटुंबांनाही बसत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. दुष्काळग्रस्तांना केवळ आश्वासनांनी दिलासा मिळणार नाही.

पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय, गरजूंना वेळेत आर्थिक मदत आणि शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रभावी धोरणांची गरज बैठकीत अधोरेखित झाली. वर्ध्यातील प्रश्न राज्यस्तरावर मांडले गेले असले, तरी त्यावर शासनाकडून ठोस निर्णय होतात का आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचते का, यावरच या पाठपुराव्याचे यश ठरणार आहे.

### संविधान ते सत्ताकारण

## लोकशाहीच्या कसोटी काळावर डॉ.विश्वंभर चौधरी मांडणार विचार

### ३१ ऑक्टोबरला आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**
संविधान, लोकशाही आणि सत्ताकारण यांचा परस्परसंबंध उलगडत वर्तमान राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करण्याची संधी वर्धेकरांना मिळणार आहे. प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्टच्या वतीने आयोजित स्मृती व्याख्यानमालेचे एकोणिसावे पुष्प राजकीय विश्लेषक डॉ. विश्वंभर चौधरी गुंफणार आहेत. 'संविधान ते सत्ताकारण - लोकशाहीचा कसोटी काळ' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे.

शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता मगनवाडी येथील स्व. सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालयात हा कार्यक्रम होणार आहे. सेवाग्राम आश्रमाचे सचिव विजय तांबे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

संविधानाने दिलेली लोकशाही मूल्ये, सत्ताकारणातील बदल आणि लोकशाहीसमोरील विविध आव्हाने या विषयांच्या अनुषंगाने या व्याख्यानातून विचारमंथन होण्याची अपेक्षा आहे.

सध्याच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत संविधानाचे महत्त्व, लोकशाही संस्थांची भूमिका तसेच नागरिकांची जबाबदारी यांसारख्या मुद्द्यांकडे या व्याख्यानाच्या माध्यमातून लक्ष वेधले जाणार आहे.

प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती व्याख्यानमाला ही वैचारिक देवाणघेवाण आणि सामाजिक प्रबोधनासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे. या व्याख्यानाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्ट, वर्धा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### दंड वसूली नव्हे, जीव वाचविणे हेच वाहतूक पोलिसांचे लक्ष्य

# 'जीवन सुरक्षा' आणि 'कोंडीमुक्त वर्धा' अभियान राबविणार



**वर्धा/जनमाध्यम**
वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांना शिस्त लावण्यासोबतच नागरिकांचा प्रवास सुरक्षित करण्यावर वाहतूक पोलीस विभागाने भर दिला आहे. दंड वसूल करणे हा उद्देश नसून अपघातांना आळा घालणे, नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे आणि वाहतुकीत शिस्त निर्माण करणे हे प्राधान्य असल्याचे वाहतूक पोलीस विभागाने स्पष्ट केले आहे. यासाठी जिल्ह्यात 'जीवन सुरक्षा अभियान' आणि 'मिशन कोंडीमुक्त वर्धा' प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. लहान मुलांकडून विनापरवाना वाहन चालविण्याचे प्रकार घडत असून, त्यातून अपघातांचा धोका वाढतो. अशा घटनांमुळे मुलांच्या भविष्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देणे टाळण्याची गरज आहे. मुलांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासोबतच रस्त्यावरील इतर नागरिकांच्या जीविताचे रक्षण करणे हा जीवन सुरक्षा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

> **वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन**
> वाहतुकीची कोंडी कमी करणे आणि रस्त्यांवरील प्रवास अधिक सुरक्षित करणे यासाठी 'मिशन कोंडीमुक्त वर्धा' अभियान संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, वाहन चालविताना निष्काळजीपणा टाळावा आणि स्वतःसह इतरांच्या सुरक्षिततेचीही काळजी घ्यावी, असे आवाहन वर्धा जिल्हा वाहतूक पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.वाहतूक नियमांचे पालन हे केवळ दंड टाळण्यासाठी नसून अपघात रोखण्यासाठी आणि अमूल्य जीव वाचविण्यासाठी आवश्यक आहे, असा संदेश या अभियानातून देण्यात येत आहे,
> **विजयकुमार घुले,** सहायक पोलीस निरीक्षक

## वाहून जाणाऱ्या पाण्याला जमिनीचा मार्ग दाखवा

### स्नेहा आकरे यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**वर्धा/जनमाध्यम**
शहरातील भूजल पातळी दिवसेंदिवस खालावत असताना पावसाचे आणि वाहून जाणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत प्रभागातील जुन्या सिमेंट काँक्रीटच्या नाल्यांमधून वाहून जाणारे पाणी जमिनीत जिरविण्यासाठी तांत्रिक उपाययोजना करण्याची मागणी नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती स्नेहा आशिष आकरे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन भूजल पुनर्भरणाच्या अभिनव प्रयोगाची संकल्पना मांडली आहे. वर्धा शहरात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची आवश्यकता आहे. मात्र, प्रभागातील जुन्या मोठ्या नाल्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण झाल्यामुळे पाणी वाहून पुढे जाते. या पाण्याचा जमिनीतील जलसाठा वाढविण्यासाठी उपयोग करता येईल का, हा प्रश्न नगरसेविका आकरे यांनी उपस्थित केला आहे. नाल्याच्या तळाशी ठरावीक अंतरावर ड्रिलिंग करून किंवा अभियंत्यांच्या सल्ल्याने योग्य रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभारण्याची शक्यता तपासावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यासाठी साधारण दहा इंच ते एक फूट खोलीपर्यंत तांत्रिक पद्धतीने काम करता येईल का, याची पाहणी करण्याची सूचना त्यांनी केली आहे.

**आज उपाययोजना नाही तर उद्या जलसंकट अटळ**

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजनांची धावपळ करण्यापेक्षा आतापासूनच जलसंधारणाची कामे हाती घेण्याची गरज आहे. नाल्यांमधून वाहून जाणाऱ्या पाण्याचा योग्य विनियोग केल्यास भूजल पुनर्भरणाला हातभार लागू शकतो. त्यामुळे नगर परिषदेच्या तांत्रिक विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून या संकल्पनेची व्यवहार्यता तपासावी आणि आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी स्नेहा आकरे यांनी केली आहे.

निवेदनाची प्रत नगर परिषद अध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ यांनाही देण्यात आली आहे. शहराच्या भविष्यातील पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी प्रशासन या संकल्पनेकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहते आणि प्रत्यक्षात कोणती पावले उचलते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# ४५ दिवस पावसाचा थेंब नाही; कपाशी वाळली, बळीराजा संकटात

## शेतकऱ्यांचा उत्पादनाचा आशावाद मावळला, तातडीच्या आर्थिक मदतीची मागणी



**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**
निसर्गाच्या लहरीपणाचा फटका पुन्हा एकदा बळीराजाच्या स्वप्नांना बसत आहे. सिंदी शहरासह परिसरातील गावांमध्ये तब्बल ४० ते ४५ दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील उभी कपाशी वाळू लागली आहे. मोठ्या आशेने आणि कर्जाचा भार डोक्यावर घेऊन पेरणी केलेल्या शेतकऱ्यांसमोर आता वर्षभराचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. डोळ्यांदेखत पीक करपताना पाहण्याची वेळ आल्याने शेतकरी हवालदिल झाले असून, शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी होत आहे.

यंदाच्या खरीप हंगामात चांगल्या उत्पादनाच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली. पेरणीपासून पिकाच्या संगोपनापर्यंत बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र, ऐन पीक वाढीच्या आणि उत्पादनाच्या आशेच्या काळात पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने शेतातील ओलावा कमी झाला आहे. परिणामी कपाशीच्या झाडांची वाढ खुंटली असून, अनेक ठिकाणी झाडे वाळण्याची स्थिती निर्माण झाली आहे.आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडत आहे.

**कर्ज फेडायचे कसे, संसार चालवायचा कसा**

शेतीच्या हंगामासाठी घेतलेले कर्ज, पिकांच्या संगोपनासाठी केलेला खर्च आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. पीक हातचे गेल्यास कर्जाची परतफेड कशी करायची, पुढील हंगामासाठी भांडवल कुठून आणायचे आणि कुटुंबाचा खर्च कसा भागवायचा, या प्रश्नांनी शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे कपाशी उत्पादकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने तातडीने परिस्थितीची दखल घेणे गरजेचे आहे.

**तातडीने पंचनामे करून मदत द्या**

सिंदी शहर व परिसरातील शेतकऱ्यांच्या व्यथा लक्षात घेऊन कृषी आणि महसूल विभागाने संयुक्तपणे शेतांची पाहणी करावी. पावसाच्या दीर्घ खंडामुळे झालेल्या पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून पंचनामे करावेत. तसेच पीकविमा संरक्षण, नुकसानभरपाई आणि शासनाच्या लागू असलेल्या मदत योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत तातडीने पोहोचवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आश्वासनांवर अवलंबून राहावे, अशी परिस्थिती राहू नये. प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करणे, पात्र शेतकऱ्यांना मदत मिळवून देणे आणि संकटाच्या काळात त्यांना आर्थिक आधार देणे, हीच आता प्रशासनाची प्राथमिकता ठरायला हवी.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३२९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ‘मत वाचवा - देश वाचवा’ अभियानासाठी काँग्रेसची जिल्हास्तरीय बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ‘मत वाचवा – देश वाचवा’ अभियानांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या चावडी सभांच्या नियोजनासाठी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण) ची कार्यकारिणी बैठक काँग्रेस भवन येथे पार पडली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक शाकीर सनदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील प्रत्येक गावात मतदार यादी पडताळणी मोहीम राबविणे आणि चावडी सभांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबाबत चर्चा करण्यात आली.या बैठकीला जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, खासदार बळवंत वानखडे,यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.काँग्रेसच्या नियोजनानुसार २५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीत ‘मत वाचवा – देश वाचवा’ अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्हा मुख्यालयी पत्रकार परिषदा घेऊन अभियानाची भूमिका जनतेसमोर मांडली जाणार आहे. त्यानंतर जिल्ह्यातील सर्व ब्लॉक



अध्यक्ष, वरिष्ठ नेते आणि बूथस्तरीय प्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन पुढील कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे.

अभियानांतर्गत प्रत्येक मतदान केंद्रावर बूथ लेव्हल एजंट (बीएलए) आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मतदार याद्यांची पडताळणी केली जाणार आहे. मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे तसेच यादीतील संभाव्य अनियमितता शोधून त्याची नोंद घेण्यावर भर दिला जाणार आहे. वगळण्यात आलेल्या नावांची यादी संबंधित बीएलएकडून ब्लॉक काँग्रेस कमिटी कार्यालयात सादर केली जाणार आहे.यानंतर जिल्ह्यातील गावोगावी चावडी सभांचे आयोजन करण्यात येणार असून, या सभांमध्ये मतदार यादीतील नावे, मतदानाचा अधिकार आणि मतदार यादीच्या पडताळणीचे महत्त्व याबाबत नागरिकांना माहिती दिली जाणार आहे. गावातील ज्येष्ठ नागरिक, ग्रामपंचायत प्रतिनिधी, माजी सदस्य तसेच स्थानिक नागरिकांना या सभांमध्ये सहभागी करून घेण्याचे नियोजन आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२६ मधील प्रौढ मताधिकारासंबंधीच्या तरतुदींची माहिती देऊन जनजागृती केली जाणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून मतदारांचा मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवणे आणि मतदार यादीतील त्रुटींबाबत नागरिकांना जागरूक करणे, हा काँग्रेसचा उद्देश असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये चावडी सभा प्रभावीपणे पार पाडण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.बैठकीला राजकुमार पटेल, दिलीप एडतकर,हरिभाऊ मोहोड,रामेश्वर अभ्यंकर,प्रकाश काळबांडे,मुकद्दर खा पठाण,प्रदीपभाऊ देशमुख , शैलेश गवई,संजय वानखडे,कांचनमाला गावंडे , राहुल येवले, प्रवीण मनोहर, भागवत खांडे, अरविंद लंगोटे,समीर पाटील, प्रदीप देशमुख,सुनील गावंडे, रोहित पटेल,श्रीकांत झोडपे, प्रमोद दाळू, सुभाष गीते, बिट्टू मंगरोळे, संजय बेलोकर, अमोल देशमुख,शंतनू सोलव, बाबाराव बहुरूपी, राजिक भाई, विपुल भडांगे,किशोर देशमुख, बाबूभाई इनामदार,भूषण कोकाटे, नईम भाई, सेतू देशमुख,विश्वजित बाखडे, सहदेव बेलकर,रामगोपाल मावसकर, राजाभाऊ उल्हे, गजानन टापरे,सतीश हाडोळे, प्रवीण मनोहर, मनीष कुबडे, राजाभाऊ बंड, डॉ. रवींद्र वाघमारे, किशोर कितुकले, आदींची उपस्थिती होती.

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **661/22/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर वेलफेअर असोसिएशन मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती एफ- ३००८३**
बाबत अर्जदार - **श्री बाबाराव विठ्ठलराव ब्राम्हणे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजा- पेठ मागरुळी, ग्रा.पं.पेठ मागरुळी, मौजा नं.२११, पं.स. वरुड, जि.प. अमरावती ग्रा.पं.चे हददीतील प्रगणे व नो.पो.तु. व ता.वरुड, जि.अमरावती येथील वार्ड क्र.२ मधील मालमत्ता क्रमांक १३९ चे घरावर इमला लाकुड फाटयाचा असून वर छप्पर कवेलुचे असलेले पडके घर सभोवतालच्या भिंती पुर्ण मालकी हक्कासह, संडास बाथरुम, इलेक्ट्रीक कनेक्शन व नळ कनेक्शन

याचे मोजमाप :- एकूण चौरस फुट १६६०.३० (१५५.०० चौ.मीटर)
यात कच्चे बांधकाम चौरस फुट ४७२.३०, (४४.०० चौ.मीटर) वर आहे.

**याची चर्तुःसिमा पुढीलप्रमाणे -**
पुर्वेस - खाली जागा पश्चिमेस - रामदास कासुर्दे यांचे घर
उत्तरेस- रोड दक्षिणेस- खाली जागा

**एकुण बाजारभाव मुल्य रु.२,९३,९३४/- (अक्षरी दोन लाख त्र्यानव्व हजार नउशे चौतीस रुपये )**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २६.१०.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**सही/-**
**अधीक्षक, (न्याय शाखा )**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९९४/२०२६
Smt.Kusum Namdeorao Suryavanshi+4 **-वि- निरंक**
पुढील ता.०५.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kusum Namdeorao Suryavanshi, Age 70 Yrs. Occu.: Nil
R/o Near Adivashi Vastigruha Mahadev Nagar, Amravati.
2. Rajendra Namdeorao Suryavanshi, Age 53 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o Near Mahadev Mandir, Chhangani Nagar, Amravati.
3. Surendra Namdeorao Suryavanshi, Age 50 Yrs. Occu.: Labour
4. Satyendra Namdeorao Suryavanshi (Through Lrs)
4.a) Smt.Yogita Satyendra Suryavanshi, Age 41 Yrs. Occu.: Household
4.b) Harshawardhan Satyendra Suryavanshi, Age 17 Yrs. Occu.:Educa.
4.c) Kartik Satyendra Suryavanshi, Age 12 Yrs. Occu.: Education
5. Mahendra Namdeorao Suryavanshi, Age 44 Yrs. Occu.: Pvt.Job.
R/o Near Adivashi Vastigruha Mahadev Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Namdeorao Bhagvantrao Suryavanshi हे दिनांक 19.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Kusum Namdeorao Suryavanshi+4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Kusum Namdeorao Suryavanshi+4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१७६/२०२६
Lakhan Shyam Tambole+1 **-वि- निरंक**
पुढील ता.३०.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Lakhan Shyam Tambole, Age 38 Yrs. Occu.: Labour
R/o Siddhath Nagar, Patur Tq.Patur Dist.Akola
2. Priti Vinod Sangat, Age 36 Yrs. Occu.: Household
R/o Walmik Nagar, Washim, Tq.& Dist.Washim

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shiva Shyam Tambole हे दिनांक 05.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Lakhan Shyam Tambole+1 --Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Lakhan Shyam Tambole+1 --Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **केशवराव जगतराव पातुरकर व इतर ३** ,पत्ता- रायपुरा, अचलपूर यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२८ संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/2002** जुना मालमत्ता क्र. **28000781 नझुल शिट क्र.५-बी प्लॉट नं.४०** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **जगतराव गणपतराव पातुरकर** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **केशवराव जगतराव पातुरकर इतर ३** नावाने (फेरफार घेण्याकरिता /नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरिता, खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२६.१०.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - सरकारी रोड
**पश्चिमेस** - रोड
**दक्षिणेस** - मेन रोड
**उत्तरेस** - पातुरकर यांचे घर

शिक्का
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२१८३/२०२६**
**विजय + २ वि.निरंक**
**पुढील ता.२३.११.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Vijay Bapurao Madavi,** Aged 66 yrs. Occ.- Retired
R/o. In front of Savitri Phulde Vidyalaya, Behind Chaitnya Colony, Mankarna Nagar, Rukhmini Nagar, Amravati
2. **Punam Vijayrao Madavi,** Age 40 yrs. Occ.- Service
R/o. Chaitnya Colony, Mankarna Nagar, Rukhmini Nagar, Amravati
3. **Bhavana Vijay Madavi,** Age 35 yrs. Occ.- Household
R/o. In front of Savitri Phulde Vidyalaya, Behind Chaitnya Colony, Mankarna Nagar, Rukhmini Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Jyoti Vijay Madavi** या दिनांक **०९.०८.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार **Vijay Bapurao Madavi + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Vijay Bapurao Madavi + 2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१९.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८६९/२०२६
Vaibhav Ajabrao Chaple+1 **-वि- निरंक**
पुढील ता.२१.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vaibhav Ajabrao Chaple, Age 43 Yrs. Occu.: Service
R/o Flat No.903, Wing-A Renuka Residency Katraj Kondhava Road, Near Petrol Katraj Pune, City Pune
2. Kshitija Ajabrao Chaple, Age 40 Yrs. Occu.: Household
R/o Jail Road Amravati Camp, Tq.Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Pratibha Ajabrao Chaple हे दिनांक 12.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Vaibhav Ajabrao Chaple +1 --Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vaibhav Ajabrao Chaple +1 --Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०९.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०५७/२०२६
Vijaya Shrirang Pathak **-वि- निरंक**
पुढील ता.१९.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vijaya Shrirang Pathak
Age 63 Yrs. Occu.: Household
R/o Cancer Hospital, Sai Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ashabai Prakash Joshi हे दिनांक 20.01.2019 रोजी **नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार Vijaya Shrirang Pathak --Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vijaya Shrirang Pathak --Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना जाहीर नोटीस देतो ते येणेप्रमाणे :-

माझे पक्षकार नामे **अजितसिंग बिशनसिंग शेरे, रा.कोटा, राजस्थान** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन त्यांच्यातर्फे मी ॲड.श्रीकांत अ.पांडे जाहीर नोटीस देतो की,

माझ्या पक्षकारांनी वि.दिवाणी न्यायालय (क.स्तर), नांदगाव खंडेश्वर येथे त्यांचे भाऊ आनंदसिंग बिशनसिंग शेरे व आणखी ३ व्यक्तीविरुध्द नियमित दिवाणी दावा क्र.३३/२०२६ दाखल केलेला असून विद्यमान न्यायालयाने वरील नमुद दाव्यात यथास्थिती आदेश/जैसे थे स्थितीचा आदेश ("Status quo order") दिलेला आहे. त्यामुळे वरील नमुद दाव्यातील दावा मिळकत/मालमत्ता मौजा- माहुली चोर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.९४/२, जिचे क्षेत्रफळ ४ हेक्टर ८६ आर आहे. या शेत जमिनीसंबंधी कोणीही खरेदी- विक्रीचा व्यवहार करु नये. हस्तांतरित करु नये, गहाण- बोझा ठेवू नये, कोणत्याही प्रकारे हितसंबंध निर्माण करु नये व विल्हेवाट करु नये.

करिता जाहीर नोटीस /सुचना देत आहे.

**ठिकाण - अमरावती**
**दिनांक - २६/१०/२०२६**

**ॲडव्होकेट**
**श्रीकांत अनिलराव पांडे**

---

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी**

**मि.अ.क्र.३६९/२०२६** **ने.ता. २५/११/२०२६**

**अर्जदार-** **नदिम अहेमद मोबीन अहेमद, वय ४७ वर्ष, धंदा- शेती**
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती,
ह.मु. जूबी जोहान हाऊस, बिलाल नगर
ओल्ड टाऊन बडनेरा, ता.जि.अमरावती

**.. विरुध्द ..**

**जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,**
**ग्रामपंचायत कार्यालय,अंबाडा,ता.मोर्शी,जि.अमरावती**

सर्व लोकांस नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नामे **नदिम अहेमद मोबीन अहेमद** याचा **जन्म दिनांक २५/१०/१९७९** रोजी **अंबाडा, ता.मोर्शी, जि. अमरावती** येथे झालेला आहे. अर्जदाराला विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामाकरिता जन्माचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

अर्जदाराचे जन्माचे प्रमाणपत्र मिळण्यास वि.प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, मोर्शी येथे अर्ज केला असुन अर्जावर कोणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून १ महिन्याचे आत वि.कोर्टात आपले म्हणणे सादर करावे अन्यथा तुमचे गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निर्णय दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक - २३/१०/२०२६**

शिक्का
**आदेशानुसार**
सही/-
(**सहाय्यक अधिक्षक**)
प्रथम श्रेणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६६०/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार -
**१. श्रीमती यमुना देवरावजी फंदे, वय ८२ वर्षे, धंदा - घरकाम**
**२. श्री.दत्तू देवराव फंदे, वय ६१ वर्षे, धंदा - शेती**
**३. श्री.ओंकार देवरावजी फंदे, वय ५९ वर्षे, धंदा - व्यवसाय**
**४. श्री.ज्ञानेश्वर देवरावजी फंदे, वय ५३ वर्षे, धंदा - व्यवसाय**
**५. श्री.ईश्वरदास देवरावजी फंदे, वय ४६ वर्षे, धंदा - शेती**
**सर्व रा.पेठपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

**वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत** सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ **प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ चे वडील** नामे देवराव आत्मारामजी फंदे **हे दि.**२५.११.२०२५ **रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक २६.१०.२०२६**

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**जाहीर नोटीस**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०७)**

किरकोळ कि. अर्ज क्र.११५६/२०२६

**अर्जदार : सय्यद मुजफ्फर सैयद खुबनमियॉ**
**वय ७० वर्षे, रा.जहांगीरपुरा, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : ग्रामविकास अधिकारी/निबंधक जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
**ग्रामपंचायत, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती**

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०७ मध्ये जन्माची नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३-अ) प्रमाणे यातील अर्जदार स्वतः अर्ज दाखल करतो की, त्याने जन्म नोंद दिनांक १७.०४.१९५६ रोजी झाली आहे. अशी नोंद धरणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, अमरावती येथे हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
स्वा/-
०७ वे सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर) अमरावती

---

## -जाहीर नोटीस-

**सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी,चांदूर बाजार**

**कि.फौ.अर्ज क्र.३७४/२०२६** **ने.ता.२५/११/२०२६**

**- अर्जदार-** **सिदृधेश्वर वासुदेवराव घुलक्षे**
वय ५८ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.सर्फापुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

....वि.....

**-गैरअर्जदार-** **ग्रामपंचायत कार्यालय, कल्होडी,**
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

ज्या अर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी त्यांची मुलगी **वैष्णवी सिदृधेश्वर** हिचा दिनांक १९.१२.२०१० रोजी कल्होडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. गैरअर्जदारा विरुध्द जन्म- मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने नेमलेल्या वकीलासह सह दिवाणी व फौजदारी न्यायालय क्र.२ चांदूर बाजार येथे हजर राहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.२६/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यांनी दिले.

दिनांक - २६/१०/२०२६

शिक्का
**आदेशानुसार**
**सही/-**
**क.लिपिक**
**सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)**
**चांदूर बाजार**

---

## जाहीर सुचना

आम जनतेस या जाहीर सुचनेव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्रीकांत प्रभाकरराव भोगे, रा.पुसदा, ता.जि.अमरावती** येथील नझुल शीट नं.३ मधील नझुल प्लॉट नं.१९६, क्षेत्रफळ ९१.१ चौ.मी.(९८० चौ.फुट) ही मालमत्ता आहे. यासंबंधीत असलेले जूने खरेदीखत जे मुकुंद भगवंतराव गिरपुंजे यांनी नानीबाई लक्ष्मणराव नवखरे व इतर २ यांच्याकडून दस्त क्र.३९९/२०१३ दि.१९/०१/२०१३ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती ग्रामीण मध्ये नोंदलेले मुळ खरेदीखत माझे पक्षकाराजवळून हरवले आहे. त्यासंबंधी रितसर तक्रार सुध्दा माझे पक्षकार यांनी पोलिस स्टेशन वलगांव येथे दिलेली आहे. तरी ज्या कुणाला सदर खरेदीखत सापडले असेल त्यांनी मला खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर किंवा पत्यावर संपर्क साधावा.

**कार्यालय - ''श्री.'' भागवत नगर, यशवंत लॉनच्या मागे,**
**साईनगर, अमरावती , मो.क्र.- ९६६५७८६६७६**

**अमरावती.**
**दिनांक २६/१०/२०२६**

**स्वाक्षरी/-**
**ॲडव्होकट पंकज एन.ठाकरे**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६६०/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.धनराज रामकृष्ण पोहरकर, वय ५० वर्षे, धंदा - शेती
२. श्री.श्रीकृष्ण रामकृष्ण पोहरकर, वय ४५ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे रामकृष्ण सदुजी पोहरकर** हे दि.**१५.१०.२०२०** रोजी **अंबाडा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**जाहीर नोटीस**
**वि.श्री.ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०७)**

किरकोळ कि. अर्ज क्र.११५७/२०२६

**अर्जदार : मुश्ताक अहमद खूबन मियॉं**
**वय ६१ वर्षे, रा.वलगांव रोड, पॅराडाईज कॉलनी, व्हीएमव्ही रोड, अमरावती, ता.जि.अमरावती**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : ग्रामविकास अधिकारी/निबंधक जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
**ग्रामपंचायत, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती**

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३-अ) प्रमाणे यातील अर्जदार **मुश्ताक अहमद खूबन मियॉं** यांनी त्यांच्या जन्माची नोंद दिनांक ०१.०७.१९६५ रोजी झाली आहे. अशी नोंद करणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, अमरावती येथे हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
आदेशानुसार
(क.लिपीक)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ५२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बडनेऱ्यात सनी सायकल स्टोअरला भीषण आग, दीड कोटीचे नुकसान

## पहाटे लागलेल्या आगीने सकाळी घेतले रौद्ररूप; अग्निशमन गाडीत पाणी नसल्याने नागरिकांचा संताप





**बडनेरा/वार्ताहर**
शहरातील गजबजलेल्या जय हिंद चौक परिसरातील सनी सायकल स्टोअरला सोमवारी भीषण आग लागल्याने व्यापारी क्षेत्रात एकच खळबळ उडाली. या आगीत अंदाजे दीड कोटी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पहाटे सुमारे ५.३० वाजता आग लागल्याचा प्राथमिक अंदाज असून, शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. सकाळी ८ वाजताच्या सुमारास आगीने जोर पकडल्याने परिसरात धुराचे लोट आणि आगीच्या उंच ज्वाळा दिसू लागल्या.

**काळी आगीने घेतले रौद्ररूप**

सकाळी दुकान बंद असताना त्यातून धूर बाहेर पडत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. दुकानाचे संचालक सुनील वरलानी यांना घटनेची माहिती देण्यात आली. काही वेळातच धुराचे रूपांतर मोठ्या ज्वाळांमध्ये झाले. दुकान असलेली इमारत आगीच्या विळख्यात सापडल्याने नागरिकांची धावपळ उडाली. हा परिसर शहरातील प्रमुख व्यापारी भागांपैकी एक असल्याने आग शेजारील दुकानांपर्यंत पोहोचण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

**अग्निशमन गाडीत पाणी नसल्याने नागरिकांचा संताप**

आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. मात्र, सुरुवातीला आलेल्या गाडीत पाणी नसल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आग भीषण स्वरूप धारण करत असताना अग्निशमन गाडीत पाणी उपलब्ध नसल्याच्या प्रकारामुळे घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

त्यानंतर आग विझविण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. दुकानाच्या मागील बाजूने पाण्याचा मारा करण्यात आला. आग आटोक्यात आणण्यासाठी जवळपास १४ ते १५ अग्निशमन गाड्यांची मदत घेण्यात आल्याची माहिती आहे. यामध्ये एमआयडीसीच्या अग्निशमन दलाच्या एका गाडीचाही समावेश होता. आगीची तीव्रता आणि परिसरातील अरुंद जागेमुळे अग्निशमन दलाला काम करताना अडचणींचा सामना करावा लागला.

**दीड कोटींच्या नुकसानीची शक्यता**

सनी सायकल स्टोअरमधील माल आणि साहित्याचे आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची शक्यता आहे. प्राथमिक अंदाजानुसार, या आगीत सुमारे दीड कोटी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, नुकसानीचा अंतिम आकडा अधिकृतरीत्या स्पष्ट झालेला नाही. दुकानातील जळालेल्या साहित्याची पाहणी, पंचनामा आणि संबंधित तपासानंतरच नुकसानीचे नेमके स्वरूप समोर येईल.

आगीची माहिती मिळताच अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक सर्वप्रथम घटनास्थळी दाखल झाल्या.त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे,उपायुक्त योगेश पेठे,झोन अधिकारी पुसदकर आणि झोन अधिकारी धनंजय शिंदे यांनी घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीची माहिती घेतली. अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर आणि गटनेते चेतन गावंडे यांनीही घटनास्थळी भेट दिली. यावेळी स्थानिक नगरसेवक तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

घटनास्थळी बडनेरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.आगीचे वृत्त समजताच नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. त्यामुळे परिसरात गर्दी नियंत्रित ठेवणे आणि अग्निशमन दलाला काम करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरले.सुरुवातीला घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन गाडीत पाणी नसल्याचा नागरिकांनी केलेला आरोप गंभीर मानला जात आहे.

आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन गाड्यांमध्ये पुरेसा पाणीसाठा आणि आवश्यक साधनसामग्री उपलब्ध असणे अपेक्षित असते. त्यामुळे या प्रकरणात नेमकी परिस्थिती काय होती,याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे.दरम्यान,आग शॉर्टसर्किटमुळे लागली का, नुकसानीचा अंतिम आकडा किती आहे आणि अग्निशमन दलाच्या पहिल्या गाडीतील पाण्याबाबत नेमकी परिस्थिती काय होती,याबाबत अधिकृत पुष्टी होणे बाकी आहे.

---

## संक्षिप्त



### मातंग समाज संघर्ष क्रांती संघटनेचे नगरपंचायतला निवेदन

**तिवसा-**तालुक्यातील मातंग समाज सामाजिक कार्यासाठी वाचनालय,समाजाचे छोटे-मोठे कार्यक्रम घेण्यासाठी जागा उपलब्ध नाही,म्हणून तिवसा येथे मातंग समाजाला समाज भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी तिवसा मातंग समाज संघर्ष क्रांती संघटनेच्या वतीने मुख्यधिकारी शिवदासजी मुसळे नगरपंचायत यांना निवेदनातुन करण्यात आली.तिवसा येथे बहुसंख्य मातंग समाज बांधव असून आतापर्यंत शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे मातंग समाज न्यायापासून वंचित राहिला आहे.तरी तिवसा येथे मातंग समाजासाठी समाज भवनासाठी शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी अशी मातंग समाज संघर्ष संघटनेची मागणी आहे.निवेदन देतेवेळी किरण खंडारे अध्यक्ष मातंग समाज संघर्ष संघटना सचिव प्रशांत प्रधान,सागर डोंगरदिवे, विठ्ठल वाघमारे,सिद्धार्थ शिंदे,अमुतराव खडसे,शुभम आसोले, विनोद खडसे,राजु जोंधळे,सुधाकर गायकवाड, वासुदेव गवळी, प्रशांत वानखेडे, हरि गायकवाड, उत्कर्ष खडसे,बबन गायकवाड, अवधूत ठुनकले, निलेश खंडारे उपस्थित होते.

### स्केटिंग स्पर्धेत श्रेयश बिसनेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**शिराळा-**क्रीडा क्षेत्रात आपल्या कौशल्याच्या जोरावर लहान



वयातच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या श्रेयश शैलेश बिसने या विद्यार्थ्याने स्केटिंग स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या श्रेयशची त्याच्या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर शालेय राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे शाळा, कुटुंबीय, प्रशिक्षक आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.लहानपणापासूनच स्केटिंगची आवड असलेल्या श्रेयशने नियमित सराव, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले. या सर्व बाबींमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी श्रेयशने कठोर परिश्रम घेतले. त्याच्या मेहनतीला आता राज्यस्तरीय स्पर्धेच्या निवडीच्या रूपाने महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. श्रेयशच्या या यशामागे त्याचे मुख्य प्रशिक्षक अनुज परतानी आणि सह-प्रशिक्षक मयूर चौधरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कोणत्याही खेळाडूच्या यशामागे त्याच्या कुटुंबाचा मोठा वाटा असतो. श्रेयशच्या या यशामागे त्याचे आई-वडील शैलेश बिसने व बिसने यांचे प्रोत्साहन, सहकार्य आणि सातत्यपूर्ण पाठबळ महत्त्वाचे ठरले आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी त्यांनी श्रेयशला प्रोत्साहित केले. श्रेयश बिसनेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे प्रशिक्षक, आई-वडील, शिक्षक, शाळा आणि क्रीडाप्रेमींकडून अभिनंदन होत असून, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### विद्यापीठात महर्षि वाल्मिकी यांची जयंती साजरी

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महर्षि वाल्मिकी यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्रा.डॉ. व्ही.के. नागले, उपकुलसचिव मंगेश वरखेडे,उपकुलसचिव मंगेश जायले, उपकुलसचिव विक्रांत मालवीय, उपकुलसचिव ऋतुराज दशमुखे, सहा. कुलसचिव तथा प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. संचालन व महर्षि वाल्मिकी यांच्याबद्दल माहिती प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.

---

# दिवाळी सुट्टीतील शिक्षक प्रशिक्षण रद्द करण्यासाठी शिक्षणमंत्र्यांचे निर्देश

## प्राथमिक शिक्षक समितीच्या मागणीची दखल

**अमरावती/का.प्र.**
दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत आयोजित करण्यात आलेली शिक्षकांची सर्व प्रशिक्षणे रद्द करावीत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने करण्यात आली. या मागणीची राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांनी तात्काळ दखल घेत राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंग यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच यासंदर्भातील अहवाल सादर करण्यासही सांगितले.

उन्हाळी सुट्टीच्या काळात जनगणना आणि एसआयआरसारख्या कामांमुळे शिक्षकांना पुरेशी विश्रांती घेता आलेली नाही. त्यातच दिवाळीच्या सुट्टीत निवडश्रेणी, वरिष्ठ श्रेणी तसेच अन्य प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले आहे. इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना ३० दिवसांची अर्जित रजा मिळत नसताना, त्यांच्या दीर्घ सुट्ट्यांमध्येही विविध शासकीय कामे आणि प्रशिक्षणांची जबाबदारी सोपविली जाते. त्यामुळे शिक्षकांना सुट्टीचा लाभ मिळत नसल्याची बाब शिक्षक समितीने निदर्शनास आणून दिली.दिवाळी सुट्टीतील सर्व प्रशिक्षण रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने यापूर्वीच केली होती. मात्र, याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नव्हती.या पार्श्वभूमीवर मालेगाव येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या नाशिक जिल्हा शाखेचे अध्यक्ष जिभाऊ बच्छाव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांची भेट घेतली. यावेळी प्रमोद बच्छाव, हेमंत पवार, संदीप दुकळे आणि सुधाकर पवार उपस्थित होते. शिष्टमंडळाने दिवाळी सुट्टीच्या कालावधीतील सर्व प्रशिक्षण रद्द करण्याची मागणी मंत्रिमहोदयांकडे केली.मंत्री दादाजी भुसे यांनी या मागणीची तातडीने दखल घेत शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंग यांच्याशी संपर्क साधला.मंत्रिमहोदयांच्या निर्देशांनुसार संबंधित यंत्रणेकडून आवश्यक कार्यवाही होऊन दिवाळी सुट्टीतील प्रशिक्षण रद्द केले जाईल, अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने व्यक्त केली आहे.

# अनुदान खर्चाची प्रक्रिया सुलभ करण्याची शिक्षक समितीची मागणी

**अमरावती-**जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना मिळणाऱ्या विविध अनुदानांच्या खर्चासाठी लागू करण्यात आलेल्या एसएनए स्पर्श प्रणालीमुळे मुख्याध्यापकांना अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत आहे. ऑनलाइन प्रक्रियेतील किचकटपणा, संथ सर्व्हर आणि ओटीपीसाठी मिळणारा अल्प कालावधी यामुळे मुख्याध्यापकांचा अध्यापन व शालेय कामकाजाचा वेळ खर्च होत आहे. या अडचणी दूर करून अनुदान खर्चाची प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना दरवर्षी शाळा अनुदान, विविध बांधकामांचे अनुदान, शालेय गणवेश अनुदान तसेच बूट व सॉक्स यांसह विविध प्रकारची अनुदाने मिळतात. यापूर्वी ही अनुदाने पंचायत समिती स्तरावरून खर्च करण्यात येत होती.

प्रणाली अधिक सुलभ करणे, सर्व्हरचा वेग वाढविणे, तांत्रिक अडचणी दूर करणे, ओटीपीची मुदत वाढविणे आणि अनुदान खर्चासाठी दिलेला कालावधी वाढविणे या उपाययोजनांवर विचार करण्याची आवश्यकता असल्याचे शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# २८ ऑक्टोबरला महाराष्ट्र मंदिर महासंघातर्फे मंदिर विश्वस्त मेळावा

## मंदिर सुरक्षा कायदा आणि व्यवस्थापनावर होणार विचारमंथन

**अमरावती/का.प्र.**
मंदिर संस्कृतीचे रक्षण, देवस्थानांचे सुयोग्य व्यवस्थापन आणि मंदिरांच्या जमिनींचे हक्क अबाधित राखण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी अमरावती येथे ‘मंदिर विश्वस्त मेळाव्या’चे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात देवस्थान जमिनींचे प्रश्न, बळकावलेल्या जमिनी पुन्हा मंदिरांच्या ताब्यात मिळविण्यासाठी उपाययोजना, मंदिर सुरक्षा कायदा आणि मंदिर व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. हा मेळावा दुपारी २ वाजता श्री नागेश्वर मंदिर हॉल, कोल्हटकर कॉलनी, गणेश कॉलनी, शिलांगण रोड, अमरावती येथे होणार आहे.महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या स्थापनेपासून राज्यभरातील मंदिरांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अमरावती येथे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात देवस्थान जमिनी, नुकसानभरपाई आणि ‘फार्मर आयडी’संदर्भातील अडचणी, बळकावलेल्या देवस्थान जमिनी पुन्हा मंदिरांच्या ताब्यात मिळविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, मंदिर व्यवस्थापनातील स्थानिक समस्या, तीर्थक्षेत्र विकास निधी मिळविताना येणाऱ्या अडचणी तसेच मंदिर-देवस्थान सुरक्षा कायद्याची सद्यस्थिती या विषयांवर विचारमंथन होणार आहे. हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड समन्वयक तथा महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट हे मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.या मेळाव्यास अमरावती शहर व जिल्ह्यातील सर्व मठ-मंदिरांचे विश्वस्त, पुजारी तसेच धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कराटेपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेत दमदार कामगिरी

**अंजनगाव बारी-**महाराष्ट्र हौशी कराटे संघटनेच्या वतीने तसेच एनकेएफ कराटे डो फेडरेशन ऑफ इंडियाच्या सहकार्याने अकोला येथे दि. २४ व २५ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित सातव्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप २०२६-२७ मध्ये अंजनगाव बारी येथील कराटेपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत खेळाडूंनी ६ सुवर्ण, ६ रौप्य आणि ६ कांस्य अशी एकूण १८ पदके पटकावून यश संपादन केले. स्पर्धेत काटा व कुमिते या वैयक्तिक प्रकारांत विविध वयोगटांतील मुले-मुलींनी सहभाग घेतला. सुवर्णपदक विजेते : मयंक खडसे, चंचल ठाकरे, तन्वी ठाकरे, सृष्टी वासुले, दिगांशु ढोकणे आणि कृष्णा गुर्जर. रौप्यपदक विजेते : भावेश वाघाये, चित्रा वाघाये, नयना शेलोकर, रुद्र वासुले, जानवी गुर्जर आणि देवयानी खडसे.कांस्यपदक विजेते : हिमांशू खाडे, अर्जुन पुनिया, प्रगती महेशकर, कृष्ण पुनिया, तन्वी भूरे आणि रिया झोमाडे.या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक किशोर ठाकरे,तेजस्विनी



ठाकरे आणि ललिता ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अंजनगाव बारीचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल केले. त्यांच्या या यशाबद्दल प्रशिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# क्रॉस कंट्री (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचे संघ घोषित

**अमरावती/का.प्र.**
मंगलोर युनिर्व्हसिटी, मंगलगंगोत्री, मंगळुरू (कर्नाटक) येथे ०७ नोव्हेंबर, २०२६ रोजी होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे संघ घोषित करण्यात आले आहेत.

पुरूष संघ - चमूमध्ये डॉ. शामाप्रसाद मुखर्जी महाविद्यालय, शेंदुरजनाघाटचा पियुष मसने व प्रज्वल हरले, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोलाचा नितिन हिवराळे, करण चव्हाण व ओम वाडेकर, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराचा ओम पिंगळे व देवदास संके, जय बजरंग कला महाविद्यालय, चन्नीचा कृष्णकांत राखोंडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा पुशू सी. आणि स्व. एन.ए. देशमुख महाविद्यालय, चांदुरबाजारचा अजय कुरवाळे याचा समावेश आहे. महिला संघ - चमूमध्ये बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराची वैष्णवी वानखडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची मेबरिशा लिंग्डोह व स्मिता गवई, बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडाची पायल नागे,स्वाती पळसकर व वैदवी सीडाम,श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय,अमरावतीची निर्मला चिमोटे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय,अमरावतीची सलोनी खंडारे, कला व व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकळची पुर्वा पळसकर आणि स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय,नांदगांव पेठची रेश्मा गजभिये हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे दि. २६ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर, दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# पावसाअभावी उत्पादनात घट व शेतीखर्चात वाढ,शेतकरी अडकला दुहेरी आर्थिक संकटात

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**
निसर्गाची अवकृपा कमी पाऊस आणि शेतीच्या वाढता खर्च यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला.या वर्षाच्या हंगामात पावसाने साथ दिली नाही,त्याचा फटका सोयाबीन,कापूस,तुर या प्रमुख पिकाला बसला.

पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिकाची वाढ खुंटली परिणामी सोयाबीनला शेंगाची संख्या कमी असून दाणे सुद्धा पूर्ण परिपक्व झाले नसल्याने अनेक शेतकऱ्याला सोयाबीन काढणीचा खर्च सुद्धा डोईजळ झाला.कमी पावसाचा शेतकऱ्याच्या उत्पादनावर परिणाम झाला.शेतकऱ्यांनी बियाणे खते फवारणी औषध मशागत मजुरी यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला,परंतु हाती येणारे उत्पादन पाहता खर्च आणि उत्पादनात याचा ताळमेळच बसत नसल्याने शेतकरी हवालदिल आहे.जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला.त्यामुळे विहिरीच्या पाण्याची पातळी सुद्धा



कमी होत असल्याने रब्बी पिकाची पेरणी करावी की नाही.या द्विधा मनस्थितीत शेतकरी अडकले असून जमिनीतील ओलाव्याचे प्रमाण फारच कमी असल्याने रब्बी पिकाची सुद्धा आशा मावळत आहे.

सोयाबीन पिकाने शेतकऱ्याची तर निराशाच केली.यावर्षी पिकाच्या वाढीकरिता व उत्पादनासाठी नैसर्गिक वातावरण तयार होत.नसल्यामुळे कपाशी पिकाच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून तुरीचे पिकाला सुद्धा नैसर्गिक वातावरणाचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.तालुक्यात कोरडवाहू शेतीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने या क्षेत्रावरील तुरीचे पीक पावसाअभावी सुकण्याचे मार्गावर आहे.पुरेसा पाऊस नसल्याने उत्पादनात कमी आणि शेती खर्चात वाढ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला असून शासनाकडून मिळणाऱ्या मदतीच्या प्रतीक्षेत आहे.

# आज अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी

## विक्रमी मतदानाने बदलणार गणित, पसंतीक्रम ठरणार निर्णायक

### - महायुतीतील बंडखोरी, आघाडीतील स्पर्धा आणि संघटनांच्या ताकदीची कसोटी



**अमरावती/प्रतिनिधीः-**
विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत यंदा २०२६ मध्ये मतदानाचा टक्का वाढून तो तब्बल ९२.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. २०२० च्या निवडणुकीत ८१.१० टक्के मतदान झाले होते, म्हणजेच यंदा ११.१५ टक्क्यांची वाढ झाली आहे. एकूण ३५ हजार ८१० मतदारांपैकी सुमारे ३३ हजार मतदारांनी हक्क बजावल्याने लढतीचे गांभीर्य वाढले आहे. मात्र, या वाढलेल्या मतदानाचा फायदा आणि नुकसान कोणाला होणार, हे आज २७ ऑक्टोबरच्या मतमोजणीनंतरच स्पष्ट होईल.

या निवडणुकीत महायुतीकडून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार किरण सरनाईक यांच्यासमोर पक्षातीलच बंडखोरांचे मोठे आव्हान होते. भाजपमधून बंडखोरी करून संगीता शिंदे, शेखर भोयर आणि सुमित पवार रिंगणात उतरले होते, तर शिवसेनेतून बंडखोरी करत माजी आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे यांनीही उमेदवारी दाखल केल्यामुळे मतविभाजनाचे गणित गुंतागुंतीचे झाले. दुसरीकडे, महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या प्रा. अदिती पोहरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रा. दत्तात्रय लहाने यांच्या उमेदवारीमुळे विरोधी मतांचे एकत्रीकरण करणे आव्हान ठरले होते. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे पक्षाचा झेंडा किंवा नेत्यांच्या सभांमुळे आपोआप मते मिळत नाहीत. शिक्षक संघटनांच्या प्रभावासह प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्याची यंत्रणा किती प्रभावी ठरली, यावरच निकाल अवलंबून असेल.

अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, अकोला आणि वाशिम या पाच ☞(पान २ वर)

# अखेर चौदा दिवसांनी एफआयआर दाखल

### -ॲड. विनय देशपांडे यांच्यावर मानसिक आघात

## न्यायालयात मारहाण, बार असोसिएशनची कारवाई शून्य

**अमरावती/प्रतिनिधीः-**
अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाच्या दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या न्याय कक्षात मारहाण प्रकरणात अखेर चौदा दिवसांनी एफ. आय. आर. दाखल झाली आहे. परंतू अद्याप बार असोसिएशनतर्फे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे बार असोसिएशनवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. दरम्यान प्रकरणातील ॲड. विनय देशपांडे यांच्यावर घडलेल्या प्रकाराचा प्रचंड मानसिक आघात झाला असून त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयात सुमारे पंधरा दिवसांपूर्वी एका मालमत्ता प्रकरणात ॲड. आर. ए. सायरे यांनी ॲड. विनय देशपांडे यांच्यावर धावून येत दोन्ही कानशीलात लगावल्या होत्या. याबाबत गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार सादर केली होती. परंतू सुमारे चौदा दिवसांच्या कालावधी नंतर एफ.



आय. आर. दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तक्रार दाखल करण्यात दिरंगाई का केली? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर बार असोसिएशन तर्फे या प्रकरणाची कुठलीही दखल घेण्यात आलेली नाही.

बार असोसिएशनच्या या पवित्र्यावर सुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात येत आहे. या प्रकरणाचा मानसिक आघात ॲड. विनय देशपांडे यांच्यावर झाला असून त्यांचा रक्तदाब प्रचंड वाढल्याने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सुमारे दोन दिवस ते अतिदक्षता विभागात चिंताजनक स्थितीत दाखल होते. ☞(पान २ वर)

# खाण-क्रशर प्रकरणात 'खोदकाम' सुरू; प्रशासनाच्या कारवाईचे काय?

### -सहा मीटरच्या अटीचा भंग, ब्लास्टिंग परवानग्यांवर प्रश्नचिन्ह

### -जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही दोन महिने अहवाल गुलदस्त्यात!

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** खदानींमध्ये नियमांचे किती खोलवर उल्लंघन झाले, याचे उत्तर शोधण्याऐवजी प्रशासनाच्या चौकशीचेच 'खोदकाम' सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. खाण व क्रशर उद्योजक संघानेच कथित अनियमिततेवर बोट ठेवले. सहा मीटरच्या मर्यादेऐवजी ३० मीटरपर्यंत उत्खनन झाल्याचे दावे, ब्लास्टिंगच्या परवानग्यांबाबत संशय आणि विनापास गौणखनिज वाहतुकीचे आरोप पुढे आले. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी चौकशीचे निर्देश दिले; मात्र दोन महिने उलटूनही तपासणीचा निष्कर्ष आणि कारवाईचा तपशील समोर आलेला नाही. त्यामुळे खदानींतील कथित अनियमिततेपेक्षा आता प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली आहे.



खाण-क्रशर संघाच्या निवेदनातून व्यवसायातील नियमपालनाचा मुद्दा ऐरणीवर आला. संघटनेतील सदस्यांच्या व्यवसायाबाबतच प्रश्न उपस्थित झाल्याने या तक्रारीची व्याप्ती आणि त्यामागील वस्तुस्थिती तपासणे आवश्यक आहे. तक्रार कोणी केली, यापेक्षा त्यातील आरोप खरे की खोटे, हे महत्त्वाचे! पण आरोपांची पडताळणी करून सत्य समोर आणण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेच्या कामकाजाचा ठावठिकाणा मिळत नसेल, तर संशयाला वाव मिळणारच.

ब्लास्टिंगच्या परवानग्या कुठे अडकल्या?

खदानींमध्ये ब्लास्टिंगसाठी आवश्यक परवानग्या आणि सुरक्षा नियमांचे पालन हा स्वतंत्रपणे तपासण्याचा विषय आहे. नेमक्या किती खदानधारकांकडे आवश्यक परवानग्या आहेत, त्यांची वैधता काय आणि प्रत्यक्ष कामकाज मंजूर अटींनुसार सुरू आहे का, याची अधिकृत माहिती समोर येणे गरजेचे आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना खदानींची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याचे समोर आले होते. मात्र, दोन महिने उलटूनही चौकशीचा निष्कर्ष स्पष्ट झालेला नाही. तपासणी पूर्ण झाली की नाही, अहवाल सादर झाला की नाही आणि त्यावर पुढे कोणती कार्यवाही झाली, याची माहिती उपलब्ध नसल्याने प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

**गौणखनिज वाहतुकीचा हिशेबही तपासा!-** विनापास गौणखनिज वाहतूक आणि स्वामित्वधन न भरल्याचे आरोप असतील, तर संबंधित वाहतूक पास, वाहनांच्या नोंदी आणि महसूल जमा झाल्याचा तपशील तपासणे गरजेचे आहे. या पडताळणीतूनच शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले की नाही, हे स्पष्ट होऊ शकते. आरोप सिद्ध झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. त्याचवेळी अधिकाऱ्यांच्या देखरेखीत त्रुटी किंवा कर्तव्यात कसूर आढळल्यास त्यांची जबाबदारीही निश्चित करावी.

**चौकशीचा फार्स नको; कारवाईचा धडाका हवा!**
खाण-क्रशर संघाची तक्रार, जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशी आदेश आणि त्यानंतरचा दोन महिन्यांचा कालावधी या सगळ्यांचा हिशेब आता जनतेसमोर आला पाहिजे. तपासणी झाली असेल तर अहवाल जाहीर करा; नियमभंग सिद्ध झाला असेल तर कारवाई करा; आरोप तथ्यहीन असतील तर तेही अधिकृतरीत्या स्पष्ट करा. अनिश्चिततेच्या सावटाखाली संपूर्ण व्यवसायाला ठेवणे योग्य नाही. खदानींमध्ये उत्खननाचा हिशेब मागितला जातो, तर प्रशासनाच्या चौकशीचाही हिशेब मागितलाच पाहिजे! नियमभंग करणाऱ्यांना अभय मिळता कामा नये आणि निरपराध व्यावसायिकांवरही अन्याय होता कामा नये. यासाठी निष्पक्ष तपासणी, ठोस निष्कर्ष आणि वेळेत निर्णय आवश्यक आहे. आता प्रशासन चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा करणार की प्रत्यक्ष कारवाईतून आपली कार्यक्षमता सिद्ध करणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

### सहा मीटरची अट कागदावर, ३० मीटरचे उत्खनन प्रत्यक्षात?

तात्पुरत्या परवान्याच्या आधारे सुरू असलेल्या खदानींसाठी सहा मीटर खोलीची मर्यादा असल्याचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला. काही खदानींमध्ये ३० मीटरपर्यंत उत्खनन झाल्याचा दावाही करण्यात आला. हा दावा अधिकृत मोजणीतून सिद्ध झाल्यास प्रकरणाचे गांभीर्य वाढणार आहे. मंजूर परवानगी किती, प्रत्यक्ष उत्खनन किती आणि नियमभंग झाला असल्यास त्याकडे दुर्लक्ष कोणी केले, याची उत्तरे शोधावी लागतील. खदानींचे कामकाज एका दिवसात उभे राहत नाही. उत्खनन सुरू असताना संबंधित विभागांनी पाहणी केली का? मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन आढळले का? आढळले असल्यास कारवाई का झाली नाही? आणि नियमभंगच झाला नसेल, तर तक्रारीतील दाव्यांचे वास्तव काय? या प्रश्नांवर अधिकृत खुलासा आवश्यक आहे. केवळ खदानधारकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून चालणार नाही; देखरेख करणाऱ्या यंत्रणेची भूमिकाही तपासली पाहिजे.

# शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक केल्यास फायनान्स कंपन्यांवर फौजदारी कारवाई होणार

### निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे

**अमरावती/प्रतिनिधीः-**
दुष्काळी परिस्थितीचा गैरफायदा घेऊन ग्रामीण भागातील शेतकरी आणि कर्जदारांची आर्थिक पिळवणूक करू नये, तसेच कर्जवसुलीसाठी कोणतीही जबरदस्ती केल्यास संबंधित फायनान्स कंपनीवर थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असा कडक इशारा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी दिला आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३०४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून, यामध्ये अमरावती जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश आहे. दुष्काळामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि पीक उत्पादकतेवर विपरीत परिणाम झाला असून, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, मायक्रो फायनान्स संस्था आणि स्मॉल फायनान्स बँकांनी कर्जदारांकडून अवास्तव व्याज आकारू नये, तसेच वसुलीसाठी दबाव किंवा अनुचित पद्धतींचा अवलंब करू नये, अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

या गंभीर विषयाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ रोजी मायक्रो फायनान्स कंपन्या आणि स्मॉल फायनान्स बँकांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत कर्जवसुलीच्या पद्धतींचा आढावा घेणे, अवास्तव व्याज आकारणी टाळणे आणि ग्रामीण कर्जदारांना दिलासा देणे यावर सविस्तर चर्चा होणार आहे. दुष्काळाच्या काळात ☞(पान २ वर)

# भटक्या श्वानाच्या हल्ल्यात बालक जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-**
यास्मीन नगरमध्ये मशिदीजवळ खेळत असलेल्या एका बालकावर भटक्या श्वानाने हल्ला केल्याची घटना आज सोमवार २६ ऑक्टोबर दुपारी समोर आली आहे.यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. हल्ल्यात जखमी बालकाचे नाव शेख अरहान शेख जुबेर आहे.जखमी अवस्थेतील अरहानला घेऊन कुटूंबियांनी तात्काळ जिल्हा रुग्णालय इर्विनमध्ये धाव घेतली.



शेख अरहान हा मित्रांसोबत खेळत होता, तेव्हाच त्याच्यावर श्वानाने हल्ला केला. त्याच्या चेहऱ्यावर खोल आणि धोकादायक जखमा झाल्या आहेत. डॉक्टरांनी त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. यापूर्वीही ☞(पान २ वर)

# मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर आज वाहतुकीत अंशतः बदल

## बियाणी चौक ते तपोवन गेट मार्ग बंद राहणार

**अमरावती/प्रतिनिधीः-**
विधान परिषद अमरावती शिक्षक मतदारसंघ विभाग निवडणूक-२०२६ ची मतमोजणी मंगळवारी, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजतापासून मार्डी रोडवरील लोकशाही भवन येथे सुरू होत आहे. या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर परिसरात नागरिकांची आणि शिक्षकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच बियाणी चौक ते विद्यापीठ चौक




या मार्गावर फुटपाथचे काम सुरू असल्याने वाहतूक कोंडी व अपघात टाळण्यासाठी या मार्गावरील वाहतुकीत अंशतः बदल करण्यात आले आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे यांनी वाहतूक बंद करून ती पर्यायी मार्गाने वळवण्याचे आदेश जारी केले आहेत.मतमोजणी प्रक्रीयेसाठी मोठ्या संख्येने येणारे शासकीय व खाजगी नागरिक यांची व वाहनांची वर्दळ लक्षात घेता मतदान केंद्र परिसरात वाहतुक कोंडी, अपघात यासारखा प्रकार घडून कायदा व ☞(पान २ वर)

# तपोवन चौकात चाकू घेऊन दहशत पसरविणारा ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील तपोवन चौक परिसरात हातात चाकू घेऊन येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांमध्ये दहशत निर्माण केल्याच्या आरोपावरून गाडगेनगर पोलिसांच्या डीबी पथकाने एका २८ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १३.५ इंच लांबीचा लोखंडी धारदार चाकू जप्त करण्यात आला. ही कारवाई २६ ऑक्टोबरच्या मध्यरात्री नाइट पेट्रोलिंगदरम्यान करण्यात आली.



गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अंमलदार राजेश गुरेले यांनी दोन पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. तेथे श्याम प्रकाश रती (वय २८, रा. माधवी विहार, तपोवन, अमरावती) हा तरुण आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडील चाकू पंचांसमक्ष जप्त करण्यात आला.

या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ४ व २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार राजेश गुरेले करीत आहेत.

# मल्लिकार्जुन खरगे यांच्याविरोधात भाजपाचे राजकमल चौकात निषेध आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-**
काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद आता देशासह शहरातही उमटले आहेत. राजकमल चौकात आज सोमवार २६ ऑक्टोंबर रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने मल्लिकार्जुन खरगे यांच्या पोस्टरवर प्रतिकात्मक निषेध व्यक्त केला. काँग्रेसच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी येथे करण्यात



आली.राजकीय विरोध अथवा मतभेद व्यक्त करताना कोणाच्याही दिवंगत वडिलांबाबत अवमानकारक आणि असभ्य वक्तव्य करणे ही अत्यंत चुकीची व राजकीय संस्कृतीला न शोभणारी बाब आहे,' असा संतप्त आरोप आंदोलकांनी यावेळी केला. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी अशा प्रकारे पातळी सोडून टीका करणे अयोग्य असून खरगे यांनी याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी भाजप नेत्यांनी केली.

या आंदोलनामुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आंदोलनाची माहिती मिळताच खबरदारीचा उपाय म्हणून पोलीस प्रशासनाकडूनही परिसरात चोख बंदोबस्त☞(पान २ वर)

### सोमवारी जिल्हा लोकशाही दिन




**अमरावती :** जिल्हा लोकशाही दिन सोमवार, दि. २ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तरी संबंधितांनी अहवालासह व्यक्तिशः उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

# शाळेतून दोन विद्यार्थिनी एकाच वेळी बेपत्ता

### -पोलिसांचा शोध सुरू -राजकमल चौकातील सीसीटीव्ही मध्ये दिसल्या सोबत

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळ्या शाळांमध्ये शिकणाऱ्या १८ वर्षीय आणि १६ वर्षीय दोन विद्यार्थिनी एकाच वेळी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे.दोन्ही विद्यार्थिनी २३ ऑक्टोबर रोजी दुपारी आपापल्या शाळांमधून निघाल्या होत्या, मात्र घरी परतल्या नाहीत.पालकांकडून माहिती मिळाल्यानंतर कोतवाली पोलिसांनी दोन्ही मुली बेपत्ता झाल्याप्रकरणी अपहरणाच्या कलमांखाली गुन्हा दाखल करून शोध मोहीम सुरू केली आहे. माहिती नुसार, दोन्ही विद्यार्थिनी बेपत्ता झाल्याची सूचना मिळताच शहरातील विविध ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. यावेळी राजकमल चौकातील एका कॅमेऱ्याच्या फुटेजमध्ये दोन्ही विद्यार्थिनी एकत्र जाताना दिसून आल्या. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या हालचाली आणि संपर्काबाबत माहिती गोळा करण्याच्या दिशेने तपास अधिक वेगाने सुरू केला आहे.

**घरात सापडली चिठ्ठी-**
बेपत्ता विद्यार्थिनींपैकी एकीच्या




घरी आज सकाळी एक चिठ्ठी सापडल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थिनीने या चिठ्ठीत अभिनय करण्यासाठी जात असल्याचा उल्लेख केला असल्याचे सांगण्यात येत आहे. या माहितीनंतर पोलिसांच्या तपासात अभिनयाशी संबंधित हालचाली आणि संपर्कांचाही समावेश करण्यात आला आहे.तपासा दरम्यान पोलिसांना समजले की, दोन्ही विद्यार्थिनींकडे स्मार्टफोन होते. त्यानंतर त्यांच्या मोबाईल फोनच्या कॉल डिटेल रेकॉर्ड आणि सोशल मीडिया खात्यांशी संबंधित माहितीची पडताळणी सुरू करण्यात आली.

**बीटीएस ग्रुपच्या संपर्कात-**
माहिती नुसार, दोन्ही विद्यार्थिनी व्हॉट्सअप आणि इन्स्टाग्रामवर☞(पान २ वर)

# मिरवणुकीत सहभागी युवकाचा संशयास्पद मृत्यू!

## काळा मारोती मंदिराच्या मागे आढळला मृतदेह

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-**
दुर्गा विसर्जनाच्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या २० वर्षीय युवकाचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नांदगाव पेठ येथे समोर आली. करण प्रभाकर ससाणे असे मृत युवकाचे नाव आहे. विसर्जनाच्या उत्साहात सहभागी झालेल्या युवकाचा मृतदेह काळा मारोती मंदिराच्या मागे जखमी अवस्थेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. युवकाच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, करण हा दुर्गा विसर्जनाच्या मिरवणुकीत सहभागी झाला होता. मात्र, सायंकाळच्या सुमारास काळा मारोती मंदिराच्या मागे त्याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता करणच्या कानातून रक्त वाहत असल्याचे निदर्शनास आले. युवकाच्या ☞(पान २ वर)